## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२२
निर्णय दिनांकः १८-०१-२०१०

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा.नांदेड. :अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड,जि.नांदेड. :प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.०१.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती. तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मुख्याध्यापक, खुरेशिया ऊर्दू प्रा.शाळा यांनी दिलेली नाही. त्यांच्या दि. ११.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद आणि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड यांच्याकडून ती अपिलार्थीस देय होत आहे.

तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केला नसल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील, "शाळेतील किती शिपाई सेवानिवृत्त झाले, किती शिपायांच्या जागा रिक्त

आहेत, किती सेवानिवृत्त शिपायांचे पेन्शन प्रस्ताव दाखल केले नाहीत त्यांची नावे व सेवानिवृत्तीचा दिनांक", ही माहिती देय असणार नाही. या मुद्यांवरील माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे देय होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस,हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,रा.घर नं.९-४-१०६१, रामरहीमनगर,पोस्ट ईतवारा,नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा, बारा ईमाम, मणियार गल्ली,नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२३
निर्णय दिनांकः १८-०१-२०१०

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, :अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नोबेल ऊर्दू प्राथमिक शाळा,
नांदेड,जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०१.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २९.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात शाळा स्थापन झाल्यापासून ते डिसेंबर, २००८ पर्यंतच्या कालावधीची काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाने पाठविला असता, हा अर्ज मुख्याध्यापक यांना दि. १०.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २९.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यासाठी त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड श्री. पाटील यांना विनंती केली असता, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेण्याचे नाकारले, एवढेच नव्हेतर अपिलार्थीस, तुम्हाला काय करावयाचे आहे ते करुन घ्यावे, असे उर्मट उत्तर दिले. अपिलार्थीने पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना

आजही आवश्यक आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये घेतलेली नाही अथवा याबाबत आपला निर्णय अपिलार्थीस कळविलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता तसेच आयोगाकडे नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाशी संबंधित प्राप्त झालेल्या द्वितीय अपील अर्जांची संख्या आणि स्वरुप पाहता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेऊन आपले कर्तव्य पार पाडण्यात कुचराई केली आहे, असे आयोगास वाटते. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या उपरोक्त प्रकरणाशी संबंधित दि. २९.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-

नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,रा.घर नं.९-४-१०६१, रामरहीमनगर,पोस्ट ईतवारा,नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू प्राथमिक शाळा, लेबर कॉलनी, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२४
निर्णय दिनांकः १८-०१-२०१०

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, :अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याध्यापक,
ऊर्दू प्राथमिक शाळा, मुखेड,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : गुरुदेव ऊर्दू प्राथमिक शाळा,मुखेड,जि.नांदेड

### निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. ०६.०१.२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.

४२४/२००९  ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ४२४/०९, दि. ०१.०६.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :     १८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,रा.घर नं.९-४-१०६१, रामरहीमनगर,पोस्ट ईतवारा,नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दू प्राथमिक शाळा, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७७
निर्णय दिनांक: १८-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. पुराणे केशव साहेबराव,<br>रा.कर्जत, जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. चेअरमन / सचिव,<br>श्री. संत श्रेष्ठ तुकाराम महाराज सहकारी<br>गृहनिर्माण संस्था मर्या., कर्जत, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, कर्जत, जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१९.०६.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सचिव, श्री.संत श्रेष्ठ तुकाराम महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कर्जत यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संबंधित संस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०७.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २८.०८.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष / सचिव, श्री. संत श्रेष्ठ तुकाराम महाराज सहकारी

गृहनिर्माण संस्था मर्या., कर्जत यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित गृहनिर्माण संस्थेचे सचिव त्यांच्या वकिलांसह व सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर हे सर्वजण उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थेतर्फे त्यांचे वकील श्री. डी.एच.भंडारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दि. १८.०७.२००८ व तदनंतर प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयाप्रमाणे दि. १५.१२.२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०८.२००८ रोजी निर्णय दिला असून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींप्रमाणे अपिलार्थीने सदर निर्णयानंतर नव्वद दिवसांच्या आत आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक होते. तथापि विचाराधीन अपील त्यांनी चोवीस दिवसांच्या विलंबाने दाखल केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore,**

**Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable".</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. याही उपर जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीने विचाराधीन अपील नव्वद दिवसानंतर २३ दिवस विलंबाने केले असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या आणि जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर यांचे दि. २८.०८.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५

नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१७७/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था,कर्जत, जि.अहमदनगर यांचे दि. २८.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुराणे केशव साहेबराव, पंचायत समिती, कर्जत, ता.कर्जत, जि. अहमदनगर.

२. अध्यक्ष / सचिव, श्री. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कर्जत, ता.कर्जत, जि. अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, ता.कर्जत, जि. अहमदनगर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६७
निर्णय दिनांकः १८-०१-२०१०

१. श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१. समतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., : प्रतिवादी
कांचनवाडी, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२३.०६.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे समतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कांचनवाडी, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. ०८.११.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस संस्थेने त्यांच्या कार्यालयात सादर केलेली माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न मिळाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम, २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२८६७/०७ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, १-समतानगर, वाल्मी नाका, पैठण रोड, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

२. समतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, १६-समतानगर, कांचनवाडी, औरंगाबाद ५.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४१९/२००९ व ४२०/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४१९ व ४२०

निर्णय दिनांक १८.०१.२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी

रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,

लातूर विभाग, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

अपील क्रमांक ४१९/२००९ शी संबंधित त्रयस्थ पक्ष : बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट व बळीराम पाटील मिशन संचलित रेणूकादेवी महाविद्यालय, माहूर

**निर्णय**

**<u>अपील क्रमांक ४१९/२००९</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकाऱ्याने तीन दिवसात माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे, बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट व बळीराम पाटील मिशन संचलीत रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर यांना २००२ ते २००८ या कालावधीमध्ये दिलेल्या निधीची संपूर्ण माहिती व किनवट तालुक्यातील विविध प्रकारच्या संस्थांना निधी दिल्याबाबत त्याची सविस्तर माहिती, अशाप्रकारची माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकरी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक १६.०६.२००९ पासून कार्यरत आहेत. तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे मूळ

अभिलेखे व कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी त्यांना व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीचा अर्ज देखिल याच अभिलेख्यात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि आयोगाकडून द्वितीय अपिलाच्या सुनावणीसंदर्भात अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत त्यांना आता प्राप्त झाली आहे. त्यावरुन त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार केली आहे व आज रोजी त्यांच्याबरोबर आणली आहे, ते ही माहिती अपिलार्थीस तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम व अस्पष्ट स्वरुपात अशी मागितली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट व रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर यांना निधी दिल्यास त्याची संपूर्ण माहिती अशाप्रकारची माहिती मागितली आहे. तथापि 'संपूर्ण माहिती' म्हणजे नेमके अपिलार्थीस काय अभिप्रेत आहे, ते येथे स्पष्ट होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या बाबतीत देखिल असेच म्हणता येईल. तथापि एकंदरीत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा सूर पाहता, आज रोजी अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन आणलेली माहिती प्राप्त झाल्यास सर्वसाधारणपणे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकेल, असे आयोगास वाटते. ही माहिती अपिलार्थीस तात्काळ देण्यासाठी सध्याचे जन माहिती अधिकारी तयार आहेत. हे पाहता, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी तयार करुन ठेवलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जी.जी. राठोड यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल क्रीडा संचालक, पुणे यांना

त्यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस देण्यासाठी आज रोजी आयोगास दाखविलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. क्रीडा संचालक, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. जी.जी. राठोड यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ४२०/२००९**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी विहित वेळेत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १) नोंदणीकारक खेळाची माहिती व स्थानाची माहिती मिळणे बाबत.

२) नांदेड जिल्ह्यातील व्यायाम शाळा तसेच विविध क्रिडा संघटनांना अनुदान दिल्याची रक्कमेप्रमाणे माहिती मिळणे बाबत. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले व अपिलार्थीचे अपील खारीज केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक १६.०६.२००९ पासून कार्यरत आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जी.जी. राठोड व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून कार्यालयातील सर्व अभिलेखे गहाळ झाल्यामुळे त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे, या प्रकरणाची सध्या पोलीस चौकशी चालू आहे. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी

केलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या मुद्यांवर माहिती अपेक्षित आहे, हे स्पष्ट होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे त्यांनी नांदेड जिल्ह्यातील व्यायाम शाळा व विविध क्रीडा संघटनांना अनुदान दिल्याच्या रकमेप्रमाणे माहिती अशा स्वरुपाची माहिती मागविली आहे. तथापि 'रकमेप्रमाणे माहिती' म्हणजे नेमके काय, हे स्पष्ट करण्यासाठी अपीलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. परंतु माहितीतील सुरावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नांदेड जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटनांना त्यांच्या कार्यालयातर्फे वितरीत केलेले अनुदान किती याची माहिती अपेक्षित असावी, असे वाटते. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे विविध क्रीडा संघटनांना नियमीतपणे क्रीडा प्रोत्साहनार्थ दरवर्षी अनुदान दिले जाते. त्यामुळे अनुदान देण्याची प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती अपेक्षित असेल तर त्यांनी, ही माहिती एका विशिष्ट कालावधीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागावयास हरकत नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नाही अथवा तो करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीस मूळ अर्जातील दोनही मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, आवश्यक त्या कालावधीच्या उल्लेखाअभावी, त्यांना देय होत नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ क्रीडा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत पहिला मजला, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२१

निर्णय दिनांक १८.०१.२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
कुरेशिया उर्दू हायस्कूल, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू हायस्कूल, नांदेड यांच्याकडे दिनांक १०.०१.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अर्ज पाठवून दिला असता, त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेची मान्यता कोणत्या ठिकाणची आहे, तसेच त्यांच्या शाळेत विद्यार्थी संख्या किती आहे, शाळेत मैदान असल्यास किती चौरस फुट त्या नकाशासह व शाळेतील खेळाच्या साहित्यासह माहिती, तसेच हे साहित्य खरेदी केल्याच्या पावत्यांच्या सत्यप्रती व शाळेत किती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शिपाई यांच्या नावासहीत यादी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक ०६.०२.२००९ रोजी त्यांना विनामूल्य पुरविली, ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीचा निश्चित कोणता निर्णय लागला, हे आयोगास संबंधित कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्याच्या कारणावरुन दिनांक १५.०६.२००९ रोजीच्या दिनांकाचे आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचारधीन अपील सादर केले. या अपिलाची नोंदणी दिनांक १७.०६.२००९ रोजी आयोगाकडे झाली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. खुद्द अपिलार्थीने ही माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली आहे. तथापि आज रोजी युक्तिवादाच्या वेळी ही माहिती त्यांना मिळाली नसल्याचे ते आयोगास सांगत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या विसंगत वर्तनामुळे व विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१,रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया उर्दू हायस्कूल, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४२५/२००९ व ४२६/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२५ व ४२६

निर्णय दिनांक १८-०१-२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा,
नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ४२५/२००९ व ४२६/२००९
जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. खांडवे व श्री. गोणारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकच असल्या-मुळे आणि अपिलार्थीने एकाच दिवशी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली असल्यामुळे या दोनही अपील अर्जांवर एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपील क्रमांक ४२५/२००९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी व अपील क्रमांक ४२६/२००९ च्या संदर्भात दिनांक १२-०३-२००९ रोजी माहिती मागितली असता त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. तथापि या दोनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या व्दितीय अपील क्रमांक ४२५/२००९ च्या संदर्भात दिनांक १७-०३-२००९ रोजी व अपील क्रमांक ४२६/२००९ च्या संदर्भात दिनांक १२-०३-२००९ रोजी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती मागविली असता या दोनही अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ४२५/२००९ शी संबंधित अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. अपील क्रमांक ४२६/२००९ शी संबंधित अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थींच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थींच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थींची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ४२५/२००९ व अपील क्रमांक ४२६/२००९ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४३
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

१. श्री. तिडके सदाशिव रामभाऊ, : अपिलार्थी
रा.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कार्यालय,जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,गडचिरोली.
२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा), सामान्य रुग्णालय,गडचिरोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या नागपूर कार्यालयाकडून रिडायरेक्ट केलेले दि.२३.१२.२००८ रोजी प्राप्त झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन सत्य माहिती दडविण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. व्ही.आर.तिडके, तत्कालीन वैद्यकीय अधिकारी, जिल्हा गडचिरोली यांच्या सेवापुस्तिकेबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. व्ही.आर.तिडके वैद्यकीय अधिकारी म्हणून अहेरी, जि. गडचिरोली येथील रुग्णालयात कधीपासून व कोणत्यास ठिकाणाहून बदलून आले, श्री. तिडके यांच्या ४ थ्या वेतन आयोगाची वेतननिश्चती करुन वेतन व सर्व सेवाविषयक लाभ देण्यात आले आहेत काय? श्री. तिडके यांची सेवापुस्तिका अद्ययावत व परिपूर्ण केली आहे काय? श्री. तिडके यांची अहेरीहून कोणत्या ठिकाणाहून बदली झाली ? बदली झाल्यानंतर आपण त्यांची सेवापुस्तिका अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठविले आहे काय? व श्री. तिडके यांच्या मूळ सेवापुस्तिकेची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार परत जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,गडचिरोली यांच्याकडे दि. ०४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०४.२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस परत काही माहिती पुरविली. तथापि या पत्रातील मजकुराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १०.०३.२००८ व दि. ११.०४.२००८ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०३.२००८ रोजी पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थी हे याच त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात वेगवेगळया प्राधिकरणाकडे वेळोवेळी याच विषयावर माहिती मागवित असल्याचे आयोगास आढळून आले आहे आणि अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द नोंदविलेल्या आक्षेपांबाबत कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केलेला नाही. तसेच अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल बऱ्याच अपिलांसंदर्भात आयोगाने दिलेल्या निर्णयांनंतर,उपसंचालक,आरोग्य, कोल्हापूर यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची दुसरी प्रत तयार करुन त्यांचे सेवानिवृत्तीप्रकरण मार्गी लावल्याचे व आवश्यक ती कार्यवाही केल्याचे देखील आयोगास अवगत करुन देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस बरोबर कळविले आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके, महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदिर रोड,शाहुनगर,बीड-४३१

१२२.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा), सामान्य रुग्णालय,गडचिरोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,गडचिरोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४४
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

१. श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
जाफ्राबाद, जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,जि.जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि पर्यवेक्षक,तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद,जि.जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"शेतकरी अभ्यासदौरे विकास कार्यक्रम" या विषयावर त्यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीशी संबंधित, "केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत शेतकरी अभ्यास दौरे

विकास कार्यक्रम २००५-०६"या संचिकेच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळण्याबाबत, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याऐवजी ही माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०५.२००८ रोजी काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेल्या विषयावर कोणतीही स्वतंत्र संचिका तत्कालीन अधिकाऱ्याने ठेवली असल्याचे त्यांना आढळून आले नाही. तथापि अपिलार्थीने ज्या विषयावर त्यांच्याकडे माहितीची मागणी केली होती, त्या विषयावरील अपिलार्थीस अद्यापपावेतो देणे बाकी असलेली उर्वरित माहिती त्यांनी आज सोबत आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस त्वरित व विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,"शेतकरी अभ्यास दौरे कार्यक्रम २००५-०६ या विषयाशी संबंधित त्यांच्याकडे असलेली संचिकेच्या सर्व प्रतींची" माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अशाप्रकारची माहिती पुरविण्याची कोणतीही तयारी दर्शविली नाही. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस काही माहिती अपूर्ण पुरविली व आज रोजी आयोगाकडे सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या विषयावरील जी माहिती त्यांच्याकडील लेखा शाखेकडे उपलब्ध आहे, ती त्यांनी सोबत आणली आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संचिकेच्या स्वरुपात उपलब्ध करुन ठेवली आहे किंवा कसे अशी आयोगाने तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अशाप्रकारची वर्षनिहाय संचिका ठेवण्याची पध्दत त्यांच्या कार्यालयामध्ये प्रचलीत नसल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस आता उर्वरित माहिती त्वरित देण्याचे आयोगास आश्वासित केले. यावरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील अशाप्रकारच्या योजनांसंदर्भातील अभिलेखे हे योजनानिहाय व वर्षनिहाय ठेवले जात नाहीत. इत:पर अशाप्रकारच्या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवताना त्यांनी या योजनांचे अभिलेखे योजनानिहाय, वर्षनिहाय त्यांच्याकडे संचिकेच्या स्वरुपात उपलब्ध करुन ठेवावेत, असे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम १९ (८)(क) (चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने पोस्टाद्वारे माहिती मागितली असताना देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे पाहून जाण्याचे सूचित केले आणि तदनंतर दि. २८.०५.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिली. संबंधित जन माहिती अधिकारी श्री. के.एम.देशमुख व श्री. आर.आर.शिरा, मंडळ कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस कृषि आयुक्त, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. के.एम.देशमुख व श्री. आर.आर.शिरा,मंडळ कृषि अधिकारी,जाफ्राबाद जि.जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, राखे वाडा, पोस्टासमोर, कचेरी रोड,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि कार्यालय,जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४५
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शामसुंदर साहेबराव वाघ,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>कर्मवीर प्रतिष्ठान, रामनगर,ता.जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना जास्तीत जास्त शासन करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये कर्मवीर प्रतिष्ठान द्वारा चुडामन पाटील कृषी विद्यालय,रामनगर सहकारी साखर कारखाना,रामनगर,जालना यांच्याकडे त्यांच्या संस्थानासंदर्भात काही माहिती मागविली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.११.२००७ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त,जालना यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सहायक

धर्मादाय आयुक्त यांनी दि. ३१.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दोन आठवडयाच्या आत माहिती देण्याचे संबंधित प्रतिष्ठानास आदेश दिले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी यांचे वकील व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांचा माहिती मागण्याचा हेतू संशयास्पद असून, त्यांना यापूर्वी जालना येथील कोर्टात दोन वेळा शिक्षा देखील झाली होती व तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र. ५२९४/२००८ च्या संदर्भात दिलेला निर्णय या प्रकरणी लागू होत असल्याने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यास ते बांधील नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष, कर्मवीर प्रतिष्ठान,रामनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २००५ मधील तरतुदीअंतर्गत काही माहिती मागितली होती. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र. ५२९४/२००८, दि. २८.०४.२००९ रोजी मुख्य विश्वस्त,श्री. गोविंद रामानंद समर्थ सदगुरु प्रल्हाद महाराज संस्थान साखरखेर्डा, जि.बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय लक्षात घेणे आयोगास अगत्याचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने आपले अभिप्राय खालीलप्रमाणे दिले आहेत.

"......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

तसेच आयोगास असेही आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील दाखल केले आहे. अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित अधिकारी असणे गरजेचे आहे. या प्रकरणी अपिलार्थीने कर्मवीर प्रतिष्ठानाकडे माहिती मागविली आहे व यासंदर्भातील अपील या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे केले आहे. अशाप्रकारच्या विसंगतीमुळे आणि मा.उच्च न्यायालयाच्या वर नमूद केलेल्या निर्णयानुसार, संबंधित प्रतिष्ठानास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू होत नसल्यामुळे,अपिलार्थीची संबंधित प्रतिष्ठानास अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्याची आणि संबंधितांवर शास्तीची कारवाई करण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे व त्याचबरोबर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिलेले दि. ३१.१२.२००७ रोजीचे आदेश रद्दबातल ठरवित आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक धर्मादाय आयुक्त,जालना यांचे या प्रकरणासंदर्भातील प्रथम अपिलावरील दि. ३१.१२.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामसुंदर साहेबराव वाघ, रा.कारभारी निवास,यशवंतनगर,अंबड रोड,जालना.

२. अध्यक्ष, कर्मवीर प्रतिष्ठान द्वारा चुडामन पाटील कृषी विद्यालय,रामनगर सहकारी साखर कारखाना,रामनगर,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सहायक धर्मादाय आयुक्त,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४६
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

१. श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
गुरु ता गद्दी कक्ष,
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष कार्य अधिकारी, गुरु-ता-गद्दी कक्ष,
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट आणि दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेल्या माहितीने व्यथित झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यासाठी विचाराधीन अपील सादर केले

आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील, नांदेड येथील गुरु ता गद्दी या त्रिशताब्दी सोहळया संदर्भात प्राप्त निधी व जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या प्रस्तावित विदेश दौऱ्यासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०४.२००८ रोजी आणि तदनंतर दि. ०२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती दिल्याचा निष्कर्ष काढला व परत त्याच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची दि. ०२.०५.२००८ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जिल्हाधिकारी, नांदेड श्री. राधेश्याम मोपलवार यांच्या प्रस्तावित विदेश दौऱ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. प्रत्यक्षात हा दौरा संबंधितांनी केलेला नाही. या दौऱ्याकरिता शासनाने तत्कालीन जिल्हाधिकारी,श्री. राधेश्याम मोपलवार यांना रु.१०,००,०००/- इतका अग्रीम

मंजूर केला होता. तथापि हा दौरा न झाल्यामुळे त्यांनी आर्थिक वर्षाच्या अखेरीस त्यांना शासनाकडून प्राप्त झालेले अग्रीम त्यांनी शासनास परत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, या प्रकरणी प्रस्तावित दौऱ्याची तारीख राज्य शासनाच्या नियोजन विभागामार्फत वेळोवेळी बदलली गेल्यामुळे जिल्हाधिकारी,श्री.राधेश्याम मोपलवार हे शासनाकडून त्यांना प्राप्त झालेले अग्रीम शासनाकडे वेळेत परत करु शकले नाहीत. तथापि त्यांनी ते अंतिमतः दि.०१.०१.२००८ रोजी शासनास परत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती प्रथमतः दि. ३०.०४.२००८ रोजी व तदनंतर दि. ०२.०५.२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थीची कशाप्रकारे दिशाभूल झाली आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखील त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांची दिशाभूल कशी झाली, हे स्पष्ट केलेले नाही. यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान,९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड -४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, गुरु-ता-गद्दी कक्ष, जिल्हाधिकारी

कार्यालय,नांदेड  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९८
निर्णय दिनांक १९/०१/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नानासाहेब चांगदेव गाढे,<br>रा.श्रीरामपूर, जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सरव्यवस्थापक,<br>दि मूळा प्रवरा इलेक्ट्रीक को. सोसायटी,<br>श्रीरामपूर, जि. अहमदनगर<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

श्री. नानासाहेब चांगदेव गाढे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २३.०६.२००९ रोजी केलेले दि.०२.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.२३.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.१७.०१.२००९ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ६६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/०१/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नानासाहेब चांगदेव गाढे, तांबेचाळ, वार्ड नं.१, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६८
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

१. श्री. माने सोनाजी रघुनाथ, : अपिलार्थी
रा.हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

१. अध्यक्ष / सचिव, : प्रतिवादी
पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
हर्सूल, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२७.०५.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., हर्सूल, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.३०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २५.०७.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष / सचिव, पार्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., हर्सूल,

औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State</u>**

**within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम, २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. २५.०७.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१६८/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. उपनिबंधक,सहकारी संस्था,तालुका औरंगाबाद यांचे दि. २५.०७.२००८रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माने सोनाजी रघुनाथ, ४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, मयूरपार्क शेजारी, हर्सूल, औरंगाबाद.

२. अध्यक्ष / सचिव, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मयूरपार्क शेजारी, हर्सूल, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६९
निर्णय दिनांकः १९-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. करमचंद नेवंदराम माखिजा,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष / सचिव,<br>श्री. शिवाजी सिंधी को-ऑप. हौसिंग सोसायटी<br>मर्या., सिंधी कॉलनी, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२०.१२.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, श्री. शिवाजी सिंधी को-ऑप. हौसिंग सोसायटी मर्यादित, सिंधी कॉलनी, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १९.०३.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती १० दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष, श्री. शिवाजी सिंधी को-ऑप. हौसिंग सोसायटी मर्यादित, सिंधी कॉलनी, औरंगाबाद यांना आदेशित केले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम, २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १९.०३.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२१६९/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १९.०३.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. करमचंद नेवंदराम माखिजा, प्लॉट नं.१११, श्री.शिवाजी सिंधी को-ऑप. हौसिंग सोसायटी मर्या., सिंधी कॉलनी, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

२. अध्यक्ष / सचिव, श्री.शिवाजी सिंधी को-ऑप.हौसिंग सोसायटी मर्या., सिंधी कॉलनी, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३९

निर्णय दिनांक १९.०१.२०१०

१ श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य अभियंता (परिमंडळ), महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य अभियंता (परिमंडळ), महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (औरंगाबाद परिमंडळ), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मराठीत माहिती दिली नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०८ ऑक्टोबर २००८ च्या पत्रासोबत जोडलेले पत्रात नमूद केल्याप्रमाणे माहिती अर्धवट देण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती १० मुद्दे आणि १२ उपमुद्यांच्यासह व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील ग्रामीण मंडळ, शहर मंडळ या दोन कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांनी ही माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त करुन घेऊन प्रथमतः दिनांक ०८.०८.२००८ रोजी ग्रामीण मंडळाशी, दिनांक १३.०८.२००८ रोजी शहरी मंडळाशी आणि दिनांक ०६.०९.२००८ रोजी ग्रामीण मंडळाशी संबंधित उर्वरित माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाठवून दिली आहे. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ६ व ७ ते १० या मुद्यांच्या संबंधित माहिती नव्याने देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२.१०.२००८ रोजी या मुद्यांच्या वाचनीय प्रती पाठविल्या. तथापि या माहितीवरही समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८.०८.२००८, १३.०८.२००८ व ०६.०९.२००८ रोजी पोस्टाने माहिती पाठविली आणि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर दिनांक २२.१०.२००८ रोजी अपिलार्थीस परत पुर्वीच्या

माहितीतील अस्पष्ट असलेल्या माहितीच्या प्रती वाचनीय स्वरुपात विनामूल्य पाठविल्या. आता अपिलार्थीस त्यांच्याकडे कोणतीही माहिती द्यावयाची बाकी नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ द्वारे अपिलार्थीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मुख्य कार्यालय आदेश क्रमांक १५५५२ दिनांक २९.०९.९९ रोजीच्या आदेशामध्ये श्री. बिलोलीकर, सहायक अभियंता यांनी हेराफेरी केल्याचे आरोप करुन, मुख्य कार्यालयाच्या आदेशाला हेराफेरी करण्याचा कायदा आहे का? अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस जर राज्य विद्युत मंडळाच्या मुख्य कार्यालयाच्या आदेश क्रमांक १५५५२ दिनांक २९.०९.९९ च्या आदेशामध्ये हेराफेरीचा आक्षेप असेल तर त्यांनी या संदर्भात मंडळाच्या सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ६ च्या उर्वरित भागाबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती अपिलार्थीस मूळात देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ चा प्रश्न निकाली निघाला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात देखिल अपिलार्थीने अशाच प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. मुनीर खान यांची मूळ प्रत आलेली होती काय? व ती ऑर्डर श्री. मुनीर खान यांना देण्यात आली का? जर त्यांच्याजवळ मुख्य कार्यालयाची ऑर्डर नव्हती तर यांनी कोणाच्या आदेशानुसार श्री. मुनीर खान यांना रिलीव्ह केले, अशा प्रकारची त्यांना देय नसलेली माहिती मागविली आहे. अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस देय नसताना अपिलार्थीस दिली आहे. ती माहिती वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदींनुसार विसंगत असल्यामुळे,

अपिलार्थीस मूळात देय होत नाही. या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, श्री. मुनीर खान यांच्या आदेशाच्या प्रतीबाबत जर त्यांची काही तक्रार असेल तर त्यांनी या तक्रारीची दाद राज्य विद्युत मंडळाच्या सक्षम प्राधिकरणाकडून मागवून घ्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अद्यापही ही माहिती अपिलार्थीस अर्धवट का वाटते, याचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अथवा त्यांनी त्यांचे हे अभिप्राय आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये सबळ पुराव्यासह स्पष्ट केलेले नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मराठीत माहिती दिली नाही, असा आक्षेप त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये घेतला आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे इतर भाषामध्ये भाषांतर करुन देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना इंग्रजी भाषेत पुरविलेली माहिती मराठीत भाषांतर करुन पुरविण्याची मागणी, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, द्वारा, श्री. मोहमंद खान ताज खान यांचे घर, आराफात मस्जिदसमोर, केराडपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (औ. परिमंडळ), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (परिमंडळ), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४०

निर्णय दिनांक १९.०१.२०१०

१ श्री. औरादे हणमंत नागप्पा, : अपिलार्थी
रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, देगलूर रोड,
(निडेबन रोड), उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
उदगीर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर

त्रयस्थ पक्ष : अध्यक्ष / सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संमिश्र सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., उदगीर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्व माहिती सत्य प्रतीत मिळाली नाही. तसेच या प्रकरणी त्यांना अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने संबंधित माहिती अधिकारी दोषी असल्याने त्यांचेवर

अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे शास्ती लावावी व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिमी विनामूल्य देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर संमिश्र सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., उदगीर यांच्या संदर्भात " दिनांक १२.०२.२००७ आणि १२.१२.२००७ या दोन दिवशी संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्राच्या प्रती व या दोन प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या प्रत " अशी माहिती व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलर्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६.०५.२००८ रोजी उपस्थित राहिले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती हस्तांतरित करण्यात आली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती गृहनिर्माण संस्थेस अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या दिनांक ०४.०७. २००८ रोजीच्या अपील अर्जावर सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी निर्णय दिलेला आहे. या प्रकरणी सहायक निबंधक, सहकारी संस्था हे माहिती अधिकारी आहेत व जिल्हा उपनिबंधक हे अपिलीय अधिकारी आहेत. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद व त्यावरील अपिलावर देखिल सहायक निबंधकाने निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे गृहनिर्माण संस्थेच्या दिनांक १२.०२.२००७ आणि १२.१२.२००७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. तथापि संबंधित गृहनिर्माण संस्थेने दिनांक १२.०२.२००७ रोजी सहायक निबंधकांकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि त्यावर सहायक निबंधकाने दिलेल्या निर्णयाची प्रती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता सत्य प्रतीमध्ये व विनामूल्य अपेक्षित आहे. तसेच त्यांनी आयोगास संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची देखिल त्यांच्या युक्तिवादामध्ये विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक १०.०१.२०१० पासून रुजू झाले असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची राहिलेली कथित माहिती ही, त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे त्यांना आढळून आले तर ते, ही माहिती अपिलार्थीस तात्काळ हस्तांतरित करतील.

त्रयस्थ पक्ष तथा सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संमिश्र सहकारी गृहनिर्माण संस्था, उदगीर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे या संस्थेचे माजी अध्यक्ष होते. त्यांना अध्यक्ष पदावरुन बडतर्फ करुन सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती केली होती. नंतर झालेल्या निवडणूकीमध्ये अपिलार्थीची वर्णी न लागल्यामुळे ते सहायक निबंधकाला सतत उपद्रव देण्याचा प्रयत्न करत असतात. माहिती अधिकाराचा दुरुपयोग करुन त्यांच्यावर दडपण आणत असतात. अपिलार्थीस वेगळ्या अर्जासंदर्भात त्यांनी विचाराधीन

प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जामध्ये मागणी केलेली माहिती यापूर्वी दोन वेळा दिलेली आहे. तसेच याच माहितीच्या मागणीकरता दिनांक २३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे सुनावणी झालेली आहे. केवळ संस्थेच्या कार्यकारी मंडळास आणि संबंधित कार्यालयास उपद्रव देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी यांनी संस्थेस विनाकारण कागदपत्राचा खर्च व वेळेचा अपव्यय करावयास लावलेला आहे आणि संस्थेवर त्यांनी भुर्दंड बसविलेला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती उघड करु नये.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संमिश्र सहकारी गृहनिर्माण संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२.०२.२००७ आणि १२.१२.२००७ रोजी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आणि सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस अद्यापपावेतो संस्थेने दिनांक १२.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सहायक निबंधकांकडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि त्यावरील निर्णयाच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस देणे बाकी आहे. आयोगाने आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असलेल्या या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२.०२.२००७ रोजी सादर केल्याचे आयोगास आढळून येत आहे. या माहितीमध्ये संस्थेने त्यांच्या सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे व या प्रस्तावाची संस्थेच्या कार्यकारीणीच्या ठरावाची व संस्थेच्या ले-आऊटची प्रत पाठविल्याचे दिसून येत आहे. ही माहिती सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांच्या प्रत्यक्षात ताब्यात आहे. त्यामुळे त्यांना ही

माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्रयस्थ पक्षाच्या संबंधित असेल आणि ही माहिती उघड करण्यासाठी जर त्रयस्थ पक्षाने त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या वर्तनावर हरकत घेतली असेल तर अशा वेळी अर्जदाराच्या वर्तनाची दखल घेऊन अर्जदारास माहिती देण्याबाबत निर्णय घेण्याची कोणतीही तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नसल्यामुळे, त्रयस्थ पक्षाचा अपिलार्थीस माहिती उघड करण्यासाठीचा त्यांच्या वर्तनासंदर्भाचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन नंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी गेले याचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु न शकल्यामुळे, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची केलेली विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व साक्षांकित स्वरुपात, व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. औरादे हणमंत नागप्पा, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, देगलूर रोड,

(निडेबन रोड), उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४१

निर्णय दिनांक १९.०१.२०१०

१ श्री. शफी आहेमद खाँ पठाण, : अपिलार्थी
रा. मंडई पेठ, मु.पो. परंडा, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय,
परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा निबंधक, जिल्हा निबंधक
कार्यालय, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : दुय्यम निबंधक, श्रेणी - १, परंडा, जि. उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक (निम्न श्रेणी), वर्ग - १, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दुय्यम निबंधक, परंडा यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुर्णतः दिली नसल्याने त्यांनी सह जिल्हा निबंधक, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी जन

माहिती अधिकारी यांना अर्धवट दिलेली माहिती अपिलार्थीस पूर्णतः द्यावी, असे दिनांक ०३.११.२००८ रोजी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये पुढे, त्यांना अद्यापपवेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त असलेली माहिती विनामूल्य देण्याचे आयोगाने आदेशित करावे व संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१.०१.२००८ ते ३१.०८.२००८ या कालावधीमध्ये परंडा शहरात खरेदी विक्री झालेल्या संपूर्ण दस्त क्रमांकाची यादी, माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील दुय्यम निबंधक व दोन लिपीक व शिपाई परंडा मुख्यालयी राहतात का? राहत असतील तर त्यांचे राहण्याचे पत्ते, दुय्यम निबंधक व कर्मचारी यांच्या कार्यालयीन कामकाजाची वेळ व दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये दररोज किती वाजता येतात, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्टॅम्प व्हेंडर कार्यालयाच्या दरवाज्यासमोर बसतात त्यांना आपली परवानगी आहे का? असल्यास त्यांच्या परवान्याची प्रत, आपल्या कार्यालयात स्टॅम्प व्हेंडर यांना खरेदी विक्री लिहण्याचे अधिकार आहेत का? व त्यांना बॉंड रायटरचे लायसन आहे का? दुय्यम निबंधक कार्यालयातील बॉंड रायटरच्या नावासह तपशील - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५.०९.२००८ व १३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती देऊ केली. त्याप्रमाणे अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या

या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०३.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व विलंबाने माहिती दिली असल्यामुळे, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्यात यावी. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणती माहिती दिली नाही, अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील दुय्यम निबंधक, लिपीक व शिपाई यांच्या निवासस्थानाचे पत्ते दिलेले नाहीत व तसेच त्यांच्या कार्यालयामध्ये बसणाऱ्या स्टँम्प व्हेंडरच्या परवान्याची प्रत दिलेली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या दोन मुद्यांवरील माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. स्टॅम्प व्हेंडरच्या परवान्याची प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसतात त्यांच्याकडे फक्त परवान्याचे नूतणीकरण करण्याचे काम आहे, या परवान्याच्या प्रती जिल्हा निबंधक कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे, त्यांनी या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली असून, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात आणि जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी अशा स्वरुपाची आहे. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे दुय्यम निबंधक व त्यांच्या कार्यालयातील दोन लिपीक व शिपाई यांच्या निवासस्थानाचे पत्ते हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी संबंधितांची कोणतीही हरकत असण्याची शक्यता आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद जरी वादाच्या प्रयोजनार्थ स्वीकृत केला तरी आयोगास असे आढळून आले आहे की, ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती, ती त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे उपलब्ध होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दिनांक २४.०९.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत एका पत्राद्वारे पाठवून, या पत्राची प्रत, त्यांनी अपिलार्थीस देणे हे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अभिप्रेत होते. परंतु त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती जिल्हा निबंधक, उस्मानाबाद यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ६ शी संबंधित देय माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त कालावधीमध्ये त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुर्वनियोजीत वेळी व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ६ शी संबंधित देय माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शफी आहेमद खाँ पठाण, मंडई पेठ, मु.पो. परंडा, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी - १, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक (निम्न श्रेणी), वर्ग - १, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४२

निर्णय दिनांक १९.०१.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष रामराव कदम,<br>मु. पो. करंजाळा (बाराशिव), ता. वसमत, जि. हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे संगनमताने माहिती देण्याचे टाळत असून, प्रथम अपील केल्यानंतर विशिष्ट कालावधीत अपील निकाली काढणे त्यांना बंधनकारक असताना देखिल हेतुपुरस्सर जाणूनबुजून अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील निकालात न काढता माहिती अधिकार अधिनियम २००५ चा भंग केला आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या सेवापुस्तीकेत त्याची नोंद करुन घेऊन, त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी व योग्य ती शास्ती लावून अपिलार्थीस माहिती देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, बी. रघुनाथ, कला महाविद्यालय, परभणी यांच्याकडे, त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सन २००० ते २००१ व २००८ ते २००९ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" राष्ट्रीय माहिती अधिकार २००५ कलम ४ (ख) (२) नुसार आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तयार केलेल्या माहितीची सत्यप्रत. सदर माहिती तयार केली नसेल तर दोषी अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम इ. बाबतची सविस्तर माहिती "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यास महाविद्यालय असमर्थ आहे, असे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती योग्य ती फी अदा केल्यानंतर अपिलार्थीस देण्याचे आश्वासीत केले. या प्रतिसादाने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २५.०९.२००८ रोजी प्राप्त झाला. परंतु या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक २२.०८.२००८ अशी तारीख टंकलिखीत करुन ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने सादर केलेल्या अपिलाची सुनावणी घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नसल्याचे नमूद केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ४ (ख) (दोन) नुसार त्यांच्या महाविद्यालयात तयार करुन ठेवलेली माहिती मागितली होती. अधिनियमातील कलम ४ (ख) (दोन) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

"हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत, - (दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये अशी माहिती प्रसिध्द करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील. "

यावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये याची माहिती अपेक्षित आहे. ही माहिती संबंधित महाविद्यालयाने अधिनियमातील तरतुदीप्रमाणे स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची अशा स्वरुपाची असल्यामुळे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २७.०८.२००८ रोजीचा आहे. मात्र यावर आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसोबत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत (मूळ अर्जाच्या अगोदरची तारीख असलेली) आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रत्यक्षात अपिलार्थीचा दिनांक २२.०८.२००८ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज दिनांक २५.०९.२००८ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी ५ महिन्यानंतर म्हणजे, अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर, अपिलार्थीस प्रतिसाद दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अशा प्रकारच्या विलंबाने निर्णय देण्याची ही पध्दत सर्वथा गैर व चुकीची आहे, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील सादर करताना अयोग्य कागदपत्रे दाखल करुन आयोगाची दिशाभूल करण्याचे प्रयत्न करु नयेत, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष रामराव कदम, मु. पो. करंजाळा (बाराशिव), ता. वसमत, जि. हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४७

निर्णय दिनांक १९-०१-२०१०

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपिलार्थी
व्दारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका
धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका
धारुर, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी व तसेच त्यांच्या या प्रकरणी त्यांनी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २९-०९-२००८ रोजी प्राप्त झाला त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धारुर यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी तहसीलदार, धारुर यांनी आयोगास त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या ह्या विधानापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन असे सिध्द होत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २८-१०-२००८ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत होती. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२००९

रोजी म्हणजे ६९ दिवसांच्या विलंबाने दिली आहे. तसेच अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२००९ रोजी माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. म्हणजे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे. अशा प्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती संपूर्णपणे त्यांना न देता त्यांना विलंबाने व अपूर्ण माहिती दिली असल्याचे येथे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस ६९ दिवसाच्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये १७,२५० (अक्षरी रुपये सतरा हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या कालावधीमध्ये अपिलार्थीचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा ५ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी.

३.	संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल एकूण रुपये १७,२५०  (अक्षरी रुपये सतरा हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. संदीपान आप्पाराव थोरात, व्दारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२	जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४८

निर्णय दिनांक १९-०१-२०१०

१ श्री. राजेंद्र शामराव पाटील, : अपिलार्थी

मु. पो. हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निलंगा,

तालुका निलंगा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००९ रोजी फेरसादर केलेले दिनांक १९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे हंद्राळ, तालुका निलंगा येथील जमीन सर्वे नंबर २८/ब, २८/अ व २७/ब या जमिनीची मोजणी करुन मालनबाई शामराव पाटील यांचा हिस्सा कायम केलेल्या

नकाशाची प्रत व मोजणी रजिस्टर क्रमांक २१/०६ कोर्ट वाटपाची नक्कल मिळणेबाबत ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्रकरणाशी संबंधित आहे त्या प्रकरणाचा शोध घेण्याचे चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले. परंतु विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी शासकीय सेवेतून निवृत्त झाले असून या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांची बदली लातूर येथे झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविलेली नाही. त्यांनी या प्रकरणाचा शोध घेऊन संबंधित अभिलेखे सापडल्या-नंतर लागलीच दिनांक ०६-०१-२०१० रोजी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असावे असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने ज्या कारणास्तव आयोगाकडे व्दितीय अपील केले तो त्यांचा उद्देश साध्य झालेला आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याचे आदेश देण्यासाठी आयोगास विनंती केली आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आता सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही कार्यवाहीचे आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस अपेक्षित माहिती आता प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र शामराव पाटील, मु. पो. हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२७

निर्णय दिनांक १९-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रत्नाकर लक्ष्मणराव देशपांडे,<br>रा. नंदनकर दलाल वाड्याजवळ, देवगल्ली, मंगळवारा,<br>हिंगोली | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, सिंचन उपविभाग क्रमांक ३,<br>हिंगोली | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर,<br>जिल्हा हिंगोली | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण २२ मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमानुसार अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचे जोडपत्र ब अपील अर्जासोबत कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय पारीत केला गेला नाही. परिणामी अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित राहिले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाबरोबरचे जोडपत्र ब व इतर सहपत्रे याच्या प्रती आता कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना सादर कराव्यात. अपिलार्थीच्या या प्रती प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रत्नाकर लक्ष्मणराव देशपांडे, रा. नंदनकर दलाल वाड्याजवळ, देवगल्ली, मंगळवारा, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सिंचन उपविभाग क्रमांक ३, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग,

वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४३१
निर्णय दिनांकः २०-०१-२०१०

१. सौ. कविता अ.गौर, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सदस्य सचिव,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. १८.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी श्री. वाकोडे यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे आणि तसेच माहिती अधिकाऱ्याने दि. २०.१२.२००८ व ०७.०१.२००९ रोजी दोन वेळा दिलेली माहिती अपुरी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दि. २२ जुलै,२००८ ते ०५ नोव्हेंबर,२००८ या

कालावधीमध्ये 'राजपूत भामटा' जातीची किती वैधता प्रमाणपत्रे देण्यात आली, या विषयावर एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १८.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.-१ यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे आणि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. कविता अ.गौर, प्लॉट क्र.२, बिल्डींग सी-१,सारानगर,एन-१,सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४३२
निर्णय दिनांकः २०-०१-२०१०

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी
रा.परळी (वै.), जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी गेटपासची माहिती न दिल्यामुळे आणि दिलेली माहिती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागातील श्री. जी.एन.तापडीया,ठेकेदार,गंगाखेड, मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन कंपनी,परभणी, मे.शक्ती कन्स्ट्रक्शन कंपनी परभणी, मे. विश्वशक्ती कन्स्ट्रक्शन, ठेकेदार,परभणी यांच्या प्रत्येक कामासाठी दि. ०१.०१.२००६ ते ३०.०८.२००८ या कालावधीमध्ये

पूर्ण विभागात वापरलेल्या डांबराच्या गेटपासची प्रत व मोजमापपुस्तिकेत त्याची नोंद घेतलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात, मे.विश्वशक्ती कन्स्ट्रक्शन,परभणी या ठेकेदार कंपनीचे डांबरी गेटपास त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत, त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या डांबरी कामाच्या निविदेमध्ये संबंधित ठेकेदाराने स्वखर्चाने डांबर आणण्याची तरतूद होती त्यामुळे डांबरी पासची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळवून याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस मोजमाप पुस्तिकेची प्रत पाठविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.१०.२००८ रोजी जिल्हाधिकारी,परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जिल्हाधिकारी,परभणी यांनी निश्चितपणे कोणती कार्यवाही केली, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिलेला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या डांबरी गेट पासची माहिती मागितली आहे, असे गेट पास जन माहिती अधिकारी यांनी ठेकेदारास देयक अदा करण्यापूर्वी सादर करणे संबंधित त्रयस्थ पक्षास बंधनकारक आहेत किंवा कसे, हे देखील

आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही अथवा यासंदर्भात खुलासा करण्यासाठी नगर परिषद,गंगाखेड यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे एकंदरीत अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगास कोणतेही आदेश निर्गमित करता येत नाहीत. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांना संबंधित मुख्याधिकारी, नगर परिषद,गंगाखेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २०-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत संपत मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ,जि.बीड-४३१ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगर परिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला,सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस, वरळी,मुंबई- ४०० ०३०.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४९
निर्णय दिनांक: २०-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दौलतराव महिपतराव कहाळे,<br>रा.वझर (सरकटे), ता.मंठा, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका भूमी अभिलेख निरीक्षक,<br>जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा भूमी अभिलेख निरीक्षक, जालना | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख,जालना
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक,भूमी अभिलेख,जालना
त्रयस्थ पक्ष : श्री.राजाराम महिपतराव कहाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जालना शहरामध्ये स.नं.४७१/क च्या पी.आर.कार्डसंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस यासंदर्भातील निर्णय कळविला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करुन अपिलार्थीस दि. २५.०२.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दि.३१.१२.२००९ रोजी रुजू झाले असून त्यांच्या कार्यालयात या प्रकरणाच्या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्यांना आढळून आली नाहीत. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते देखील जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख या पदावर तीन महिन्यांपासून बदलून आले असून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अंदाजे ५० टक्क्याहून अधिक कर्मचारी निलंबित झाले आहेत. त्यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेखे इतस्ततः विखुरलेले आहेत आणि महत्त्वाची कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी सर्वच कर्मचारी व अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी चालू आहे.तथापि अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाकम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली दहाही मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय

होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली, 'सदर लेआऊट नगर परिषद,जालना यांच्याकडून मंजूर करण्यात आला आहे काय?', ही माहिती अपिलार्थीस याच कारणास्तव देय होत नाही. तसेच याच मुद्यामधील, 'बेटरमेंट चार्जेस' हे नगर परिषदेकडे भरावयाचे असल्यामुळे आणि याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही प्रकारे उपलब्ध असल्याचे संभवत नसल्यामुळे बेटरमेंट चार्जेसच्या संदर्भातील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयाकडे भूखंडाचे लेआऊट मंजूरीसाठीचे प्रस्ताव कधीही प्राप्त होत नाहीत. लेआऊट मंजूरीचे अधिकार त्यांच्या कार्यालयास नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यावरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ च्या संदर्भात, "श्री. राजाराम महिपतराव कहाळे यांच्या नावाचे स.नं.४७१/क मधील पी.आर.कार्ड", ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्यामधील उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस स.नं.४७१/क ची अद्ययावत प्रत व मोजणी फी भरण्याची पध्दत आणि कालावधी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. या मुद्यामधील उर्वरित माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्र. १० मधील संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती यांचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्री. पी.डी.चव्हाण (सध्या निलंबित) यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन आणि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव (महसूल) यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्री. पी.डी.चव्हाण (सध्या निलंबित) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दौलतराव महिपतराव कहाळे,रा.वझर (सरकटे),पो.बेलोरा, ता.मंठा, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५०
निर्णय दिनांक: २०-०१-२०१०

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
सिरसगाव घाटी, ता.बदनापूर,जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

त्रयस्थ पक्ष : स्वातंत्र्यसेनानी शेका पाटील कोंडीबा पाटील शेजुळ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, स्वातंत्रसेनानी शेका पाटील कोंडीबा शेजुळ यांना भाऊ किती, त्यांची संपूर्ण नावे,पुतणे किती त्यांची संपूर्ण नावे, मुले किती, त्यांची संपूर्ण नावे, मुली किती, त्यांची संपूर्ण नावे व त्यांच्या सासरच्या आडनावासह गाव ,तालुका,जिल्हा, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. तथापि

या नंतर अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती,बदनापूर,जि.जालना यांच्याकडे दि. २५.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. त्यावेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेला मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही ही बाब उघडकीस आली. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. १३.१०.२००८ रोजी प्रथमतः प्राप्त झाला. या अर्जास अनुसरुन, तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.१०.२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादाद्वारे कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांनी स्थानिक नागरिकांकडे चौकशी करुन नंतर ती तयार करुन अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीच्या मुलींच्या सासरची नावे त्यांना प्रयत्न करुनही स्थानिक नागरिकांकडून कळू शकली नाहीत. त्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे मूळात उपलब्ध नव्हती, परंतु तरीही अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केला असल्यामुळे त्यांनी गावामध्ये स्थानिक चौकशी करुन त्यांना जेवढी माहिती स्थानिक नागरिकांकडून प्राप्त करुन घेणे शक्य झाले, तेवढी त्यांनी प्राप्त करुन घेतली व अपिलार्थीस दि. २१.१०.२००८ रोजी पुरविली. ग्रामपंचायतीच्या कोणत्याही कार्यपध्दतीनुसार अथवा कोणत्याही संकेतानुसार गावातील ग्रामस्थांच्या आपापसातील 'नातेसंबंध' अशी माहिती त्यांच्याकडे सार्वजनिक अथवा गोपनीय स्वरुपात ठेवली जात नाही.

वरील घटनाकम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरीही अशाप्रकारची गावातील ग्रामस्थांचे नातेसंबंध व त्यांच्या वंशावळीची माहिती कोणत्याही अधिनियमाद्वारे अथवा परिपत्रकाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही स्वरुपात ठेवली जात नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. या प्रकरणी देखील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती, त्यांनी ही माहिती गावातील स्थानिक नागरिकांच्याकडून तोंडी स्वरुपात प्राप्त करुन घेतली व नंतर ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थीस माहिती देण्याची ही पध्दत सर्वथा गैर व चुकीची आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. इत:पर त्यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील एखाद्या अभिलेख्यावर उपलब्ध असेल तर ती देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती व अभिलेखे उपलब्ध करुन ठेवण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये मूळात अस्तित्त्वात नसल्याने, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होणार नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,अंबाली निवास,समतानगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सिरसगाव घाटी, ता. बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९९
निर्णय दिनांक  २०/०१/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी बापुराव भोसले,<br>रा. वैजोडा, पो.रोहिना, ता.परतूर, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. शिवाजी बापुराव भोसले यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २१.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०/०१/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी बापुराव भोसले, रा. वैजोडा, पो. राहिना, ता. परतूर, जि. जालना.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७१
निर्णय दिनांक: २०-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. उत्तमराव जगन्नाथराव लुंगारे,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष,<br>गुरुजन को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,<br>सावरकर चौक, टिळकनगर, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२०.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, गुरुजन को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांनी त्यांच्या दि. ०६.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांच्या दि. ०८.०२.२००६ रोजीच्या परिपत्रकानुसार गृहनिर्माण संस्थेस माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. सचिवांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १८.१०.२००८ रोजी पारित

केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस आवश्यक असलेली न्यायप्रविष्ट प्रलंबित केसेस वगळून संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष, गुरुजन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., टिळकनगर, औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतर अपूरी,त्रोटक आणि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a</u>**

**<u>Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था,तालुका औरंगाबाद यांचे दि. १८.१०.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२१७१/०८ फेटाळण्यात येत आहे.
२. उपनिबंधक,सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १८.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २०-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उत्तमराव जगन्नाथराव लुंगारे, प्लॉट नं.१०, गुरुजन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सावरकर चौक, टिळकनगर, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

२. अध्यक्ष, गुरुजन सहकारी गृहनिर्माण संस्था,मर्या., प्लॉट नं.३, A, सावरकर चौक, टिळकनगर, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७२
निर्णय दिनांक: २०-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. एस.आर.पवार,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. सचिव,<br>सुजाता गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., हर्सूल,<br>जळगांव रोड, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०६.११.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, सुजाता गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., हर्सूल,औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २५.०२.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सचिव, सुजाता गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., हर्सूल,औरंगाबाद यांना

आदेशित केले. यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State**

**within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था,तालुका औरंगाबाद यांचे दि. २५.०२.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२१७२/०८ फेटाळण्यात येत आहे.
२. उपनिबंधक,सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. २५.०२.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २०-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एस.आर.पवार, बी-२, पंचायत समिती कॉर्टर, गणेश कॉलनी, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद.

२.	सचिव, सुजाता गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., हर्सूल, जळगांव रोड, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२७

निर्णय दिनांक २०.०१.२०१०

१ श्री. संतोष रामदास करपे, : अपिलार्थी

रा. साळीवाडा, मु. पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण

विकास यंत्रणा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००४ ते २००८ या कालावधीमध्ये, स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार - केंद्रीय एकवेळ अर्थसहाय्य या योजनेतून बांधलेल्या व्यापारी गाळयांच्या वाटपासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बांधकाम पूर्णत्वाचे वर्ष, सदर गाळे भाडेतत्वावर घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या, गाळे वाटप विलंबाची कारणे, या संदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वाटप सूचना व आदेशाची प्रत, गाळे वाटपाचे अधिकार कोणास आहेत व गाळे कोणाच्या ताब्यात आहेत व अद्याप वाटप न झाल्याने शासनास भाड्यापोटी झालेल्या नुकसानीस जबाबदार कोण - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, प्रकल्प संचालकाने व्यापारी तत्वावर शासनाच्या अर्थसहाय्याद्वारे गाळे बांधले होते. गेली ४ वर्ष सदरचे गाळे हे वापराविना तसेच पडून आहेत व पर्यायाने शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, या नुकसानीसाठी संबंधित गट विकास अधिकारी हे जबाबदार आहेत. तसेच त्यांनी गट विकास अधिकाऱ्यांकडे त्यांच्या बचत गटास गाळे वाटपासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना गाळे वाटप न झाल्याने त्यांनी ही माहिती मागविली आहे. त्यांनी आपल्या

युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही आदेशित करावी. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०५.११.२००८ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही भाग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांच्याशी संबंधित असल्याने आणि ही माहिती तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद श्री. कुलकर्णी (सध्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद या पदावर कार्यरत) यांनी माहिती अधिकाऱ्यांकडे उशिरा माहिती पाठविल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना उशीर झाला. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी एकूण ४ गाळे दारिद्र्यरेषेखालील बचत गटांना वाटप केले आहेत. तथापि सदर बचत गटांनी भाडे करारनामा करुन न दिल्याने अद्यापपावेतो हे गाळे न वापरलेल्या स्थितीत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १५.०७. २००८ रोजीच्या आपल्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. तथापि व्यक्तिशः माहिती मागवूनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेल्याचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर, आयोगाने विचारणा केल्यानंतर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकरी यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेतली, सुनावणीचे आदेश दिनांक १२.०१.२००९ रोजी पारित केले व हे आदेश अपिलार्थीस दिनांक ३१.०१.२००९ रोजी प्राप्त झाले. यासंदर्भात अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्राप्त आदेशाची प्रत आयोगास दाखविली.

त्यावरुन अपिलार्थीस हे आदेश दिनांक ३१.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. या अपील निर्णयावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०६.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील नोंदविले. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती न पुरविता ८ दिवसाच्या विलंबाने अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, असे आढळून येत आहे. थोडक्यात, अपिलार्थीने दिनांक १५.०७.२००८ रोजी मागितलेली माहिती त्यांना या प्रकरणी दिनांक ०५.११.२००८ रोजी म्हणजे, अंदाजे अडीच महिने इतक्या विलंबाने प्राप्त झाली आहे. या विलंबास संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांचे सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद श्री. कुलकर्णी यांनी विलंब लावल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अशाप्रकारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदतीपेक्षा विलंब लावून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे, अद्यापपावेतो गाळे वाटप न झाल्याचे मुद्दे त्यांच्या युक्तिवादा-मध्ये, उपस्थित केले आहेत. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, आवश्यकता वाटल्यास त्यांनी त्यांच्या गाऱ्हाण्याची तड लावण्याकरिता ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद अथवा सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय यांच्या निदर्शनास आणावी. जेणेकरुन अपिलार्थीच्या गाऱ्हाण्याची तड लावणे त्यांना शक्य होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक श्री. कुलकर्णी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष रामदास करपे, रा. साळीवाडा, मु. पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२८

निर्णय दिनांक २०.०१.२०१०

१ श्री. रुपचंद लक्ष्मण गाडेकर, : अपिलार्थी

मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद

ग्रामीण पाणी पुरवठा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे व या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी

अभियंता, पाणी पुरवठा जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०१.०४.२००५ ते २०.०६.२००८ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०९.२००८ रोजी निर्णय दिला. त्यांचा हा निर्णय दिनांक १२.११.२००८ रोजी निर्गमित करण्यात आला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना यापूर्वीच पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस निश्चितपणे त्यांनी कोणती माहिती पुरविली, हे आयोगाने विचारले असता, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांना आयोगास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दाखविता आली नाही. यावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही, असा निष्कर्ष काढण्यास हरकत नसावी.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. व्यक्तिशः माहितीची

मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित झाले, याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच या मुद्यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली कथित माहिती पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून आले नाही. या संदर्भात उपस्थित अधिकाऱ्यास आयोगाच्या कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता आले नाही. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहिती पुरविली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०९.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना आज रोजी अपिलार्थीस या अर्जासंदर्भात पुरविलेली माहिती आयोगास दाखविता आली नाही. यावरुन औरंगाबाद जिल्हा परिषदेमधील पाणी पुरवठा विभागाची कार्यक्षमता व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अमलबजावणीच्या संदर्भातील नकारात्मक मानसिकता लक्षात येते. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजण्याची तरतुद आहे, यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी श्री. डाकोरे डी. एच. कार्यकारी अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व कर्मचारी व सहायक यांचेवर अनुक्रमे, सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई आणि

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अनुक्रमे संबंधित कार्यकारी अभियंता, श्री. डाकोरे डी. एच. व कार्यकारी अभियंता याच्या कार्यालयातील जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर असलेले या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रुपचंद लक्ष्मण गाडेकर, मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२९

निर्णय दिनांक २०.०१.२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे,<br>रा.राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५,२६ जळगाव रोड,<br>पोस्ट हर्सुल, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>पाणी पुरवठा अधिकारी, महानगरपालिका<br>सिडको झोन क्र. "ब", औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),<br>महानगरपालिका, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, मुदतीनंतर दिलेली माहिती ही खोटी, अर्धवट आणि दिशाभूल करणारी अशी आहे. त्यांचे दिनांक २१.१२.२००८ रोजीचे पत्र विचारात न घेता हेतुपुरस्सर त्यांचे अपील निकाली काढले

आहे. त्यामुळे संबंधितांना अपिालर्थीस विनामूल्य व परिपूर्ण माहिती देण्याचे आदेशित करावे व अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधितांवर कायदेशिर कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००२ ते दि. ११.०९.२००८ या कालावधीशी संबंधित जळगांव रोडवरील मुख्य जलवाहिनीवरील अधिकृत / अनधिकृत नळ जोडणीच्या संदर्भात विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजी उप अभियंता, पाणी पुरवठा - २, महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज वर्ग केला. तथापि त्यांच्याकडून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग आणि या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २७.११.२००८ पर्यंत परिपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्यानुसार उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग क्रमांक - २ यांनी अपिलार्थीस दिनांक २६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तथा तत्कालीन उप अभियंता यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर लागलीच दिनांक २६.११.२००८ रोजी त्यांच्याकडील व उपलब्ध व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. महानगरपालिका औरंगाबादमध्ये पाण्याच्या १/२" जोडणीची मंजूरी वॉर्ड अभियंत्याकडून व त्यावरील मोठ्या व्यासाची जोडणी उपअभियंत्याच्या पातळीवर मंजूर केली जाते. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना दिनांक ४.१०.२००८ रोजी प्राप्त झाला होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही भाग वॉर्ड अभियंता (वॉर्ड 'ब') यांच्याशी संबंधित होता. त्यांनी अपिलार्थीस कधी माहिती दिली हे त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही महानगरपालिकेच्या वॉर्ड अभियंता (वॉर्ड -ब) आणि पाणी पुरवठा - २ या विभागाशी संबंधित होती. त्यापैकी पाणी पुरवठा - २ विभागाने अपिलार्थीस दिनांक २६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिलेली आहे. परंतु वॉर्ड अभियंता (वॉर्ड - ब) यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे किंवा कसे, हे आयोगास पाणी पुरवठ्याच्या उपस्थित प्रतिनिधीला सांगता आले नाही. यावरुन वॉर्ड अभियंत्याने अपिलार्थीस माहिती दिली नाही, असा निष्कर्ष काढण्यात येत आहे व कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती वॉर्ड अभियंत्याशी संबंधित होती ती माहिती त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना संबंधितांकडून प्राप्त झालेली माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी आहे, असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस संबंधितांकडून प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे या संदर्भात त्यांनी

कोणतेही स्पष्टीकरण आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये दिलेले नाही. तसेच हे स्पष्टीकरण तोंडी स्वरुपात देण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या अपील अर्जातील हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, रा.राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५,२६ जळगांव रोड, पोस्ट हर्सुल, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ४३०
निर्णय दिनांक २०-०१-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश रमेश पाटील,<br>रा. जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर,<br>उस्मानपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतनपथक कार्यालय (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २०.०१.२०१० रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये

अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली विचाराधीन द्वितीय अपील अर्जाशी संबंधित मूळ अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने, यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे ते आयोगाकडील विचाराधीन अपील क्रमांक ४३०/२००९ हे स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील त्यांच्या दिनांक २०.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ४३०/२००९, दिनांक २१.०१.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश रमेश पाटील, जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय (प्राथमिक), जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५१

निर्णय दिनांक २०-०१-२०१०

१ श्रीमती वच्छलाबाई जिवाजी गुंड, : अपिलार्थी
मु. पो. वाघळूज, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सह धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सेक्रेटरी, सोशल सेंटर संस्था, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, सेक्रेटरी, सोशल सेंटर संस्थेने विविध ठिकाणी पाणलोट क्षेत्राच्या

केलेल्या विकास कामासंदर्भात त्या कामाचे नकाशे, अंदाजित आराखडे, मोजमाप पुस्तिका, गाव पातळीवरील रजिस्टर, मस्टर रजिस्टर, ऑडिट रिपोर्टच्या प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सोशल सेंटर संस्थने मौजे वाघळूज चौकी तांडा, मौजे लमाणतांडा, वाघळूज, टेकाडवाडी लमाणतांडा, वाघळूज, शिंगरमाळ, मौजे अंबोरा, तालुका आष्टी जिल्हा बीड येथील केलेल्या कामाच्या संदर्भात पोष्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती संस्थेकडून घेण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २२-०८-२००८ रोजी आपले अदेश पारीत केले व अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. या निर्णयामध्ये त्यांनी अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित संस्थेस सूचित करण्याचे आदेश पारीत केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी संस्थेस तसे आदेश दिले असता संस्थेने त्यांचे पत्र दिनांक ०३-१०-२००८ व्दारे जन माहिती अधिका-यास कोणतीही माहिती न देता उलट अपिलार्थीने संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार अर्ज केल्यास पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे संस्थेस सोईचे होईल असे कळविले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नाही. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, संबंधित संस्थेस शासनातर्फे नियमितपणे अनुदान प्राप्त होत असते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या संस्थेस जर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे शासनाकडून नियमितपणे अनुदान प्राप्त होत असेल तर ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) (घ) मधील तरतुदीव्दारे सार्वजनिक प्राधिकरण असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीने सुरुवातीला या संस्थेकडे माहिती मागणे गरजेचे होते. अपिलार्थीने ज्या संस्थेसंदर्भात माहितीची मागणी केली आहे ती संस्था धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात नोंदणी झालेली संस्था आहे. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ३७ (एक) (अ) नुसार धर्मादाय आयुक्त, उप आयुक्त अथवा सहायक आयुक्त यांना सार्वजनिक विश्वस्ताचे कोणतेही कामकाज किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेले कोणतेही दस्तऐवज मागण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदी- नुसार ही माहिती सोशल सेंटर या संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ञ) चे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांना या संस्थेकडून प्राप्त करुन घेता येईल अशी तरतूद आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना २० दिवसांचा कालावधी पुरेसा होईल, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन, त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता ही माहिती उघड करण्यासाठी, विशेषतः त्रयस्थ पक्षास नियमितपणे अनुदान प्राप्त होत असल्यामुळे, त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यावाय असू नये.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती वच्छलाबाई जिवाजी गुंड, मु. पो. वाघळूज, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३०

निर्णय दिनांक २०-०१-२०१०

१ श्री. युवराज तुळसीराम मुंडे, : अपिलार्थी
संपादक, " सा. बेरोजगार व्यथा ", मारोती मंदिराजवळ,
शिवाजीनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग,
वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. शिंदे एल. जी.
२. श्री. मामीडवार ए. बी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस. व्ही. बोळेगावे, उपविभागीय अधिकारी, पूर्णा पाटबंधारे उपविभाग, लिंबगांव यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ११-०४-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने आवश्यक ती माहिती त्यांना प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे समाधान झाले असून त्याबद्दल त्यांना कोणताही उजर नाही, असे लिहून दिले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ११-०४-२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे.

तथापि या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती दिनांक ११-०४-२००९ रोजी प्राप्त झाली आहे, या बाबीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे विचारली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी त्यांच्याकडे कधीही व्यक्तिशः हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ज्यावेळी हजर झाले त्यावेळी त्यांना समाधानकारक माहिती व्यक्तिशः हस्तांतरीत करण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्यासंदर्भात कोणताही पुरावा जोडलेला नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत

हा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कार्यवाही आदेशित करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. युवराज तुळसीराम मुंडे, संपादक, " सा. बेरोजगार व्यथा ", मारोती मंदिराजवळ, शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५३

निर्णय दिनांक २०-०१-२०१०

१ श्री. अंकुश एम. पवार, : अपिलार्थी

प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, अयोध्यानगर, सिडको,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ठेवलेल्या सुनावणीमध्ये कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०४-२००६ ते २०-०२-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली. तथापि सुनावणीचा निर्णय न देता बैठकीचे इतिवृत्त जारी केले आणि या इतिवृत्तामध्ये अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या सुनावणीमध्ये अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे ठरले होते असे अपिलार्थीने आज रोजी आयोगास स्पष्ट केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिलेला नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आज रोजी आयोगाकडे त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन प्रथम निर्णय देणे आयोगास, या टप्प्यावर, गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५६

निर्णय दिनांक २०-०१-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक शेषराव बुधवंत,<br>गुरुकृपा सदन, भूमि अभिलेख कार्यालयासमोर, आमदार कॉलनी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी न घेतल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००३-०४ ते २००७-०८ या आर्थिक वर्षातील दिनांक १२-०६-२००७ पर्यंत तालुका कृषि अधिकारी, परभणी सेलू, पाथरी, मानवत, सोनपेठ, गंगाखेड व पालम यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये केलेल्या कामाची व कॅशबुकमधील खर्चाच्या नोंदीची माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात होती. तसेच अपिलार्थीने या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या संदर्भात आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार दिनांक २१-०६-२००७ रोजी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत तालुका कृषि अधिकारी परभणी, सेलू, पाथरी, मानवत, सोनपेठ, गंगाखेड व पालम यांना पाठविली. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००७ रोजी निर्णय दिला. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर होते. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीस प्राप्त माहिती घेण्याबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विनंती केली असता अपिलार्थी माहिती घेण्यास नकार देत असल्याचे, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणताही निर्णय न देता अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना या माहितीची आजही आवश्यकता असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील कॅशबुक-च्या झेरॉक्स प्रती व ७/१२ च्या उता-यांच्या प्रतींचा त्यांच्याकडे तयार असलेल्या माहितीमध्ये समावेश नाही, असे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ७/१२ च्या उता-यांच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. या प्रकरणी त्या संबंधित गावच्या तलाठ्याकडे असल्याने ही माहिती त्यांना अपिलार्थीस देता येणार नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले. तथापि या मुद्दयावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३ ) (एक) प्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही का केली नाही अशी आयोगाने त्यांना विचारणा केली असता, त्यांना या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आयोगास देता आले नाही. अपिलार्थीस आता उर्वरित संपूर्ण माहिती किती दिवसात देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य आहे अशी आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, ही माहिती ते तीस दिवसाच्या आत देऊ शकतील असे त्यांनी आयोगास अवगत केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक शेषराव बुधवंत, गुरुकृपा सदन, भूमि अभिलेख कार्यालयासमोर, आमदार कॉलनी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३३
निर्णय दिनांकः २१-०१-२०१०

१. श्री. शे.अब्दुल पिता शेख बशीर पटेल, रा.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, शहर भूमापन कार्यालय,औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी, नगर भूमापन कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारीः अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील "सीटीएस नं.१९१४६/१/३,Part 'A' हा भाग नसीरोद्दीन यांचा आहे. Part 'A' चे वाढीव विभाजनाच्या संपूर्ण संचिकेच्या प्रतीची 'नक्कल' ", या मुद्यांवरील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केलेल्या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने ज्या सर्व्हेनंबरच्या संदर्भात माहिती मागितली आहे, त्या सर्व्हेनंबरच्या पोट विभाजनासंदर्भात नस्ती उपलब्ध आहे व या नस्तीच्या प्रती त्यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध करुन ठेवलेल्या आहेत. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे स.नं.१९१४६/१/३ मध्ये Part 'B' व Part 'A' अशातऱ्हेचे कोणतेही विभाजन झालेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यावर मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात नाही. परंतु अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या विषयाशी संबंधित आहे, त्या विषयावरील संचिका त्यांच्याकडे उपलब्ध असून या संचिकेची प्रत ते अपिलार्थीस कधीही उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही अर्जदाराची असते. या प्रकरणी अपिलार्थीने अशाप्रकारची त्यांची जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडलेली नाही. तसेच अपिलार्थीच्या माहितीतील Part 'A' व Part 'B' अशी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, मूळात ती अस्तित्त्वात नसल्याने उपलब्ध होऊ शकणार नाही. हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या नस्तीची तपासणी करण्यसासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज केल्यास ही नस्ती, त्यांना तपासणीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून, सदर अर्ज प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन दिली जाईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शे. अब्दुल पिता शेख बशीर पटेल,रा.जहागिरदार कॉलनी, व्हाईट हाऊस,मगरीबी कंपाऊंड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४३४
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा.पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलू,जि.परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतरही त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सेलू तालुक्यामध्ये दि. ०१.११.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या कामासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत रोहयोची कामे करण्यात आली त्या शेतकऱ्यांची नावे, गाव व पत्ते व गट नं., कामावरील मजूरांच्या पत्त्यासह यादी, पगार रजिस्टरच्या छायांकित प्रती, मजूरांच्या सहया अंगठयासह, मजूरीबाबत शासन निर्णयाची छायांकित सत्यप्रत व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास रोहयोच्या कामासाठी प्राप्त झालेला आणि खर्च झालेला व शिल्लक निधी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आता त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता, त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. डी.जी. शिंदे नावाचे तालुका कृषि अधिकारी (सध्या सेलू येथे कार्यरत) यांची नेमणूक झाली होती व तदनंतर एक महिन्यानंतरपासून ते स्वतः जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी विलंब लागला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे केव्हापासून तयार आहे, अशी आयोगाने त्यांना विचारणा केली असता, आयोगाकडील द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीसंदंर्भात त्यांना आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती तयार केल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती देण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. मात्र आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक महिन्याच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तयार करुन ठेवली आहे, हे कारण जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन करु शकत नाही. त्यामुळे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.जी.शिंदे, मंडळ कृषि अधिकारी, सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. बी.एम.अडकिने व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित कार्यालयीन सहायक/कर्मचारी,ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.जी.शिंदे व श्री. बी.एम.अडकिने व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

३. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.जी.शिंदे व श्री.बी.एम.अडकिने व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे,रा.शिवाजी रोड,मुळे गल्ली, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०६
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

१. श्री. बाबूराव भीमराव सूर्यवंशी, : अपिलार्थी
रा.खोपेगाव,ता.जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड विभाग,
नांदेड.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी,
लातूर ग्रामीण उपविभाग,लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २१.०७.२००८ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, रु.२४/- इतके शुल्क भरुन घेऊनही ही ते अपिलार्थीस वेळोवेळी अपूर्ण माहिती देत आले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्लॉटवरील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात माहिती मागविली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या

तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसात मुद्देनिहाय माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये त्यांना अर्धवट माहिती मिळाल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत करुन दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस दि. ०१.०७.२००८ रोजी दिलेली कथित मुद्देनिहाय माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नाही. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तरे व त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अपिलार्थीस दिलेले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात देणे, अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखाद्या विशिष्ट संदर्भावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या विषयावर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाकडे या विषयासंदर्भात केलेला पत्रव्यवहार आणि संबंधित विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही होय.

अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १ संदर्भात अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण मुद्दा क्र. २ व ३ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे आणि त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे जन माहिती अधिकारी यांनी अतिक्रमण करणाऱ्यांना कोणत्या कायद्यान्वये संरक्षण दिले, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ मध्ये अतिक्रमण काढत असताना पोलीस खात्याची नेमकी काय जबाबदारी आहे, या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना जर त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून काही आदेश किंवा परिपत्रके प्राप्त झाली असतील तर अशा आदेशाच्या, परिपत्रकाच्या प्रती त्यांना अपिलार्थीस देणे भाग आहे.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मूळ माहिती व अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४,५ व ६ च्या संदर्भात, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून रु.२४/- इतके शुल्क प्राप्त करुन घेऊनही त्यांना प्रथम अपूर्ण माहिती दिल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२४/- इतके त्यांना परत करावे लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,४,५ व ६ च्या संदर्भातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२४/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबूराव भिमराव सूर्यवंशी, रा.खोपेगाव,पो.वासनगाव,ता.जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,लातूर ग्रामीण उपविभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०७
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

१. श्री. विनोद कल्याणराव देशमुख, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संलग्न विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २१.०१.२०१० रोजीचे एक पत्र स्वत: आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली

आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१०७/०८, दि. २१.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विनोद कल्याणराव देशमुख,कनिष्ठ लिपीक, कृषि उत्पन्न बाजार समिती,नांदेड,द्वारा नांदेड हाऊसिंग सोसायटी,६०,विजयनगर,नांदेड-२.

२. जन माहिती अधिकारी तथा संलग्न विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७३
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

१. श्री. माधव नामदेवराव काळे, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

१. चेअरमन / सचिव, : प्रतिवादी
आसरा सहकारी गृहतारण संस्था मर्यादित, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१४.०३.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे आसरा सहकारी गृहतारण संस्था मर्या., लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २१.०४.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस हवा असलेला संस्थेने त्यांच्याकडे सादर केलेला खात्याचा उतारा निर्णयासोबत देऊन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले.परंतु अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.२१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर हे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या सहकारी गृहतारण संस्थेकडे माहिती मागितली आहे त्या संस्थेचे ते एक सभासद असून या प्रकरणी त्यांच्या दि.१४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या स्वतःच्या कर्जाच्या खाते उताऱ्याची प्रत त्यांनी संबंधित संस्थेस मागितली होती. तथापि या संस्थेने सहायक निबंधक, सहकारी संस्था,लातूर यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या अर्जातील मुद्यांची त्यांना आजही आवश्यकता आहे.

सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी असा युक्तिवाद केला की, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहवित्त महामंडळ,मुंबई (Maharashtra State Cooperative Housing Finance Corporation, Mumbai) हे शासनाचे अंगीकृत व्यवसाय असलेले महामंडळ आहे. या महामंडळामार्फत त्यांच्याकडे गृहबांधणी कर्जासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जदारांच्या विनंतीनुसार अर्जदारांना गृहबांधणी कर्जाचे वितरण केले जाते. तथापि अशाप्रकारचे गृहबांधणी कर्जाचे वितरण सरळ अर्जदारास न करता अशाप्रकारच्या सहकारी गृहतारण संस्थेच्या मार्फत संबंधित अर्जदारांना केले जाते. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित गृहतारण संस्थेस आदेश दिले होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस विसंगत स्वरुपाची माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व सहायक निबंधक,सहकारी संस्था,लातूर यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित माहितीसाठीचा प्रथम अर्ज सचिव, आसरा सहकारी गृहनिर्माण तारण संस्था मर्यादित,लातूर यांच्याकडे केला होता. मात्र या प्रकरणाशी संबधित प्रथम अपील त्यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था,लातूर यांच्याकडे केले होते. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग नाहीत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदींचा भंग होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार संबंधित संस्थेकडे ही माहिती मागवून त्यानंतर आवश्यक वाटल्यास, सहकार विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडे, अपील करता येईल अथवा सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार प्रथम अर्ज करुन त्यांना या प्रकरणी अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेता येईल. अपिलार्थीने असा अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर सहायक निबंधक, सहकारी संस्था हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ अन्वये संबंधित संस्थेकडून ही माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस ती देण्याबाबत विचार करु शकतील.

अशाप्रकारे अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार दाखल केलेला मूळ अर्ज आणि त्यावरील अपील हे वेगवेगळया प्राधिकरणाकडे करुन अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदींचा भंग केला असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २१-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव नामदेवराव काळे, दत्तकृपा निवास, सरस्वती शाळेच्या पाठीमागे, विलास नगर, लातूर, ता.जि. लातूर.

२. चेअरमन / सचिव, आसरा सहकारी गृहतारण संस्था मर्या., व्दारा-विश्वमित्र हॉटेल, औसा रोड, ता.जि. लातूर.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७४
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

१. श्री. आनंद नामदेव सूर्यवंशी, : अपिलार्थी
रा. दाभड, ता.अर्धापूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. चेअरमन / सचिव, : प्रतिवादी
जनता मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्या., दाभड, ता.अर्धापूर, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, अर्धापूर, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक निबंधक,सहकारी संस्था,
तालुका अर्धापूर,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सचिव, जनता मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., दाभड, ता.अर्धापूर, जि. नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अर्धापूर, जि. नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.अर्धापूर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २६.०५.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर केले व त्यांना

हवी असलेली माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष / सचिव, जनता मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., दाभड यांना आदेशित केले. यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्धापूर, जि.नांदेड उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra</u>**

**Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्धापूर, जि.नांदेड यांचे दि. २६.०५.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२१७४/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक,सहकारी संस्था, अर्धापूर,जि.नांदेड यांचे दि. २६.०५.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आनंद नामदेव सूर्यवंशी, मु.पो. दाभड व्हाया बारड, ता.अर्धापूर, जि. नांदेड.

२. चेअरमन / सचिव, जनता मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., दाभड, ता.अर्धापूर, जि.नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.अर्धापूर, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७५
निर्णय दिनांक: २१-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. साळुंके विलास लालासाहेब,<br>रा.कर्जत, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. चेअरमन / सचिव,<br>राष्ट्रपिता ज्योतीराव फुले सहकारी गृहनिर्माण<br>संस्था मर्या., कर्जत, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे चेअरमन / सचिव, राष्ट्रपिता ज्योतीराव फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कर्जत, जि. अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीचे शुल्क रु.३४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २८-०८-२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलर्थीचे आपील मान्य केले व त्यांना हवी असलेली माहिती

तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष / सचिव, राष्ट्रपिता ज्योतीराव फुले सहकारी गृहनिर्माण संस्थ मर्या., कर्जत यांना आदेशित केले. यानंतर शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संस्थेचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना संबंधित संस्थेकडून अद्यापपावेतो अपेक्षित माहिती प्राप्त झालेली नाही.

संबंधित संस्थेच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या संस्थेस शासनाकडून घरबांधणीकरता एकूण ३० % इतके कर्ज दिनांक २१.०७.२००७ रोजी मंजूर झालेले आहे. अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती सोमवंशी कुरीअर, अहमदनगर यांच्यामार्फत दिनांक १८.०७.२००८ व ०९.११.२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे त्यांच्या दिनांक १९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. या संस्थेस शासनाकडून घरबांधणीकरता पुरेशा प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे संस्थेस अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना द्यावी लागेल. संस्थेने ही माहिती अपिलार्थीस खाजगी कुरिअरमार्फत दिनांक १८.०७.२००८ व ०९.११.२००८ रोजी पुरविल्याचे संस्थेचे प्रतिनिधी आयोगास सांगत आहेत. तथापि ही माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. यावर असा तोडगा काढण्यात आला की, संबंधित संस्थेने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत सादर करावी. तदनंतर सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांनी अपिलार्थीच्या मूळ

अर्जासंदर्भात संस्थेकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस, माहिती प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य, व्यक्तिशः व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साळुंके विलास लालासाहेब, पंचायत समिती, कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

२. चेअरमन / सचिव, राष्ट्रपिता ज्योतीराव फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., स्वामी समर्थ मंदिराच्या पाठीमागे, कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ २१०३
निर्णय दिनांक २१.०१.२०१०

१ श्री. संदीप पाटील, : अपिलार्थी
रा. धनसागर, सारा हार्मोनी, आर. एच. नं. ई -१,
कांचनवाडी, नाथपुरम रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,
नाथनगर (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, जायकवाडी
पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, दगडी धरण उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अयोग्य, चुकीची व न मागितलेली माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २०-०१-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक २१०३/२००८ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २१०३/२००८, दिनांक २४-१२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदीप पाटील, धनसागर, सारा हार्मोनी, आर. एच. नं. ई - १, कांचनवाडी,

नाथपुरम रोड, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, दगडी धरण उपविभाग क्र. १, नाथनगर (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०४

निर्णय दिनांक २१.०१.२०१०

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी

मु. पो. पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-११-२००७ रोजी प्रथम अपील करुनही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून, या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी गट ब (अराजपत्रित) ब, क, ड या संवर्गात किती पदे भरली व रिक्त पदे न भरण्याची कारणे, अशी वेगवेगळी संवर्गनिहाय माहिती व तसेच याबरोबर अपंगाचा अनुशेष भरला का व नसल्यास कारण आणि रिक्त पदाची माहिती देखिल त्यांनी या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शिघ्र टपालाद्वारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके चलनाद्वारे भरुन त्यांच्याकडे चलनाची प्रत सादर करण्याचे सूचित केले. तदनंतर दिनांक ११-०३-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. परंतु मधल्या कालावधीमध्ये अपिलार्थीने दिनांक २६-११-२००७ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती दिली आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये अपंगाच्या माहितीचा समावेश नाही. जिल्हा परिषदेच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व खाते प्रमुखांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये, सरळ सेवेची रिक्त पदे ४९५ व पदोन्नतीची रिक्त पदे

२३३ अशी दर्शविली आहेत. परंतु अपिलार्थीस त्यांनी माहिती देतांना फक्त २४ पदे रिक्त असल्याची माहिती दिली आहे. तसेच त्यामध्ये अपंगांच्या रिक्त जागांच्या संख्येचा समावेश नाही. त्यामुळे त्यांना या संदर्भात सत्य माहिती अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०३-२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, जन माहिती अधिकारी यांनी रिक्त पदे न भरण्याची व अपंगाचे अनुषेश न भरण्याची कारणे ही माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याप्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. अपिलार्थीच्या या अर्जातील 'कारणे' हा मुद्दा वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, देय होत आहे. अपिलार्थीस त्यांनी चुकीची माहिती दिल्यापृष्ठ्यर्थ आयोगाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्या सर्व खाते प्रमुखांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०१/१०/२००७ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सरळ सेवा रिक्त पदे ४९५ व पदोन्नतीची रिक्त पदे २३३ अशी माहिती असल्याचे दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०३-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीमधील रिक्त पदांची संख्या या संख्येस मिळतीजुळती नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विसंगत दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस सत्य माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१०-२००७

रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली व वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली सत्य माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीचा दिनांक २६-११-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात सादर न केल्यामुळे ते या अपील अर्जावर कोणताही निर्णय घेऊ शकले नाहीत. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना, त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांकडून त्यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज सादर केला गेला नाही, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विसंगत माहिती देण्याच्या कृतीद्वारे सर्व संबंधितांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय व सत्य माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०५

निर्णय दिनांक २१.०१.२०१०

१ श्री. बुध्दप्रिय कबीर, : अपिलार्थी
द्वारा, चुन्नीलाल जाधव, हॉटेल टाईमपास, डॉ. हेडगेवार
रुग्णालयासमोर, वसंतनगर, जवाहर कॉलनी परिसर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप निबंधक, सहकारी संस्था,
तालुका औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, हायकोर्ट कर्मचारी फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, हायकोर्ट कर्मचारी फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था या त्रयस्थ

पक्षासंदर्भात - या सहकारी संस्थेचे उद्देश, ध्येय, धोरण, संस्था स्थापन झाल्यापासून दिनांक ०७-११-२००७ पर्यंत संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेला लेखा अहवाल व संस्थेच्या प्रोसीडींग बुकच्या प्रती - अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या पत्राद्वारे संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व संबंधित गृहनिर्माण संस्थेस अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हायकोर्ट फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्थेस माहिती घेण्याचे आदेशित केले होते.

त्रयस्थ पक्ष तथा हायकोर्ट कर्मचारी फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी असा युक्तिवाद केला की, उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार त्यांनी दिनांक १२-०३-२००८ रोजी अपिलार्थीस ही माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व २ म्हणजे संस्थेचे उद्देश, ध्येय, धोरण व

संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेला लेखा अहवाल हे सर्वसाधारण परिस्थितीत उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. कारण या संस्थेची नोंदणी उपनिबंधकांकडून केली जाते. ही नोंदणी करताना संस्थेचे उद्देश, ध्येय इत्यादी माहिती संस्थेला नोंदणीसाठी उपनिबंधक कार्यालयात सादर करणे त्यांना अनिवार्य असते. त्याच बरोबर संस्थेने त्यांचा लेखा अहवाल नियमीतपणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार उपनिबंधकांकडे सादर करणे देखिल त्यांना अनिवार्य आहे. तथापि संस्थेच्या प्रोसीडींग बुकच्या प्रती या नियमीतपणे उपनिबंधकांकडे सादर केल्या जात नाहीत. कारण अशाप्रकारचे कोणतेही आदेश जन माहिती अधिकारी यांना शासनाकडून अथवा वरिष्ठ प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले नाहीत. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जी माहिती मागविली आहे तीचे स्वरुप पाहता, ती माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्रयस्थ पक्षाकडील ही माहिती हस्तगत करुन घेण्याचे अधिकार जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार उपनिबंधकांचे आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती संबंधित संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार हस्तगत करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ बरोबर विनामूल्य पुरवावी. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावयाची आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांना प्रतिवादी न ठरवता त्रयस्थ पक्षास प्रतिवादी केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याची त्यांची ही कृती चुकीची आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे त्यांनी या प्रकरणी दिनांक २५-०२-२००८ रोजी पारित केलेले आदेश रद्दबात्तल ठरविण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बुध्दप्रिय कबीर, द्वारा, चुन्नीलाल जाधव, हॉटेल टाईमपास, डॉ. हेडगेवार रुग्णालयासमोर, वसंतनगर, जवाहर कॉलनी परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५२

निर्णय दिनांक २१-०१-२०१०

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी
रा. गणपती गल्ली, घडी टॉवर जवळ, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रमुख लिपीक, कार्यालय नगर परिषद, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या तरतुदीन्वये करण्यात आलेल्या १७ कामांची माहिती व ही कामे त्यांनी ज्या दिवशी पूर्ण केली

त्याबद्दल त्यांनी वरिष्ठांना कळविलेल्या पत्राची प्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी त्यांचा युक्तिवाद फॅक्सव्दारे पाठविला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीनंतर ४४ दिवसांनी अपूर्ण माहिती दिली. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये अंतीमतः विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १६-१२-२००८ रोजी माहिती व्यक्तिशः पुरविली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती यातील विसंगतीबाबत, अधिनियमातील कलम ४ मध्ये नमूद केलेल्या १७ मुद्दयावर नगरपरिषदेने माहिती तयार केली

आहे काय असे त्यांना विचारले असता, त्यांनी ही माहिती तयार करण्याचे काम नगर परिषदेत चालू आहे व ही कामे पूर्ण केल्याबद्दल त्यांनी वरिष्ठांना काहीही कळविले नाही असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अधिनियमातील कलम ४ मधील तरतुदीनुसार त्यांच्या-कडील स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या १७ मुद्दयावरील माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने ही माहिती १५ ऑक्टोबर २००५ अगर तत्पूर्वी जाहीर करणे गरजेचे होते. तथापि ही माहिती, प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु होऊन चार वर्षाहून अधिक कालावधी ओलांडून गेल्यानंतरही सेलू नगरपरिषदेच्या माहिती अधिका-याने अधिनियमातील कलम ४ च्या तरतुदीअन्वये स्वंयप्रेरणने घोषित करावयाची त्यांच्या प्राधिकरणाविषयीची अपेक्षित असलेली माहिती त्यांनी अद्यापपावेतो तयार केली नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. ही माहिती तयार न करण्याचे कोणतेही कारण मूळात अस्तित्वात असू शकत नाही. ही माहिती मूळात तयार करुन ती प्रसिध्द करणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे म्हणजे या प्रकरणातील सेलू नगर परिषदेचे कर्तव्य होते. तथापि सेलू नगरपरिषदेचे सर्व संबंधित अधिकारी अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी या प्रकरणी पूर्णतः अपयशी ठरल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये आयोगाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (ग) मधील तरतुदीचा वापर करणे समर्थनीय होईल असे आयोगास वाटते. त्यामुळे अधिनियमातील कलम १९ (८) (ग) च्या तरतुदीनुसार, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सेलू यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) ची अंमलबजावणी अद्यापपावेतो न केल्याबद्दल सेलू नगरपरिषदेस एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का

लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) ची अद्याप कोणतीही अंमलबजावणी न केल्याबद्दल, सेलू नगरपरिषदेस एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत, सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, रा. गणपती गल्ली, घडी टॉवर जवळ, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, कार्यालय मुख्याधिकारी नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५३

निर्णय दिनांक २१-०१-२०१०

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी

अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेकटा,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्री. उल्हास विठ्ठलराव जाधव,

२. श्री. बाबासाहेब विठ्ठलराव जाधव

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. उल्हास विठ्ठलराव जाधव व श्री. बाळासाहेब विठ्ठलराव जाधव, रा. शेकटा, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांच्या आईचे माहेर, जन्मगांव तालुका जिल्हा, त्रयस्थ पक्षाच्या आजोबाचे नाव (आईचे वडील), अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. त्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी निर्णय देऊन त्रयस्थ पक्षाच्या संमतीशिवाय अपिलार्थीस माहिती देता येणार नाही असे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. बाळासाहेब जाधव हजर व अपिलार्थी (प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी) गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर हजर आहेत. तथापि रोजनाम्यावर सही करुन ते निघून गेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे ती त्रयस्थ पक्षाच्या वंशावळीच्या संदर्भातील आहे. अशा

प्रकारच्या नागरिकांच्या / ग्रामस्थांच्या वंशावळी करण्याचे व नंतर त्या जतन करुन ठेवण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत कधीही केले जात नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या आईच्या वडिलाचे नांव तसेच जन्मस्थान इत्यादी माहिती मागितली आहे. कोणत्याही ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाचे नियमित कार्य व त्यांनी दप्तरी जतन करुन ठेवावयाची कागदपत्रे याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे गावातील नागरिकांच्या वंशावळी तयार करणे व त्यांचे परस्पर नातेसंबंध अशी माहिती ग्रामपंचायतीकडे जतन करुन ठेवली जात नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात जी माहिती प्रत्यक्षात उपलब्ध आहे ती माहिती त्यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची तरतूद आहे. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती, अमूर्त स्वरुपातील असल्याने वा जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने ती त्यांनी अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे हे अमूर्त स्वरुप पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेकटा, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४९

निर्णय दिनांक २१.०१.२०१०

१ श्री. पुंडलिक आनंदराव होर्शिळ, : अपिलार्थी

रा. महात्मा फुलेनगर, पीरबाजार, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य, शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-११-२००९ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना प्राचार्यांनी असमाधानकारक उत्तर दिले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८४ ते १९९३ पर्यंत राहिलेली ४ % रक्कम मिळणेबाबत या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" १९८४ ते १९९३ पर्यंतची सॉईल टेर्स्टींगच्या बिलातील जी. आर. प्रमाणे बाकीची ४ % रक्कम."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ४ % सॉईल टेस्टींगचे मानधन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे शासन निर्णय क्र. GECA-3666-A-57- (10863) दि. २५ मार्च १९६८ व GECA-3616-A-56271- (10063) दि. २१ ऑगस्ट १९६८ च्या आधारे कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून सॉईल टेस्टींगच्या मानधनामधील त्यांना देय असलेली रक्कम संबंधितांकडून मिळाली नाही व तसेच त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये १९६८ ते १९९३ च्या शासकीय आदेशाच्या प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या टेस्टींगच्या कामासाठी कोणाला किती मानधन द्यावयाचे याचे अधिकार प्राचार्यांना आहेत. अपिलार्थी हे अशाप्रकारे त्यांच्याकडे रक्कम मागू शकत नाहीत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीचा दिनांक २६-०७-२००७ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. तथापि आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या दिनांक २६-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

यांच्या जावक लिपीकाची सही व महाविद्यालयाचा शिक्का आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, सदर शिक्का कॉलेजचा नाही, असे प्राचार्यांनी आयोगास अवगत केले. त्यांनी, अपिलार्थीने दिनांक २४-०४-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर केल्या गेलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवर असलेल्या त्यांच्या महाविद्यालयाच्या शिक्क्याचा इन्कार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती सुरुवातीच्या परिच्छेदात नमूद केली आहे. या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी अपिलार्थीस ४ % रक्कम संबंधितांकडून हवी असली तरीही हे निर्णय पूर्णतः प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी घ्यावयाचे आहेत, कारण अशाप्रकारचे प्रशासकीय निर्णय देण्याचे आयोगाच्या अधिकारीतेच्या व्याप्तीमध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये, ती मोघम स्वरुपाची असल्यामुळे, समाविष्ट होऊ शकत नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुंडलिक आनंदराव होर्शिळ, रा. महात्मा फुलेनगर, पीरबाजार, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५७

निर्णय दिनांक २१-०१-२०१०

१ श्री. जितेंद्र विनयकुमार आबड, : अपिलार्थी

पो. बॉ. ९४, घर नं. २/२०/३९, आबड मार्ग, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. पहिल्या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील नस्ती तपासणी करण्यासाठी ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती, मुद्दा

क्रमांक २ व्दारे या नस्तीवर असलेल्या टिपणीच्या प्रतीच्या दोन प्रती व जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांकडील नवीन पी. आर. कार्ड उघडण्यासाठी अवलंबविण्यात येणा-या पध्दतीसंदर्भात प्राप्त झालेल्या आदेशाची प्रत, या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे या कार्यालयात नुकतेच रुजू झाले आहेत त्यामुळे त्यांना या प्रकरणाची सखोल माहिती नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुक्रमे निलंबीत व स्वर्गवासी झाले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी तपासणीसाठी मागितलेल्या संचिका त्यांना तपासणीसाठी १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगास आश्वासीत केले आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती देखील याच कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्याचे आयोगास आश्वासीत केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती

त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून तपासणीसाठी संबंधित संचिका याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध राहतील.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. चव्हाण, सध्या निलंबीत) यांनी कोणताच प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सबब जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री चव्हाण, सध्या निलंबीत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (श्री चव्हाण, सध्या निलंबीत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जितेंद्र विनयकुमार आबड, पो. बॉ. ९४, घर नं. २/२०/३९, आबड मार्ग, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्र.४४५/०९ व ४४६/०९**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४५ व ४४६
निर्णय दिनांकः २२-०१-२००९

१. सौ. एस.पी.नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. <u>अपील क्र.४४५/०९</u>

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, महात्मा गांधी प्राथमिक शाळा,<br>कावलगाव,ता.देगलूर,जि.नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : प्रतिवादी |
| २. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>ज्ञानदिप प्राथमिक शाळा,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०४.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मुख्याध्यापक, महात्मा गांधी प्राथमिक शाळा,कावलगाव, ता.देगलूर,जि.नांदेड व ज्ञानदिप प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागितली असता,अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१०.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जांन्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. तथापि यानंतर अपिलार्थीस या मुद्याची आता माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. १०.०२.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि अपील क्र. ४४५/०९ शी संबंधित जन माहिती अधिकारी त्यांच्या वकीलासह व अपील क्र. ४४६/०९ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की,अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांना पोस्टाद्वारे प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याची कल्पना त्यांना, आयोगाच्या कार्यालयातून त्यांना द्वितीय अपील अर्जाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर आली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार केल्यास ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोनही जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मूळात संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे प्राप्त झालेला नाही. त्यामुळे साहजिकच अपिलार्थीस त्यांनी माहिती देण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना अद्यापही या माहितीची

आवश्यकता असेल तर दोनही संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे माहितीसाठीचे रीतसर अर्ज सादर करुन, याची पोचपावती त्यांच्या अभिलेख्यावर ठेवून तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती अपेक्षित करावी. जर जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही तर, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) व १९(३) च्या तरतुदीनुसार ते प्रथम अपील व द्वितीय अपील सादर करण्यासंबंधीची पुढील कार्यवाही करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ४४५/०९ व ४४६/०९ निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी प्राथमिक शाळा, कावलगाव, ता. देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानदिप प्राथमिक शाळा,नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४७
निर्णय दिनांकः २२-०१-२०१०

१. सौ. एस.पी.नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
विवेकानंद प्राथमिक शाळा, हदगाव,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकानंद प्राथमिक शाळा,हदगाव,जि.नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती मागविली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि.१०.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते, तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची शाळा स्थापन झाल्यापासून ते दि.०७.११.२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या शाळेच्या आस्थापनाविषयक बाबींची व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१८००/- इतके त्यांच्या कार्यालयात मनीऑर्डरद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने दि. १०.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १८००/- इतके त्यांच्याकडे भरण्याचे कळविल्यामुळे अपिलार्थीस सदरच्या शुल्काबाबत संशय आल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता वेळ मागितला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे अपिलार्थीस दिनांक व वेळ कळविला असता अपिलार्थी या दिनांकास त्यांच्या कार्यालयात कागदपत्रे पाहणीसाठी हजर राहिले नाहीत, मात्र त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून त्यांना ही माहिती ते सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.जन माहिती अधिकारी यांच्या

प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०७.११.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १८००/- इतके त्यांना मनीऑर्डरद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीस सदरचे शुल्क जास्त वाटल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सदरच्या कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता वेळ मागितली. त्याप्रमाणे मुख्याध्यापक यांनी दि. २२.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या शाळेत दि. ०३.०२.२००९ रोजी संदर्भित कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता शाळेच्या वेळेत उपस्थित राहण्याची विनंती केली. परंतु अशाप्रकारची तपासणी करण्याकरिता अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत,परंतु शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार त्यांनी प्रथम अपील केले असल्याचे आढळून येत आहे. यावरुन अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याची कोणतीही तयारी असल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस या प्रकरणी, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी असल्यास, या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी कळवतील ते शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणे क्रमप्राप्त आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शुल्काचा संपूर्ण तपशील देऊन अधिनियमातील कलम ७(३)(क) ची पूर्तता देखील केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कोणत्याही प्रकारची कृती न करता अपिलार्थीने माहिती देण्यास टाळाटाळ होत

असल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, ही त्यांची कृती चुकीची आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराची कोणतीही कागदपत्रे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली नाहीत. एवढेच नव्हेतर या पत्रव्यवहाराचा उल्लेख देखील त्यांनी या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. अशाप्रकारे अपिलार्थी हे फक्त त्यांना सोईस्कर असलेली अशीच कागदपत्रे आयोगाकडे सादर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारचे प्रयत्न हे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर वैध असल्याचे सिध्द होत नाहीत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेल्या शुल्काचा भरणा न केल्याने, जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २२-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैन, द्वारा मुख्य कार्यालय, अखित भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोनगर,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,विवेकानंद प्राथमिक शाळा, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६००
निर्णय दिनांक: २२-०१-२०१०

१. श्री. नजीर खान सुभान खान पठाण, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१. चेअरमन / सचिव, : प्रतिवादी
मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
गंगापूर, निवास ऑफीस, चंदन (ब) अपार्टमेंट,
राणानगर,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने विनादिनांकाच्या अर्जाव्दारे मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, जि. औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१४.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १२.०८.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांना हवी असलेली माहिती ८ दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे

अध्यक्ष / सचिव, मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, जि. औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतर प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे अध्यक्ष / सचिव व सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद हे सर्वजण उपस्थित / अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State**

**within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर,जि.औरंगाबाद यांचे दि. १२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.६००/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर,जि.औरंगाबाद यांचे दि. १२.०८.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नजीर खान सुभान खान पठाण, पोलीस मुख्यालय, घ.न. १४८, मिलकॉर्नर, औरंगाबाद

(शहर), ता.जि. औरंगाबाद.

२. चेअरमन / सचिव, मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, निवास ऑफीस चंदन (ब), अपार्टमेंट,राणानगर,उड्डाण पूलाजवळ, जि. औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७८
निर्णय दिनांकः २२-०१-२०१०

१. श्री. राजू शंकरराव कांबळे, : अपिलार्थी
रा. देगलूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. सचिव, : प्रतिवादी
बापूनगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., देगलूर,
जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, देगलूर, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून या संस्थेची चौकशी करुन अन्यायग्रस्त सभासदांना प्लॉट द्यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१५.१०.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, बापूनगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., देगलूर, जि. नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि. नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि. नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.१२.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर केले व त्यांना हवी असलेली माहिती दि.१७.१२.२००७ च्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन

देण्याचे सचिव, बापूनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., देगलूर, जि. नांदेड यांना आदेशित केले. तथापि यानंतर चुकीची माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.२२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि. नांदेड हे अनुपस्थित व संबंधित संस्थेचे सचिव उपस्थित आहेत.

संस्थेच्या सचिवांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे व तसेच सदर अपिलार्थी त्यांच्या संस्थेचे सभासद नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे व अन्यायग्रस्त सभासदांना प्लॉट देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The**

**State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.</u>"**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अन्यायग्रस्त प्लॉट धारकांना प्लॉट वाटप करण्याचे संस्थेस आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे. या संदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा विनंतीवर विचार करण्याची अधिकारीता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगास नाही. या विनंती संदर्भात सहकार विभाग अथवा सहकार न्यायालयाकडे त्यांनी संपर्क साधावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने व तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीचा भंग झाला असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ०६-११-२००७ रोजीचे आदेश अवैध ठरविण्यात येत आहेत. परिणामी सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि.नांदेड यांचे दि. ०६.१२.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५

नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२१७८/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि.नांदेड यांचे दि. ०६.१२.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजू शंकरराव कांबळे, व्दारा-गजानन झेरॉक्स, पोस्ट ऑफिसच्या समोर, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड.

२. सचिव, बापूनगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., देगलूर, ता.देगलूर, जि. नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७९
निर्णय दिनांकः २२-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मोहंमद शफी शेख मस्तान,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष,<br>शोभानगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था<br>मर्यादित, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०३.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, शोभानगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.०३.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व त्यांना हवी असलेली मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती दोन आठवड्याच्या आत व मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष, शोभानगर पोलीस

सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., नांदेड यांना आदेशित केले. तथापि यानंतर दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.२१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra</u>**

**<u>Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने व तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीचा भंग झाला असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचे दि.१३.०३.२००८ रोजीचे आदेश अवैध ठरविण्यात येत आहेत. परिणामी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे दि. १३.०३.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२१७९/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे दि. १३.०३.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः २२-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद शफी शेख मस्तान, घर नं. अे-२१, शोभानगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड, ता.जि. नांदेड.

२. अध्यक्ष, शोभानगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड, ता.जि. नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४३६/२००९, ४३८/२००९, ४३९/२००९, ४४०/२००९, ४४१/२००९ ४४२/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ४३६,४३८,४३९,४४०,४४१ व ४४२

निर्णय दिनांक २२.०१.२०१०

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी

द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व

विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,

नांदेड.

**विरुध्द**

१ **अपील क्रमांक ४३६/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

शिवमुर्ती अप्पा मळगे प्राथमिक शाळा, मुक्रमाबाद,

ता. मुखेड, जि. नांदेड

२ **अपील क्रमांक ४३८/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

विवेकवर्धीनी प्राथमिक शाळा, हडको,

जि. नांदेड

३ **<u>अपील क्रमांक ४३९/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

सत्य साईबाबा प्राथमिक शाळा, नांदेड

४ **<u>अपील क्रमांक ४४०/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

छत्रपती संभाजी प्राथमिक शाळा, मुक्रमाबाद,

ता. मुखेड, जि. नांदेड

५ **<u>अपील क्रमांक ४४१/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

शंकरराव चव्हाण प्राथमिक शाळा, मुखेड, जि.

नांदेड

६ **<u>अपील क्रमांक ४४२/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

प्रियदर्शिनी मुलींची प्राथमिक शाळा, मुखेड, जि.

नांदेड

**अपील क्रमांक ४३६/२००९, ४३८ ते ४४२/२००९**

जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०४.२००९ रोजी दाखल केलेली एकूण ६ स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचे अर्ज केल्यानंतरही त्यांना विहित मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपिले सादर केली होती. तथापि त्यांनी त्यांच्या प्रथम अपिलांवर निर्णय न देता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दिनांक २९-०९-२००८ ते ०७-११-२००८ या कालावधीमधील मूळ अर्जान्वये नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळया शाळांच्या मुख्याध्यापकांकडे व्यापक व्याप्ती असलेली एकच माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितली होती. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-०१-२००९ ते १०-०२-२००९ या कालावधीमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे एकूण ६ प्रथम अपिले दाखल केली. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली सहा स्वतंत्र विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या सहा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ४४१/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी

उपस्थित व इतर पाच प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि संबंधित जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपील क्रमांक ४४१/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शंकरराव चव्हाण प्राथमिक शाळा, मुखेड, जि. नांदेड हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना मूळात अपिलार्थीकडून माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नसल्याने ते अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, अपील क्रमांक ४४१/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपील क्रमांक ४४१/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झालेला नाही, त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. परंतु या संदर्भात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते, याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शंकरराव चव्हाण प्राथमिक शाळा, मुखेड यांच्याकडे त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सादर करावा व तदनंतर अधिनियमातील विहित तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, त्यांना आवश्यक वाटल्यास प्रथम अपील करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांना आवश्यक वाटल्यास त्यांनी आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार द्वितीय अपील करावे. या सूचनेसह अपिलार्थीचे अपील क्रमांक ४४१/२००९ निकाली काढण्यात येत आहे.

उर्वरित सर्व प्रथम अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे पुरावे आयोगास सादर केले आहेत. तथापि संबंधित

मुख्याध्यापकाकडे त्यांनी मूळात प्रथम अर्ज सादर केल्यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही. या सर्व प्रकरणांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दाखल केला होता किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुराव्यावरुन कळण्यास मार्ग नाही. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील क्रमांक ४३६, ४३८, ४३९ आणि ४४०/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा त्यांचा अर्ज प्रथमतः सादर करावा, त्याचा आवश्यक तो पुरावा आपल्याकडे नोंदवून ठेवावा आणि तदनंतर संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्यास जन अपिलीय अधिकारी आणि राज्य माहिती आयोग यांच्याकडे आवश्यकता वाटल्यास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपील सादर करण्याची कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन सहा अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४३६/२००९, ४३८/२००९, ४३९/२००९, ४४०/२००९, ४४१/२००९ व ४४२/२००९ निकाली काढण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवमुर्ती अप्पा मळगे प्राथमिक शाळा, मुक्रमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकवर्धीनी प्राथमिक शाळा, हडको, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सत्य साईबाबा प्राथमिक शाळा, आनंदनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती संभाजी प्राथमिक शाळा, मुक्रमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शंकरराव चव्हाण प्राथमिक शाळा, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रियदर्शिनी मुलींची प्राथमिक शाळा, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४३७

निर्णय दिनांक २२.०१.२०१०

१ सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी

रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

शिवशक्ती माध्यमिक शाळा, मौजे काकांडी,

ता. जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, शिवशक्ती माध्यमिक शाळा, मौजे काकांडी, ता.जि. नांदेड यांच्याकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता, मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या आस्थापनेविषयक व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. तथापि यानंतर मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतर माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ होत असल्याच्या कारणाने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणी न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि त्यावरील प्रथम अपील अर्ज यांच्या प्रती जोडल्या आहेत. तथापि त्यांनी हे अर्ज संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविल्याचा अथवा हे अर्ज संबंधितांकडे प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, द्वारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवशक्ती माध्यमिक शाळा, मौजे काकांडी, ता. जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४३

निर्णय दिनांक २२.०१.२०१०

१ सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी

रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

महात्मा फुले प्राथमिक शाळा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले प्राथमिक शाळा, पंकजनगर, नांदेड यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये काही माहिती मागितली असता, त्यांना मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतरही माहिती देण्यासाठी जाणुनबूजुन विलंब व टाळाटाळ होत असल्यामुळे, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी न घेता संबंधित प्रकरण प्रलंबित ठेवल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०७-११-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक १२-११-२००८ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार माहिती देण्यासाठी विलंब व टाळाटाळ होत असल्याच्या कारणावरुन दिनांक १०-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्याने कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रु. २००/- इतके त्यांना मनिऑर्डरद्वारे शाळेकडे भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक ०७-११-२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००८ रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झाला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज जो पाकीटाद्वारे त्यांना प्राप्त झाला ते पाकीट आयोगाकडे सादर केले असून, या पाकीटावर पोस्टाचा

दिनांक १२-११-२००८ या तारखेचा शिक्का आहे. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक ०७-११-२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे आवश्यक त्या तपशीलासह अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविले आहे. यासंदर्भात आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकाऱ्याने आयोगाकडे सादर केला आहे. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (३) (क) नुसार त्यांना आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क कळविल्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे ज्ञात झाल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. परंतु शुल्क ज्ञात झाल्यानंतर अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ७ (५) प्रमाणे शुल्क भरण्यासंदर्भात जी कार्यवाही करणे त्यांना अनिवार्य आहे, ती कार्यवाही या प्रकरणी अपिलार्थीने न करुन अधिनियमातील कलम ७ (५) चा भंग केला आहे. अपिलार्थीने मूळात अधिनियमातील कलम ७ (५) चा अशाप्रकारे भंग केला असल्यामुळे, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे, ही माहिती देण्याचे त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस अद्यापही या माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरण्यासाठी संपर्क साधावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तथापि विचाराधीन प्रकरणी

अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीची पुर्तता न केल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी. नैण, द्वारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले प्राथमिक शाळा, पंकजनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४४
निर्णय दिनांक २२-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. एस. पी. नैण,<br>रा.नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सरस्वती प्राथमिक शाळा, रावनकोळा,<br>ता. मुखेड, जि. नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०७.०१.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये जन माहिती अधिकाऱ्याने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस दिनांक २६-१२-२००९ रोजी पुरविण्यात आली आहे व प्राप्त माहितीने

त्यांचे समाधान झाले आहे. यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०५.०१.२०१० रोजी तसे कबूलीपत्र दिले आहे.

वरील कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर आता नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ४४४/२००९, दिनांक २८.०४.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, द्वारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती प्राथमिक शाळा, रावनकोळा, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६००

निर्णय दिनांक २२-०१-२०१०

१ श्री. नजीर खान सुभान खान पठाण, : अपिलार्थी
रा. पोलीस मुख्यालय, घ. नं. १४८, मिल कॉर्नर,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ चेअरमन / सचिव,
मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर,
सध्या निवास ऑफीस चंदन (ब) अपार्टमेंट, राणानगर,
उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने विनादिनांकाच्या अर्जाव्दारे मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, जि. औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने

अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर जि. औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १४-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १२-०८-२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांना हवी असलेली माहिती ८ दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष / सचिव, मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, जि. औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतर प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि. औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुक्तेश्वर गृहनिर्माण संस्था, गंगापूर या संस्थेच्या माहिती अधिका-याकडून मागितली असून यावरील प्रथम अपील अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४-०७-२००९ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर यांच्याकडे केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रथमतः ज्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित होती त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिका-याकडे अर्जदारास अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील करता येते. या प्रकरणी मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, जि. औरंगाबाद व सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर हे दोघे अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित नसल्यामुळे अपिलार्थीची सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर यांच्याकडे अपील अर्ज सादर करण्याची कृती चुकीची आहे. सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी देखील अर्जदाराच्या प्रथम अपील अर्जावर प्रतिवादी म्हणून संबंधित

सचिव / चेअरमन यांना संबोधीत केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांना मूळ अर्जदार व त्यांच्या प्राधिकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या संदर्भातीलच अपिलावर निर्णय देण्याचे त्यांना अधिकार आहेत. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक १२-०८-२००९ रोजीचा पारीत केलेला निर्णय देखील अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थी त्यांना या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे आवश्यक असलेली माहिती ते सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन मागवून घेऊ शकतात.

अशा प्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्यापूर्वी माहिती अधिकार अधिनियमातील विहित कार्यपध्दतीचे योग्य प्रकारे पालन न करुन अधिनियमातील कलम १९ (१) चा भंग केला असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नजीर खान सुभान खान पठाण, पोलीस मुख्यालय, घ. नं. १४८, मिल कॉर्नर, औरंगाबाद.

२ चेअरमन / सचिव, मुक्तेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गंगापूर, निवास ऑफीस, चंदन (ब) अपार्टमेंट, राणानगर, उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि.

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४८
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. कैलास जनार्धन शिंदे, : अपिलार्थी
रा.नाऊर,ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, श्रीरामपूर,
जि.अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, श्रीरामपूर,जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,
श्रीरामपूर,जि.अहमदनगर.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "श्रीरामपूर तालुक्यातील नाऊर या गावाकरिता सन २००६ ते २००९ पर्यंत

वाटप केलेल्या दशपर्णी अर्क टाक्यांची यादी व ज्या लाभार्थ्यांना या टाक्या दिल्या, त्यांच्या छायांकित प्रती", अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे व नाऊर येथे दशपर्णी अर्क टाक्या कोणासही वाटप करण्यात आल्या नाहीत, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०९.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवित अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये नाऊर गावामध्ये सन २००६-०९ या कालावधीमध्ये वाटप केलेल्या दशपर्णी अर्क टाक्याच्या लाभार्थ्यांची यादी मागितली होती. तथापि या कालावधीमध्ये नाऊर गावातील कोणत्याही शेतकऱ्यास दशपर्णी अर्क टाकीचे वाटप केले गेले नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती कळविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविले आहे की, नाऊर येथे दशपर्णी अर्क टाक्या कोणासही वाटप करण्यात आल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिलेली ही माहिती बरोबर आहे. याही पेक्षा दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे टाक्यांची यादी आणि लाभार्थ्यांच्या छायांकित प्रती, अशी माहिती मागितली आहे. अशाप्रकारची माहिती, दशपर्णी अर्क टाक्यांचे वाटप करताना जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवत नाहीत. कारण या टाक्यांना कोणताही क्रमांक नसतो आणि लाभार्थ्यांची छायाचित्रे जन माहिती अधिकारी यांनी घेण्याची पध्दत या टाकी वाटपाच्या प्रक्रियेमध्ये प्रचलित नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, निरंक असल्याच्या निर्णयाप्रत येऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती पुरविली आहे. या माहितीने अपिलार्थीची कशाप्रकारे दिशाभूल होत आहे आणि ही माहिती अर्धवट कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत अथवा यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे कोणतेही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास जनार्धन शिंदे,रा.नाऊर,ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, श्रीरामपूर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४९
निर्णय दिनांकः २५-०१-२०१०

१. श्री. जगताप राजू दगडू, : अपिलार्थी
राॅ.तळेगाव दिघे, ता.संगमनेर,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
न्यू इंग्लिश स्कूल, कनकुरी,ता.राहता,
जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद,अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

### निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०१.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित सन १९९८-९९ ते ऑगस्ट, २००९ अखेरच्या कालावधीतील काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे नोंदणीकृत टपालाने मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या संस्थेने वरील कालावधीमध्ये केलेल्या भरती-बढतीची वस्तुनिष्ठ माहिती, भरती-बढती करताना वर्तमानपत्रातील दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती, सहायक आयुक्त,मागासवर्गीय कक्ष यांनी तपासून दिलेल्या अनुशेष तक्त्याच्या सत्यप्रती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या दिलेल्या मान्यतेच्या सत्यप्रती, शिक्षण खाते,जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अनुशेष भरती-बढती करण्यासंदर्भात जून १९९८ ते ऑगस्ट २००९ अखेरपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, सदर संस्थेची अद्ययावत सेवाजेष्ठता यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या प्रतिसाद देण्याच्या मुदतीपूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले व यानंतर द्वितीय अपील करण्याचा विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २३.१०.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे पाठविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १४.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. ०६.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २१.१०.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी आणि राज्य माहिती आयोगाकडे विहित कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - संस्थेने सन १९९८ ते ऑगस्ट, २००९ अखेर केलेल्या भरती व बढतीची वस्तुनिष्ठ माहिती - अशी माहिती मागितली आहे. 'वस्तुनिष्ठ माहिती' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे, हे यावरुन समजून येत  नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची व पर्यायाने ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित पाचही मुद्यांवरील माहिती ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस ही माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.१०.२००९ रोजी म्हणजेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दिली आहे. तथापि आज रोजी युक्तिवादाचे वेळी जन माहिती अधिकारी या अपिलार्थीस माहिती दिल्याबाबतचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर करु शकल्या नाहीत. त्यांनी आज रोजी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती आयोगास दाखविली असता, ही माहिती सकृतदर्शनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि जन माहिती अधिकारी या अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा सबळ पुरावा आयोगासमोर सादर करु शकत नसल्यामुळे, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ते ५ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगताप राजू दगडू,रा.तळेगाव दिघे, ता.संगमनेर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल, कनकुरी, ता.राहाता, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५०
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. किरण नाथा वैरागर, : अपिलार्थी
रा.घोडेगाव,ता.नेवासा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती, नेवासा,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पंचायत समिती,
जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती, नेवासा,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहितीसाठीचे शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, घोडेगाव बाजारतळ ते जुना शिंगवे तुकाई या रस्त्याचे खडीकरण व नवीन भरावाच्या कामासंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे दि. २७.०२.२००९ ते २७.०४.२००९ या कालावधीतील माहिती समक्ष मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. १५.०७.२००९ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, सहायक माहिती अधिकाऱ्यासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व तसेच त्यांनी रु.२००/- इतक्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक यांनी, अविलार्थीस त्यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले. त्यांनी आयोगास

असेही अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली, त्यावेळी श्री. के.टी.हत्ते नावाचे शाखा अभियंता जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. श्री. हत्ते यांची बदली आता तालुका वैजापूर,जि.औरंगाबाद येथे झाली असल्याचे देखील त्यांनी आयोगास अवगत केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री.डी.डी.अहिरे यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे, त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पुरविण्याप्रीत्यर्थ कोणतेही सहाय्य करता आले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १२.०८.२००९ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याची कारणे आयोगास स्पष्ट करता आली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.१,२,३ व मुद्दा क्र. ९ मधील,"नवीन भरावावर अंथरण्यात आलेल्या मुरुमाची जाडी,खडी व मुरमाच्या ट्रॅक्टरची संख्या, रोलिंग केलेल्या दिवसांची संख्या, पाण्याच्या टँकरची संख्या", ही अंशतः माहिती वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मते अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास या संदर्भात त्यांची मते,स्पष्टीकरणे व वैयक्तिक अभिप्राय देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस वर

नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील, क्र. ४,५,६,७,८,९ (मधील वरील परिच्छेदात नमूद केलेला भाग वगळता उर्वरित भाग) व १० या मुद्यांशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२००/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे, असेही त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देणे फारसे जिकिरीचे होते अथवा ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही माहिती न देण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री. हत्ते व त्यांचे सहायक श्री. अहिरे हे जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. माहिती अधिकाऱ्यास अर्जदारास माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे कर्मचारी व त्यांचे सहायक यांना देखील माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे तत्कालीन व सध्याचे सहायक श्री. डी.डी.अहिरे, वरिष्ठ सहायक यांना त्यांनी अपिलार्थीस मुदतीत माहिती न दिल्याचे कोणतेही समर्थन, त्यांना बचावाची पुरेपूर संधी देऊनही आयोगासमोर करता आले नाही. त्यांनी आयोगास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे ते ही माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडे पुरवू शकले नाहीत, असा युक्तिवाद केला. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली व त्यांना देय असलेली कोणतीही माहिती तांत्रिक स्वरुपाची आहे, असे आयोगास वाटत नाही. याही पेक्षा महत्त्वाचे हे आहे की, कनिष्ठ अभियंता यांना तांत्रिक बाबतीत मदत करण्यासाठीच त्यांना सहायकाचे पद मंजूर आहे. या पदावर काम करणाऱ्या श्री. अहिरे यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तांत्रिक स्वरुपाची असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कोणतेही सहाय्य करता आले नाही, हा त्यांचा युक्तिवाद केवळ हास्यास्पदच नव्हे तर श्री. अहिरे यांच्या या पदावर काम करण्याच्या पात्रतेबद्दल आयोगाच्या मनात शंका उत्पन्न करीत आहे. त्यामुळे श्री. डी.डी.अहिरे यांचा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, हा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन शाखा अभियंता, श्री. हत्ते हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस माहिती न देऊन श्री. हत्ते व श्री. अहिरे यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्यामुळे श्री. अहिरे डी.डी. वरिष्ठ सहायक यांना एकूण रु.१२,५००/- (अक्षरी बारा हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. श्री. हत्ते हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने शुल्क भरुनही माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर एकूण रु.१२,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास ते जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. श्री. अहिरे यांना लावण्यात आलेल्या रु.१२,५००/- इतक्या शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली माहे मार्च,२०१० पासून पुढे जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरणा करावी.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा,८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

संबंधित उपअभियंता, पंचायत समिती,नेवासा यांनी श्री. डी.डी. अहिरे हे उपरोक्त शास्तीची रक्कम माहे मार्च,२०१० पासून पुढेशासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, याची दक्षता घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सध्याचे जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री. एल.एन.निबे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम, पंचायत समिती,नेवासा यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दलच्या त्यांच्या बेजबाबदार वृत्तीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील, वरील निर्णयात स्पष्ट केलेली, त्यांना देय असलेली, संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. डी.डी. अहिरे,वरिष्ठ सहायक यांना एकूण रु.१२,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे माहे मार्च,२०१० पासून पुढे पाच हप्त्यामध्ये नियमितपणे करावा.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री. हत्ते (सध्या कार्यरत पंचायत समिती,वैजापूर,जि.औरंगाबाद) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.१२,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २५-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण नाथा वैरागर,रा. घोडेगाव,ता.नेवासा,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,श्री. के.टी.हत्ते,सध्या कार्यरत पंचायत समिती, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पंचायत समिती, नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. श्री. डी.डी.अहिरे, वरिष्ठ सहायक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. उपकोषागार अधिकारी, नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५१
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. पापा अब्दुल करीम बेग, : अपिलार्थी
रा. निंबाळे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती कार्यालय,संगमनेर,
जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, संगमनेर,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही उत्तर मिळाले नाही आणि जन माहिती अधिकारी यांनी वेळेत व मुदतीत त्यांना माहिती न दिल्यामुळे, त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, संगमनेर यांच्याकडे, ग्रामपंचायत रेकॉर्डला नोंदीत

खाडाखोड करुन वाढीव जागेची नोंद केल्याबाबत सन १९५९ ते १९७१ या कालावधीतील काही माहिती टपालाद्वारे मागितली होती. तथापि अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दि.०७.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले.त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर यांच्याकडे दि. २७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय न लागल्यामुळे व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, जो त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून दि. २७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाला, त्या अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन,तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर यांनी अपिलार्थी यांच्या दि.०७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २५-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.पापा अब्दुल करिम बेग, मु.निंबाळे, पो.वाघापूर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती,संगमनेर,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५२
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. बळवंत गोविंद पादिर, : अपिलार्थी
रा.हिंगणगाव,ता.जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,हिंगणगाव, ता.जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,अहमदनगर
जि.अहमदनगर
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती,अहमदनगर,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील घरांच्या रेकॉर्डशी संबंधित दि.

०१.०१.२००१ ते दि. ०७.०९.२००९ या कालावधीची काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायत स्थापन झाल्याचा दिनांक, घरांचे उतारे कोणत्या कालावधीपर्यंत उपलब्ध आहेत, सन १९६७ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी सिटी सर्व्हे नुसार, त्याचे आधारे तयार केलेले उतारे व १९८१ साली केलेले रेकॉर्ड याची माहिती, सन १९६० चे उतारे कोणत्या आधारे बदलण्यात आले, याची माहिती- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. अपिलार्थीस यावेळी देण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे विसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये सन १९६१ ते १९७९ पर्यंतच्या रेकॉर्डची माहिती नाही. सन १९८० चे रेकॉर्ड १९५७-५८,१९५९-६० प्रमाणे नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व विसंगत आहे. या युक्तिवादामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी ग्रामपंचायती कार्यक्षेत्रातील मिळकतींच्या मालकीमध्ये १९६० सालापासून कशारितीने बदल होत गेला, याची माहिती अपिलार्थीस आवश्यक आहे. तथापि यासंदर्भातील कोणतेही अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत. या अभिलेख्यांचा कार्यभार ग्रामसेवक यांना मिळाला नसल्याचे ग्रामसेवक आयोगासमोर सांगत आहेत.आज सुनावणीस उपस्थित विस्तार अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित कुठलीही माहिती नाही. अशा परिस्थितीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन, अपिलार्थीस निश्चित कोणत्या प्रकारच्या माहितीची आवश्यकता आहे, याबाबतची स्वतः खात्री करुन घेऊन, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबद्दल या प्रकरणाशी संबंधित ग्रामसेवकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

या प्रकरणी जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे ग्रामपंचायतीकडून गहाळ झाल्याचे गट विकास अधिकारी यांना आढळून आले तर, गट विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामसेवकांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, असेही त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली, वरील निर्णयात स्पष्ट केलेली,संपूर्ण माहिती अपिलार्थीस गट विकास अधिकारी,पंचायत समिती,अहमदनगर यांच्याकडून तपासून घेऊन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,अहमदनगर यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेल्या सूचनेप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कार्यवाही करावी.

**अहमदनगर**
**दिनांक: २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बळवंत गोविंद पादिर,रा.मु.पो.हिंगणगाव,ता.जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, हिंगणगाव,ता. जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (उद्योग),पंचायत समिती, अहमदनगर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५३
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. राम नागुशेठ धोत्रे, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही आदेश न दिल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे वडगाव लांडगा ते डोंगरगाव व पिंपळगाव निपाणी ते डोंगरगाव ता.अकोले या दोन रस्त्यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाची अंदाजपत्रकीय रक्कम, काम सुरु झाल्याचा दिनांक, काम पूर्ण झाल्याचा दिनांक, काम करणाऱ्या एजन्सीचे नाव व पत्ता व कामाच्या बीलाच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उद्देशून केला होता. त्यांनी हा अर्ज, संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. २९.०५.२००९ रोजी पाठविला. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. ०३.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपअभियंता, अकोले यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर उपअभियंता यांनी दि. १८.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सदरची कामे पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत झाली असल्याचे कळविले व अपिलार्थीचा अर्ज पंतप्रधान ग्राम सडक योजना कक्ष,जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे पाठवित असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. या कक्षाने अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मध्यंतरीच्या कालावधीत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. १६.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित

राहिल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. शर्मा नावाचे उपकार्यकारी अभियंता हे माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी आता स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्यांनी असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या कामाच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्या कामाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. ती जिल्हा परिषद, अहमदनगरमधील पंतप्रधान ग्राम सडक योजना कक्षाशी संबंधित आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जास्तीत जास्त दोन ते तीन दिवस कालावधी पुरेल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पंतप्रधान ग्राम सडक योजना कक्षाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी त्यांना भाग होते. तथापि या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी जबाबदार

असल्यामुळे आता या पदावर कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, अहमदनगर,जिल्हा परिषदेच्या पंतप्रधान ग्रामसडक योजना कक्षाशी स्वतः संपर्क साधून हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कोणतीही माहिती विहित मुदतीत न पुरवून अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला असल्याचे सिध्द होत आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली असल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली, वरील निर्णयात स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राम नागूसेठ धोत्रे, पापय्या गल्ली, चितळेरोड, अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, अहमदनगर

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम, उत्तर विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५४
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. दादा गुलाब देशमुख, : अपिलार्थी
श्री. प्रकाश खंडेराव तारळकर, रा.लोणी खु.
ता.राहाता, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शिरुर, जि.पुणे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता, श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शिरुर, जि.पुणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमानुसार अपील न चालविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगास पुढे अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांना प्रतिदिन रु.२५०/- इतकी शास्ती लावावी व त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई आदेशित करावी. या विनंतीबरोबर अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित कामाविषयी एकूण आठ मुद्याद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि.०१.०४.२००६ ते दि. ३०.०६.२००९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या देयकांची रक्कम,शेरा, मोजमापपुस्तिकेच्या छायांकित प्रती, मंजूर अंदाजपत्रकांच्या छायाप्रती, मंजूर देयकाच्या छायांकित प्रती, प्रशासकीय मान्यतेच्या छायांकित प्रती, मोजमाप पुस्तकातील मंजूर बिलांची नोंद घेतल्याची व उपविभागीय अभियंता यांनी टक्केवारी चेक केलेल्या ठळक पानांची छायांकित प्रत, मिळालेले अनुदान व झालेला खर्च व महसूलाचा ताळमेळ उपविभागीय अभियंता यांच्या दैनंदिनीची छायांकित प्रत, सी.आर. आणि एस.आर.च्या झालेल्या कामाची तपशीलवार माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस ती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहून जाण्याचे व त्यातील आवश्यक त्या प्रती सशुल्क घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. २६.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.१०.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्याप्रमाणेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास प्रतिसाद दिला. जन अपिलीय अधिकारी यांचा हा आदेश अपिलार्थीस प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सुमारे साडेतीन वर्षाशी संबंधित असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस एकूण २१,७०२ इतक्या पृष्ठांची माहिती द्यावी लागणार होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीने प्रथमतः पाहून तदनंतर त्यातील आवश्यक त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून घेणे अपिलार्थीस सोईचे होईल, म्हणून त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः ही माहिती पाहून जाण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ८ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ८ द्वारे - 'सीआर आणि एसआर कामांची तपशीलवार माहिती', अशी माहिती मागितली आहे. परंतु 'तपशीवार' म्हणजे निश्चित कोणता तपशील अपिलार्थीस अपेक्षित आहे, हे त्यांनी या अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्यावरील माहिती देय होत नाही. उर्वरित ७ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी निश्चित करुन ठेवली होती, असे दिसून येत आहे.एकदा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे निश्चित झाल्यावर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना माहितीपोटीचे शुल्क, अधिनियमातील तरतुदींनुसार ठरविलेल्या दराने आकारुन, नंतर ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ करणे हे या प्रकरणी संयुक्तिक ठरले असते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस त्यांच्या

कार्यालयात माहिती पाहून जाण्याचे सूचित केले, ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस ही माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास आश्वासित केले आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ वगळता उर्वरित सर्व मुद्द्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्याबद्दल शास्ती आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्द्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास ज्यामध्ये अपिलार्थीने कोणत्याही कामाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही व सर्वसाधारण स्वरुपात माहिती मागितली आहे. अशा अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेले नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यपध्दतीबद्दल देखील अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. तथापि या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः दि. २२.०९.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या विनंतीवरुन त्यांनी ही सुनावणी दि. १४.१०.२००९ रोजी ठेवली, परंतु या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याबाबतीत देखील अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे आक्षेप स्वीकारार्ह नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर आयोगाने कारवाई आदेशित करण्याची विनंती, विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सर्वसाधारण स्वरुप आणि प्रचंड

व्याप्ती पाहता, आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ७ च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली,मुद्दा क्र. १ ते ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख, श्री. प्रकाश खंडेराव तारळकर, लोणी खुर्द, ता.राहाता, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्रेणी-१,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरुर, जि.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५५
निर्णय दिनांकः २५-०१-२०१०

१. श्री. पवार सुरेश मारुती, : अपिलार्थी
रा.वडाळा बहिरोबा, ता.नेवासा,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प विकास अधिकारी,
भूसंपादन विभाग पुनर्वसन कार्यालय, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे प्रकल्पग्रस्ताचा दाखला मिळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची लेखी स्वरुपात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.११.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे उपस्थित राहिले असता, त्यांनी अपिलार्थीस प्रकल्पग्रस्ताच्या दाखल्यासाठी निश्चितपणे कोणती कागदपत्रे लागतात याची व्यक्तिशः माहिती दिली व तसेच यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने तयार केलेल्या अर्जाची आणि चेक-लीस्टची प्रत देखील अपिलार्थीस दिली. या चेक-लीस्टवरुन अपिलार्थीस प्रकल्पग्रस्ताचा दाखला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळविण्यासाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, याची कल्पना अपिलार्थीस मिळाली. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने दि. १९.११.२००९ रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे त्यांना पूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कबूलीपत्र लिहून दिले आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ त्यांनी दिलेल्या कबुलीपत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस या प्रकरणी त्यांना आवश्यक

असलेली माहिती दि. १९.११.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.अशाप्रकारे अपिलार्थीस या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने आणि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश मारुती पवार, मु.पो.वडाळा बहिरोबा, ता.नेवासा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५६
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
रा. कोळपेवाडी, ता.कोपरगाव,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,कोळपेवाडी ,
ता.कोपरगाव,जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी),
पंचायत समिती, कोपरगाव, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी, २००८ ते जून २००९ पर्यंतच्या कालावधीची काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील

कलम १९(१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांच्याकडे दि. ०९.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, विशेषतः अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे स्वरुप पाहता, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०९.०७.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कोपरगाव,जि.अहमदनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि.०९.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, मु.पो. कोळपेवाडी, ता.कोपरगाव,जि.अहमदनगर-४२३ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळपेवाडी, ता.कोपरगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५७
निर्णय दिनांकः २५-०१-२०१०

१. श्री. भागिनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
मु.वरखेड,पो. हसनापूर, ता.शेवगाव,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. रोहीदास कुंडलिक मोरे, कार्यालय अधीक्षक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय यांनी अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. २२.०१.२०१० रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.०८.२००९ रोजी पाठविलेल्या द्वितीय अपील प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांचे अपील रद्द करण्यात यावे. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याची लेखी कबूलीही या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेली आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ४५७/०९, दि. १७.०८.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २५-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागिनाथ गोरक्षनाथ शिरसाठ,मु.वरखेड, पो.हसनापूर, ता.शेवगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५४
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. संपत निवृत्ती गोंदकर, : अपिलार्थी
रा.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कुळ कायदा शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी,
कुळ कायदा शाखा, जिल्हाधिकारी
कार्यालय,अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, भुसूधार,
जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती ताराबाई देवराम कोळी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपर जिल्हाधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना माहिती मिळत नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती ताराबाई देवराम कोळी यांच्या जागेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"श्रीमती ताराबाई देवराम कोळी यांचे शिर्डी येथील स.नं.१७/१अ/१अ-१७/१ब/-१७/२ या जमिनीच्या बेकायदेशीर व्यवहाराबाबत रद्द झालेल्या नोंदीच्या ऑर्डर व त्याचे फेरफार सदर जमिन ३६ अ च्या अधिन असल्याची आदेश व त्याचे फेरफार, ७/१२ सदर जमिनीचे ताराबाईचे मालकीचे ७/१२ व फेरफार."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांचा अर्ज तहसीलदार, राहाता यांच्याकडे वर्ग केल्याचे अवगत करुन पुढील माहितीसाठी तहसीलदार,राहाता यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. २७.०३.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे तहसीलदार,राहाता यांच्याकडे या माहितीसाठी त्यांना स्मरणपत्र दिले. परंतु यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी, कुळकायदा शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील केले व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयातील कुळकायदा शाखेशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०४.२००८ रोजी पत्र लिहून तहसीलदार, राहाता यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. परंतु एवढे होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी दि. ०८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी,कुळकायदा

शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो सुनावणी झालेली नाही व अपिलार्थी हे देखील त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संपत निवृत्ती गोंदकर, रा.शिर्डी, पिंपळवाडी रोड, ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भुसूधार, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५५
निर्णय दिनांक: २५-०१-२०१०

१. श्री. संजय क्षीरसागर, : अपिलार्थी
सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,
अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी श्री.संजय क्षीरसागर,सचिव, श्री दत्त देवस्थान संस्थान,अहमदनगर यांनी अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले त्यांचे द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. त्यांनी सदरचे अपील सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द केले असून सहायक धर्मादाय आयुक्त यांचा दि. ०१.०९.२००८ रोजीचा निर्णय रद्द करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री. सुरेश भिमराव वाघचौरे रा.नालेगाव,अहमदनगर या नागरिकाने सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे श्री दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांतनगर, अहमदनगर या संस्थानाविषयी सन १९९० ते २००७ या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणातील माहिती मागितली होती. तसेच या प्रकरणी त्यांनी दि. १२.०९.२००७ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सचिव, श्री दत्त देवस्थान संस्थान,अहमदनगर यांना आदेशित केले. या आदेशाच्या विरुध्द सचिव,श्री दत्त देवस्थान यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०१.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर व श्री. सुरेश वाघचौरे हे सर्वजण अनुपस्थित आहेत

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, श्री. वाघचौरे या नागरिकास श्री दत्त देवस्थान या संस्थानासंदर्भात काही माहिती आवश्यक आहे आणि ही माहिती देण्यासाठी सहायक धर्मादाय आयुक्त यांनी, सचिव, श्री दत्त देवस्थान यांना दि. ०१.०९.२००८ रोजी आदेशित केले आहे. संस्थानाच्या सचिवांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मूळात माहिती अधिकार अधिनियम,२००५ हा कायदा या संस्थानाला लागू होत नाही. कारण हे संस्थान माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये नाही. हा मुद्दा त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे उपस्थित केला होता, परंतु या मुद्याकडे दुर्लक्ष करुन सहायक धर्मादाय आयुक्त यांनी संस्थानाच्या सचिवांना श्री. वाघचौरे यांना माहिती देण्याचे आदेशित केले. त्यांनी या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, अपिलार्थीस ही माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही.

संस्थानाच्या सचिवाच्या आयोगाकडील विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्यापूर्वी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८, मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा विरुध्द राज्य माहिती

आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या संदर्भात दि.२८.०४.२००९ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्या निर्णयामध्ये दिलेले वरील आदेश पाहता, या प्रकरणी अपिलार्थी तथा सचिव, श्री दत्त देवस्थान म्हणतात त्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ हा श्री दत्त देवस्थान संस्थान,अहमदनगर यांना लागू होणार नाही. कारण या संस्थानावर राज्य शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नाही आणि या संस्थानास राज्य शासनाचे कोणतेही भरीव अनुदान प्राप्त होत नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थी तथा सचिव,श्री दत्त देवस्थान संस्थान यांनी विचाराधीन अपिलाद्वारे केलेला युक्तिवाद मान्य करुन सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर यांचे दि.०१.०९.२००८ रोजीचे संदर्भिय आदेश रद्द करण्यात येत आहेत. मूळात या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी विरुध्द अपिलार्थी असा निर्णय देणे अपेक्षित असताना त्यांनी श्री दत्त देवस्थान संस्थानाच्या सचिवांना प्रतिवादी म्हणून संबोधले आहे, ही त्यांची कृती चुकीची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर सहायक धर्मादाय आयुक्त यांचे या प्रकरणाशी संबंधित दि. ०१.०९.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येऊन श्री संजय क्षीरसागर, सचिव श्री दत्त देवस्थान,वेदांतनगर,अहमदनगर यांची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर यांचे या प्रकरणाशी संबंधित दि. ०१.०९.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांकः २५-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय क्षीरसागर,श्री दत्त देवस्थान संस्थान,वेदांतनगर,सावेडी,अहमदनगर

२. श्री. सुरेश भिमराव वाघचौरे,नालेगाव,धनाजी निवास, रोहोकले गल्ली, अहमदनगर-४१४ ००१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००१
निर्णय दिनांकः २७-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अशोक बाबासाहेब शिंदे,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना मर्या.,<br>मुरुम, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना मर्या., मुरुम, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर कार्यालयाने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, श्री विठ्ठल

सहकारी साखर कारखाना मर्या., मुरुम यांना आदेशित केले. यानंतर प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२००१/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २७-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.अशोक बाबासाहेब शिंदे, व्दारा-अजित एम.देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड.

२. कार्यकारी संचालक, विठ्ठलसाई सहकारी साखर काराखाना लि., मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कुलसमोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००२
निर्णय दिनांक: २७-०१-२०१०

१. श्री. उमाकांत विश्वनाथ बावगे (दवणहिप्परगा), : अपिलार्थी
रा.वंजारवाडी, पो.हंडरगुळी, ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लि., अंबुलगा (बु.), ता.निलंगा, जि. लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२९.०४.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लि., अंबुलगा (बु.), ता.निलंगा, जि. लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या संदर्भात प्र.कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या दि.२४.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती रजिस्टर्ड पोष्टाने पाठविली. तथापि यापुर्वीच माहितीपोटीचे शुल्क भरुनही माहिती उपलब्ध न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१७.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन

आपले आदेश दि. १६.०८.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस हवी असलेली माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ८३८२ /२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १६.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२००२/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १६.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २७-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उमाकांत विश्वनाथ बावगे (दवणहिप्परगा), रा.वंजारवाडी, पो. हंडरगुळी, ता.उदगीर, जि. लातूर.

२. कार्यकारी संचालक, शिवाजीराव पाटील सहकारी साखर कारखाना, अंबुलगा, ता.निलंगा, जि. लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कुलसमोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७४
निर्णय दिनांक: २७-०१-२०१०

१. श्री. शिवाजी दादाराव शिनगारे, : अपिलार्थी
रा.आवसगांव, पो. सावळेश्वर (पैठण) व्हाया
बनसारोळा, ता.केज, जि. बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
भिमाशंकर शुगर मिल्स लि., वसंतनगर, पारगांव,
ता.वाशी, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०१.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, भिमाशंकर शुगर मिल्स लि., वसंतनगर, पारगांव, ता.वाशी, जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या संदर्भात कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या दि.२१.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०३०/- इतके त्यांच्या कार्यालयात मनिऑर्डरव्दारे जमा करण्याचे सूचित केले. तथापि माहितीपोटीच्या शुल्काची मनीऑर्डर स्वीकारण्याचे संबंधितांनी नाकारल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील

कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१७.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०४.०८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी संबंधित साखर कारखान्यास शासनाचा कुठल्याही प्रकारचा निधी अथवा मदत मिळत नसल्यामुळे, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा संबंधित कारखान्यास लागू होत नसल्याचे अभिप्राय नोंदवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.२७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण म्हणजे भीमाशंकर शुगर मिल्स नावाची एक भागीदारी संस्था असून तिची नोंदणी कंपनी कायद्यांतर्गत केली गेली आहे. या संस्थेचे पूर्ण खाजगी स्वरुप पाहता ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या "सार्वजनिक प्राधिकरण" या शब्दाच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे स्पष्टपणे सिध्द होत आहे. अशाप्रकारच्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. परिणामी अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार कोणतीही माहिती देय असणार नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी या प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२८७४/०७ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २७-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी दादाराव शिनगारे, मु.आवसगांव, पो.सावळेश्वर (पैठण) व्हाया बनसारोळा, ता.केज, जि. बीड

२. कार्यकारी संचालक, भिमाशंकर शुगर मिल्स लि., वसंतनगर, पारगांव, ता.वाशी, जि.उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कुलसमोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७५
निर्णय दिनांक: २७-०१-२०१०

१. श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, : अपिलार्थी
रा.पांगरी, ता.परळी, जि.बीड

**विरुध्द**

१. गोविंद मजूर सहकारी संस्था मर्यादित, : प्रतिवादी
पांगरी, ता.परळी, जि. बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०६.०२.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे गोविंद मजूर सहकारी संस्था मर्यादित, पांगरी, ता.परळी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१५.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २५.०४.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे सचिव, गोविंद मजुर सहकारी संस्था मर्यादित, पांगरी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न

झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे सचिव व सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12</u>**

**<u>of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि.बीड यांचे दि. २५.०४.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२८७५/०७ फेटाळण्यात येत आहे.
२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि.बीड यांचे दि. २५.०४.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: २७-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, मु.पो.पांगरी, ता.परळी, जि. बीड

२. सचिव, गोविंद मजुर सहकारी संस्था मर्यादित, पांगरी, ता.परळी, जि. बीड

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५८

निर्णय दिनांक २७-०१-२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा.घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
सर सय्यद उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित शाळेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे दिनांक ०५.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मागविली असता, त्यांना मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु या अपिलाची सुनावणी संबंधितांनी न घेतल्यामुळे आणि प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सर सय्यद उर्दू प्राथमिक शाळा यांच्याकडे त्यांची शाळा सुरु झाल्यापासून ते दिनांक ०५-०२-२००९ या कालावधीमधील काही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून, ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. विहित मुदतीत अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीचा मूळ अर्ज आणि त्यावरील अपील अर्ज अनुक्रमे मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्राप्त झाल्याचा आवश्यक तो पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्रााथिमक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रथम सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचे हे आदेश अपिलार्थीस मान्य न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) प्रमाणे सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४५८/२००९ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड - ४३१६०४.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सर सय्यद उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५९

निर्णय दिनांक २७.०१.२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
नॅशनल गर्ल्स उर्दू हायस्कूल, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित शाळेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे दिनांक १५.१२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागविली असता, त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक २०.०१.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपिलाची सुनावणी संबंधितांनी न घेतल्यामुळे व प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शाळा सुरु झाल्यापासून ते दिनांक १५.१२.२००८ या कालावधीमधील काही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून, ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०२.२००९ रोजी सुनावणी ठेवूनही कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या शाळेमध्ये हत्या केली गेली असून, त्यांनी मूळ अर्जामध्ये कुर्बानी विषयक माहिती मागविली असता, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील विना क्रमांकाच्या मुद्यांद्वारे "नॅशनल सोसायटी अंतर्गत चालणारी शाळा दिनांक १०-१२-२००८ रोजी कोणत्या आधारे सुट्टी देण्यात आली व शाळेत सकाळी कुर्बानी केली किंवा नाही?

याची माहिती देणे "  अशी माहिती मागविली होती.  अपिलार्थीने या माहितीद्वारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येते.  एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्रामध्ये शाळेत कुर्बानी केली नाही, अशी माहिती दिली आहे.  जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीशी अपिलार्थी सहमत नाहीत.  यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती जर अपिलार्थीस अयोग्य वाटत असेल तर त्यांनी या प्रकरणी त्यांच्या शंकांचे निरसन, शिक्षण विभागाच्या संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे त्यांचे म्हणणे मांडून करुन घ्यावयास हवे.  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती त्यांना देणे अभिप्रेत आहे.  मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध सर्व माहिती पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर,

पोस्ट ईतवारा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल गर्ल्स उर्दू हायस्कूल, अरब गल्ली, महानगरपालिकेच्या दवाखान्यासमोर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६०

निर्णय दिनांक २७.०१.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,<br>रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>मदिनातुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा (मुलींची शाळा), नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीअंतर्गत मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा (मुलींची शाळा), नांदेड यांच्याकडे दिनांक १७-०१-२००९ रोजी अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहितीचे पत्र देऊन भयभीत केले व त्यांची दिशाभूल केली. त्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयक सन २००१ ते जानेवारी २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्राथमिक शाळेची मान्यता कोणत्या ठिकाणची आहे, स्थलांतरणाची परवानगी मिळाली असल्यास तिची माहिती, मैदानाचे क्षेत्र व नकाशे, शाळेतील खेळाच्या साहित्यासह माहिती, साहित्य खरेदी केलेल्या पावत्या, विद्यार्थीनी संख्येप्रमाणे मुत्रीघर व संडास यांची संख्या, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत खिचडी वाटप केले जाते काय? शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांचे सेवापुस्तक व जातीच्या प्रमाणपत्राच्या आणि जात पडताळणीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवापुस्तिका आणि जात प्रमाणपत्राच्या संदर्भातील माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. शिक्षणाधिकाऱ्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी न दिलेली माहिती त्यांना हवी आहे. जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे एकमेकांशी संबंध असून, माहिती अधिकाऱ्याने माहिती दिली नाही तरीही शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित, शाळेच्या मान्यतेच्या संदर्भातील व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तीकेच्या प्रती व जात पडताळणीच्या प्रती ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे व या मुद्यांवर अपिलार्थीस संस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम मुलींची प्राथमिक शाळा यांची ही कृती चुकीची आहे. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत त्यांच्या संस्थेकडे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे आता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेला अपिलार्थीने मागणी केलेली या दोन मुद्यांवरील माहिती तिचे सार्वजनिक स्वरुप पाहता, संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय असू नये. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, जर संबंधित संस्थेने मुख्याध्यापिकेला अपिलार्थीने मागणी केलेल्या या मुद्यांवरील माहिती देण्यास टाळाटाळ केली किंवा नकार दिला तर त्यांनी आपल्या प्रशासकीय अधिकारांचा वापर करुन ही

माहिती संबंधित संस्थेकडून स्वतः प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत विनामूल्य पुरवावी. या संपूर्ण प्रक्रियेकरता जन माहिती अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना १५ दिवस इतका कालावधी देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा (मुलींची शाळा), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६१

निर्णय दिनांक २७.०१.२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ मर्यादित, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी माहितीसाठीचा रितशीर अर्ज सादर करुनही त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी महामंडळ जिल्हा व्यवस्थापकांकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपिलावर जन

अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागविली होती.

"आपल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय नांदेड या कार्यालयातून वर्ष २००७-२००८ व २००८-२००९ या दोन वर्षात कोणकोणत्या योजनेअंतर्गत अनुदान/आर्थिक सहाय्य नांदेड जिल्ह्यातील किती लाभधारकांना वाटप करण्यात आले. तसेच त्या लाभधारकांना जातीचे प्रमाणपत्र, तसेच त्यांना चेक दिलेले सत्यप्रती, चेक क्रमांकासहीत त्यांच्या नावासहीत यादी मिळणे बाबत."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांच्याकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांकडे केल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड जातीचे खोटे प्रमाणपत्र देतात व या मोबदल्यात संबंधित ग्राहकाकडून रु. १०,०००/- इतकी रक्कम त्यांना अवैधरित्या प्राप्त होत असते. हा भ्रष्टाचार उघड होण्याच्या दृष्टीने त्यांना ही माहिती आवश्यक आहे, असेही त्यांनी आयोगास पुढे अवगत केले. अपिलार्थी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तसेच या अर्जाद्वारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप देखिल सार्वजनिक असे असल्यामुळे, ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अधिनियमताील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे दिनांक ०८-०३-२००९ रोजी अगर तत्पूर्वी देणे त्यांना भाग होते. त्यांनी आजतागायत अपिलार्थीस ही माहिती दिली नसल्याने, आता त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब संबंधित जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (२) ची तरतूद पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारले आहे असे म्हणता येईल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती नाकारण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही कारण असावे, असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या माहिती नाकारण्याच्या त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक व विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्याबद्दल त्यांचेवर या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा सादर न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस, कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय, अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये,

याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६२
निर्णय दिनांक २७-०१-२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा,
नांदेड - ४३१६०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपायुक्त (सामान्य प्रशासन), नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. रत्नाकर वाघमारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-१२-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ४६२/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ४६२/२००९, दिनांक १७-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड - ४३१६०४

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६३

निर्णय दिनांक २७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. केशव रामराव जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी माहितीसाठी रितसर अर्ज पाठवून दिला असता त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी तहसीलदार, नांदेड यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्या-मुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक २८-०७-१९७९ जावक क्रमांक १०३६ अन्वये त्रयस्थ पक्ष श्री. केशव रामराव जाधव रा. तुप्पा यांना दिलेल्या ठाकूर जातीचे प्रमाणपत्र देण्याकरिता त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दाखल केलेल्या कागदपत्राच्या मूळ संचिकेची सत्यप्रत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या या रोजीच्या जावक रजिस्टरची सत्यप्रत व सदरील प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात आले किंवा नाही, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राअभावी कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका, त्यांनी सदर संचिका जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला

असल्यामुळे, ती नष्ट केली आहे. अपिलार्थीने सुनावणीमध्ये मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका नष्ट केल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात आता उपलब्ध होऊ शकणार नसल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरुन अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती देय होत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी, सदर माहिती जतन करुन ठेवण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे, सदर माहितीशी संबंधित अभिलेखे नष्ट केले आहेत. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६४

निर्णय दिनांक २७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी तहसीलदार, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अपील प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत तथापि त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०७-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंब न करता माहिती मिळाली असल्याचे कबूल केले आहे. तसेच या पत्रामध्ये त्यांनी ते विचाराधीन अपील क्रमांक ४६४/२००९ हे परत घेत असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४६४/२००९, दिनांक १६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६५

निर्णय दिनांक २७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा व्यवसाय कर अधिकारी,
सह विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक विक्रीकर आयुक्त,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले असता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-

२००९ रोजी सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय पारीत केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा व्यवसाय कर अधिकारी, सह विक्रीकर आयुक्त कार्यालय, नांदेड यांच्याकडे, शहरातील कोचिंग क्लासेस संदर्भात सन १९९७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २८-०१-२००९ रोजी निर्णय दिला. परंतु हा निर्णय नियमबाह्य असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात दिलेल्या निर्णयाविरुध्द केलेले आहे. परंतु आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करताना त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक २८-०१-२००९ रोजीचा कथित निर्णय त्यासोबत आयोगास सादर केलेला नाही. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्राच्या

अनुपलब्धतेमुळे व संबंधिताच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवसाय कर अधिकारी, सह विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६७
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

१. श्री. सुरज दिलीपराव नलवाड, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सदस्य सचिव,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
(पश्चिम) विभाग, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम),विभाग
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम),विभाग,
औरंगाबाद.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली नाही व पैसे भरुनसुध्दा त्यांना अपूर्ण माहिती व ७५ टक्के कोरी सी.डी. दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.०६.०९.२००८ रोजीच्या अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १५.०९.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये त्यांच्या कार्यालयातर्फे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर भरती करण्यासंदर्भात झालेल्या कार्यवाहीची दि. ०१.०६.२००८ ते ३०.०९.२००८ या कालावधीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे असल्याने ती मिळण्यासाठी वेळ लागेल व पात्र उमेदवारांची यादी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर त्यांनी सहायक अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. १०.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविले की, अपिलार्थीने एकूण रु.७५/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची सी.डी. पाठविण्यात येईल. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. २१.१०.२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २६.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात यानंतर संबंधितांमध्ये बराच पत्रव्यवहार झाला. मध्यंतरीच्या काळात कार्यकारी अभियंता यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १०.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थी हे सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि.१४.०१.२००९ रोजी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६)

च्या मुदतीत निर्णय न झाल्याने, वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे उपलब्ध असल्याने,त्यांना अपिलार्थीस महामंडळाकडील माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस सी.डी.द्वारे पुरविण्याचा निर्णय घेतला. अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस सी.डी.च्या स्वरुपात सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सी.डी.च्या स्वरुपात माहिती मागितली नसताना देखील जन माहिती अधिकारी यांनी स्वतःच्या स्तरावर अपिलार्थीस सि.डी.च्या स्वरुपात माहिती देण्याचा निर्णय घेतला, ही त्यांची कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे टपालाद्वारे माहिती मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हार्ड कॉपीच्या स्वरुपात देणे सर्वसाधारण परिस्थितीत या प्रकरणी योग्य राहिले असते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद पाहता, त्यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळाचा पत्ता देखील दिलेला नाही. परंतु अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क हे दि. १०.१०.२००८ रोजी म्हणजेच,

अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कळविले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस सी.डी.च्या स्वरुपात माहिती देण्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ प्रमाणे एका सी.डी.करिता एकूण रु.५०/- + टपालखर्च इतक्या शुल्काची आकारणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून सी.डी.च्या स्वरुपात माहिती देण्यासाठी फक्त रु.४०/- + टपालखर्च इतक्या शुल्काची आकारणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २१.१०.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली आहे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षात पुरविलेली माहिती यांची तुलना करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती त्यांना पुरविली नसल्याचे आढळून येत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ही माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या भरती प्रक्रियेची माहिती घेतली असता, असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्याकडील 'स्थापत्य अभियांत्रिकी सहायक' या पदावर भरती करण्याकरिता महाराष्ट्र ज्ञान महामंडळ या संस्थेची 'नोकर भरती संस्था' म्हणून नियुक्ती केली होती. याकरिता संबंधित महामंडळाला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे आवश्यक ते मानधन (Remuneration)अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर नेमणूक करताना संकलित केलेल्या सर्व कागदपत्रांची माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ या संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे द्यावयास हवी व तसे जन माहिती अधिकारी यांचे अधिकारही आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित उमेदवारांची "शैक्षणिक अर्हता" या मुद्यावरील संपूर्ण माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ७५ टक्के कोरी सी.डी. दिली, असे नमूद केले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या आकारमानात उपलब्ध होती, त्या आकारमानात त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या सी.डी.मध्ये ७५ टक्के सी.डी. कोरी आहे याचा अर्थ अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती ही कमी आकारमानाची अथवा अपूर्ण आहे, असा होत नाही.सी.डी ७५ टक्के कोरी राहण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष नाही . त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उमेदवारांची "शैक्षणिक अर्हता" या मुद्यावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरज दिलीपराव नलवाड,शिवरंग निवास, अमर हॉटेलच्या मागे, बार्शी रोड

मु.पो.लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६८
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

१. श्री. मुळके सुभाष विठ्ठलराव, : अपिलार्थी
रा. हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कनिष्ठ अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,हाडोळती,
ता.अहमदपूर जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,उपविभागीय
कार्यालय, शिरुर ताजबंद, ता.अहमदपूर,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी अत्यंत आवश्यक असलेली माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी बुध्दीपूर्वक उपलब्ध न करुन दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमानुसार संबंधितांवर रोख दंड व शिस्तभंगाची कारवाई आयोगाने आदेशित करावी. आपल्या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२०.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांचा वीजपुरवठा खंडीत करण्यासंदर्भात सन १९९८ ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"सदरील भगवंत जिनींग प्रेसींग डीपीवरुन मला विज पुरवठा देणेत आलेला होता. परंतु माझ्या एकटयाच विज जोडणी त्यावर होती पण मला कल्पना न देता गेली दहा वर्षापासून विज जोडणी खंडीत केली आहे. म्हणून वेळोवेळी वरिष्ठ व आपल्या कार्यालयाकडे तोंडी व लेखी विनंती करुनही जोडणी न देण्याचे कारण काय? विज जोडणी नसताना माझेकडून २००६ पर्यंत विज बिलाचा भरणा करुन घेतले आहेत. परंतु विज जोडणी देणेसाठी पर्यायी व्यवस्था केली नाही."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.उपविभागीय कार्यालय, शिरुर ताजबंद, ता.अहमदपूर यांच्याकडे दि.०८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांचा वीजपुरवठा खंडीत करण्याचे कारण म.रा.वि.वि.कंपनीच्या कार्यालयाकडून हवे आहे. याकरिता त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून आले आहे की,

अपिलार्थीस प्रामुख्याने त्यांचा वीजपुरवठा म.रा.वि.वि.कं.ने खंडीत केल्याबाबतची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास, त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल त्यांचे स्पष्टीकरण अथवा त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये मूळात अभिप्रेत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही. परिणामी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध ठरत असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांमधील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अनुक्रमे माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज संबंधितांकडे मूळात प्राप्त झाला आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, कारण असे कोणतेही पुरावे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत आयोगाकडे सादर केलेले नाहीत अथवा यासंदर्भात तोंडी खुलासा सादर करण्यासाठी ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष विठ्ठलराव मुळके, रा.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,हाडोळती, ता.अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभागीय कार्यालय, शिरुर ताजबंद, ता.अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६९
निर्णय दिनांक: २८-०१-२०१०

१. श्री. प्रल्हाद चितांबरराव पाटील, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
लातूर
२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.०८.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती मागितली असता, त्यांना अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांच्या अपील अर्जावर दि. २६.११.२००८ रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालयाने

सुनावणी ठेवली होती, तथापि तेथेही अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविण्यात आल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०८.२००८ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर यांच्याकडे शिक्षणाधिकारी (मा.)जि.प.उस्मानाबाद यांनी त्यांच्या दि. २८.०२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, शिक्षण उपसंचालकाच्या दि. १५.०२.२००६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मुख्याध्यापिका, जि.प.कन्या शाळा, उस्मानाबाद यांच्या मागितलेल्या खुलाशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या असल्यास त्या प्रती व या खुलाशानंतर संबंधित मुख्याध्यापिकेवर काय कार्यवाही करण्यात आली, अशी माहिती नोंदणीकृत पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन नेहमीप्रमाणे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेस अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर यांच्याकडे दि. ०७.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०२.२००९ रोजीच्या मुख्याध्यापक,जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय,उस्मानाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे त्यांना संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे सूचित केले व चौकशी अहवाल शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश दिले व अपिलार्थीस नव्याने अर्ज करण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अद्यापपावेतो अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविलेली नाही. संबंधित मुख्याध्यापिकेने चौकशी न केल्यामुळे व याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत, असे त्यांनी आयोगास पुढे अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयातच उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने एका प्रकरणात पाठविलेल्या खुलाशाची प्रत अपिलार्थीस हवी होती. अपिलार्थीने ज्यावेळी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला, त्यावेळेपर्यंत संबंधित मुख्याध्यापिकेने कोणताही खुलासा शिक्षणाधिकारी (मा) यांच्याकडे व शिक्षणाधिकाऱ्याने तो शिक्षण उपसंचालकांकडे सादर केला नव्हता, त्यामुळे या मुद्यावर, "अद्यापपावेतो संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने कोणताही खुलासा उपसंचालक कार्यालयाकडे सादर केला नाही व त्यामुळे अद्यापपावेतो संबंधित मुख्याध्यापिकेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही", अशी माहिती या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिली असती तर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली असती व अपिलार्थीस माहिती मिळाली असती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी असे न करता, शिक्षण खात्याच्या नेहमीच्या

सवयीप्रमाणे अर्जदाराचा अर्ज न वाचता तो अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे पाठवून देण्याचे सत्र या प्रकरणी सुरु ठेवले व या सत्रास शिक्षण उपसंचालक यांनी देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची कोणतीही पाहणी न करता दि. २४.०२.२००९ रोजी चुकीचे निर्णय देऊन साथ दिली. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पुरेसे ज्ञान नाही, असे आयोगास आढळून आले आहे. या करिता सचिव (शालेय शिक्षण) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(पाच) मधील तरतुदीनुसार असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी शिक्षण खात्यातील अधिकारी वर्गास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक ते प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करावी व त्यांच्या विभागाकडील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात योग्य ते प्रशिक्षण द्यावे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी. तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर योग्य प्रकारे कार्यवाही न करुन जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल शिक्षण संचालक,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

३. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रल्हाद चितांबरराव पाटील, कल्पेश किराणा स्टोअर्सच्या मागे, समतानगर, उस्मानाबाद-४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,म.रा. १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७०
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

१. श्री. गोरे प्रितीराज नरेंद्र, : अपिलार्थी
रा.गुळखेडा, ता.औसा,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,गुळखेडा, ता.औसा, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,औसा, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे तसेच त्यांनी या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१५.०८.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०४.२००४ ते ०७.०८.२००८ या कालावधीशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली वेगवेगळया विषयावरील माहिती व्यक्तिशः मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने तदनंतर अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.

१९.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. परंतु या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौ. गुळखेडा,ता.औसा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत व तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २४.११.२००८ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे व या घटनाक्रमामधील कोणत्याही टप्प्यावर कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,

जि.प.लातूर यांना संबंधित ग्रामसेवक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (ग्रामसेवक, ग्रामपंचायत गुळखेडा, पो.टाका,ता.औसा)यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोरे प्रितीराज नरेंद्र, मु.गुळखेडा, पो.टाका, ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गुळखेडा,पो.टाका, ता.औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०३
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

१. श्री. अजय अर्जुनराव पाटील, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
रामेश्वर सहकारी साखर कारखाना मर्या., सिपोरा बाजार, ता. भोकरदन, जि. जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, रामेश्वर सहकारी साखर कारखाना मर्या., सिपोरा बाजार, ता.भोकरदन, जि. जालना यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१३.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन

देण्याचे कार्यकारी संचालक, रामेश्वर सहकारी साखर कारखाना मर्या., सिपोरा बाजार यांना आदेशित केले. यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. ०६.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२०३/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. ०६.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजय अर्जुनराव पाटील, व्दारा-ॲड.अजित एम. देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड ४३१ १२२.

२. कार्यकारी संचालक, रामेश्वर सहकारी साखर कारखाना मर्या., सिपोरा बाजार, ता.भोकरदन, जि. जालना

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०४
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शंकर विनायक धांडे,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>नरसिंह सहकारी साखर कारखाना मर्या.,<br>दिवाकरजी रावते नगर, इंदापूर, ता.वाशी,<br>जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, नरसिंह सहकारी साखर कारखाना मर्या., इंदापूर, ता.वाशी, जि.उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.२०.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती त्यांच्या कारखान्यात उपलब्ध नसल्याचे व माहिती मागण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नसल्याने, त्यांचा अर्ज निकाली काढला. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, नरसिंह सहकारी साखर कारखाना मर्या., इंदापूर, ता.वाशी, जि. उस्मानाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२०४/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर विनायक धांडे, व्दारा-ॲड. अजित एम. देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड ४३१ १२२.

२. कार्यकारी संचालक, नरसिंह सहकारी साखर कारखाना मर्या., दिवाकरजी रावते नगर, इंदापूर, ता.वाशी, जि.उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूलसमोर, टिळक नगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०५
निर्णय दिनांकः २८-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मिलींद सुरेश फडे,<br>रा.शिवाजीनगर, जळगांव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. चेअरमन,<br>अभिमन्यु मजूर सहकारी संस्था मर्यादित, चहार्डी,<br>ता.चोपडा, जि. जळगांव | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, चोपडा, जि. जळगांव | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०७.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन, अभिमन्यु मजूर सहकारी संस्था मर्या., चहार्डी, ता.चोपडा, जि. जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, जि. जळगांव यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, जि. जळगांव यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे सचिव व सहायक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, जि. जळगांव हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित मजूर सहकारी संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२२०५/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २८-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलींद सुरेश फडे, रा. २४७, शिवाजीनगर, जळगांव, ता.जि.जळगांव.

२. चेअरमन, अभिमन्यु मजुर सहकारी संस्था मर्यादित, चहार्डी, ता.चोपडा, जि. जळगांव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, चोपडा, जि.जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७१

निर्णय दिनांक २८.०१.२०१०

१ श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव, : अपिलार्थी

रा. दारफळ, ता.जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक,

ग्रामपंचायत कार्यालय, दारफळ, ता. जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००० ते दि. २९-०७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रोसिडींग बूकाच्या ग्रामसभा व मासिक सभा यांच्या छायांकित प्रती, जमा झ ाालेली पाणीपट्टी, घरपट्टी व जमा झालेले पैसे कशासाठी खर्च केले, यशवंत योजनेतील नाली व

सिमेंट रस्ता याचे अंदाजपत्रक व मोजमापपुस्तीका, झालेल्या ग्रामसभेची संख्या, मंजूर विषयाच्या छायांकित प्रती व ग्रामपंचायतीच्या स्टॉक रजिस्टरच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ६८७ पृष्ठांची असून, प्रतिपृष्ठ रु. २/- याप्रमाणे एकूण रु. १३७४/- इतक्या शुल्काचा भरणा उस्मानाबाद, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये खाते क्रमांक १०५ मध्ये करण्याचे त्यांना सूचित केले. तथापि या रकमेचा भरणा अपिलर्थीने न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित ग्रामसेवकाच्या सुनावणीमध्ये त्यांच्या दिलेल्या जबाबास अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश दिलेले नाहीत परंतु अपिलार्थीचे अपील मान्य केले असल्याचे नमूद केले आहे. यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिलेली असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००० ते २००५ या कालावधीतील मासिक सभेच्या प्रती व २००१ ते २००३ या कालावधीतील प्रोसिडींग बूकच्या छायांकीत प्रती आणि ग्रामसभेच्या प्रती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे व तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक २ व ४ शी संबंधित सन २००१ ते २००३ या कालावधीतील माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले यासंदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा उपलब्ध आहे काय, अशी आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केले असता, अपिलार्थीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर करण्यास असमर्थता दर्शविली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दिनांक १४-१०-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्यापूर्वी श्री. खोचरे, श्री. सुर्वे एस. बी. या नावाचे व एक महिला अधिकारी हे ग्रामसेवक या पदावर कार्यरत होते. त्यांनी त्यांच्या काळातील कार्यभार माहिती अधिकाऱ्याकडे न सोपविल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस सशुल्क माहिती देय असताना देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १४-१०-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती ही विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस आता देणे असलेली उर्वरित माहिती ज्या ग्रामसेवकांच्या काळातील आहे त्या ग्रामसेवकांचा सध्याच्या जन माहिती अधिकाऱ्याने शोध घेऊन त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांनी द्यावयाची राहिलेली माहिती ज्या ग्रामसेवकांकडे उपलब्ध असण्याची शक्यता आहे त्या ग्रामसेवकांशी त्यांनी स्वतः संपर्क साधून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. या कालावधीमध्ये जर संबंधित ग्रामसेवकांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही तर, त्यांनी तसा अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांच्याकडे सादर करावा आणि असा अहवाल दारफळ येथील ग्रामसेवकाकडून प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी

तात्काळ संबंधित ग्रामसेवकाच्या विरुध्द, सदर अहवाल त्यांना प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सरकारी कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव, रा. दारफळ, ता.जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दारफळ, ता. जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७२

निर्णय दिनांक २८-०१-२०१०

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, : अपिलार्थी

द्वारा, कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता (बांधकाम), उपविभाग, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,

उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उप अभियंता (बांधकाम), उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे " उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ मधील झालेल्या शेततळयांच्या कामातील भ्रष्टाचार बाबत" या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ शेततळ्यांचे Measurements recorded in MB. No. 625 on page 11 and page 20, with your certificate on MB- "सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तीका क्रमांक ६२५ मधील शेततळ्याचा मोजमापाच्या नोंदीशी जुळतात" ची सत्यप्रत मिळणे बाबत विनंती "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन "अपिलार्थीस मोजमापाची तपासणी केल्याची नोंद संयुक्त पाहणीमध्ये, मूळ मोजमाप पुस्तीकेवर नोंदविण्याची नियमात तरतूद नाही " असे कळविले व अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे त्यांचे "सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तीका क्रमांक ६२५ मधील शेत तळ्यांच्या मोजमापाच्या नोंदीशी जुळतात" असा अभिप्राय ज्या पत्रावर उपलब्ध आहे, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीचे अपील निकाली काढताना जन अपिलीय अधिकारी यांनी "एकदा मोजमाप पुस्तीकेवर केलेल्या नोंदीची तपासणी केल्याची नोंद केल्यावर पुन्हा संयुक्त मोजणीचे प्रमाणपत्र मोजमापपुस्तीकेवर देता येत नाही व तशी नोंद घेण्याचा नियम नाही " हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करुन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस आयोगाकडून प्रशासकीय निर्णय पारित केले जाणे अपेक्षित असल्याचे आयेगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना जन अपिलीय अधिकारी यांच्या " एकदा मोजमाप पुस्तीकेवर केलेल्या नोंदीची तपासणी केल्याची नोंद केल्यावर पुन्हा संयुक्त मोजणीचे प्रमाणपत्र मोजमापपुस्तीकेवर देता येत नाही" या आदेशावर त्यांचे आक्षेप असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या मते हा आदेश पक्षपाती आहे. कारण या मोजमाप पुस्तीकेवर मोजमाप तपासणी केल्याची मूळात नोंदच नाही. मोजमापपुस्तीकेवर मूळात मोजमापाची तपासणी केल्याची नोंद नसल्याने परत नोंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या मनात उद्‌भवलेली ही शंका अथवा त्यांचा हा आक्षेप याचे निराकरण केवळ प्रशासकीय कार्यवाही करुन केले जाऊ शकेल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमीत प्रक्रिया यामध्ये आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर जर त्यांचे काही आक्षेप असतील तर त्यांनी या आक्षेपाचे निराकरण जिल्हाधिकारी, उस्मानाबाद अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडून त्यांच्या पातळीवर परस्पर करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या त्यांच्या आक्षेपाचे निराकरण करण्याचे अधिकार आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, द्वारा, कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७३

निर्णय दिनांक २८.०१.२०१०

१ श्री. सावंत सतीश विठ्ठलराव, : अपिलार्थी

मु. पो. यशवंतनगर, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्याकडे, "उपमुख्याध्यापक पदावरुन पदावनत केल्याच्या मा. शिक्षणाधिकारी, उस्मानाबाद यांच्या आदेशाची व वेतन श्रेणी कमी केल्याच्या वेतन पथकाच्या पत्राची प्रत" अशी सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागविली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज मुख्याध्यापकांकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून, हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी

आयोगास सादर केली आहे. तथापि अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७-११-२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, आयोगाने त्यांना, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती कोणाच्या पदावनतीच्या संदर्भात आहे याची विचारणा केली असता, अपिलार्थीने ही माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना स्वतःच्या पदावनतीविषयी विचारली होती, असे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही स्पष्ट केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद अद्यापपावेतो दिलेला नाही. त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे बोलावून घेतले व शिक्षण उपसंचालकाशी चर्चा करुन नंतर तुम्हाला निर्णय देतो, असे अपिलार्थीस सांगितले होते. यानंतर बराच कालवधी उलटून गेल्यानंतरही त्यांना शिक्षणाधिकारी वा शिक्षण उपसंचालक यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपात

केलेली आहे. अपिलार्थीस कोणाच्या पदावनतीचे आदेश या अर्जाद्वारे अपेक्षित आहेत, हे आज रोजी त्यांनी आयोगासमोर युक्तिवाद करेपर्यंत आयोगास ज्ञात झाले नाही. तथापि अपिलार्थीने उपस्थित केलेल्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेता, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यालय, गुंजोटी, ता. उमरगा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी अन्यथा ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र राहतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील करुनही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव आणि बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद श्री. नलावडे यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची आणि त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांच्या विषयाची संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सावंत सतीश विठ्ठलराव, मु. पो. यशवंतनगर, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७४

निर्णय दिनांक २८.०१.२०१०

१ श्री. राऊत डी. एस., : अपिलार्थी
रोनक एस.टी.डी. सेंटर, मयुर लॉज, काकडे कॉम्प्लेक्स,
तुळजापूर रोड, जि. उस्मानाबाद - ४१३५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, माहिती न पुरवून माहिती अधिकार अधिनियम २००५ चा अनादर केल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे, अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून, या प्रकरणी त्यांना रु. १०४५/- इतकी नुकसान भरपाई मंजुर व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकार यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०३-१९९२ ते ३१-०८-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाने पाठविला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०३/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि तत्पूर्वीच दिनांक १७-११-२००८ रोजी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०४-०२-२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, त्यांच्याकडून रु. १०३/- इतके माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुन त्यांना दिली आहे. आता अपिलार्थीस कोणतीही माहिती देणे बाकी नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०३/- इतके

त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला कालावधी हा सशुल्क माहिती देण्याच्या अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये दर्शविलेल्या कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य माहिती देय होत आहे. तथापि एवढे असूनही अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून रु. १०३/- इतके माहितीपोटीचे शुल्क आकारलेले आहे. ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती दाखविली, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांनी आयोगाकडे दिनांक १७-०१-२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर दिनांक ०४-०२-२००९ रोजी दिली आहे. आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे, असे मानण्यास हरकत नसावी. तथापि अपिलार्थी ही माहिती विनामूल्य प्राप्त होण्यासाठी पात्र असताना देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क रु. १०३/- इतके स्वीकारले आहे, ते आता जन माहिती अधिकारी यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १०३/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना या प्रकरणी झालेल्या नुकसानाप्रित्यर्थ रु. १०४५/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी आयोगास विनंती केली आहे. तथापि या संदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही सबळ पुरावा अथवा याचा तपशिल दाखल केला नसल्याने आणि तसेच या कथित नुकसानीचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीची, त्यांना रु. १०४५/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्याची विनंती, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्विकारलेले शुल्क रु १०३/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राऊत डी. एस., रोनक एस.टी.डी. सेंटर, मयुर लॉज, काकडे कॉम्प्लेक्स, तुळजापूर रोड, उस्मानाबाद - ४१३५०१

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७५

निर्णय दिनांक २८-०१-२०१०

१ श्री. सुकेशन पोपटराव ढेपे, : अपिलार्थी
रा. आनंदनगर, हडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे, दिलेली माहिती अर्धवट असल्यामुळे व संबंधितांनी शासनाचा महसूल बुडवून माहिती अधिकाराची अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपिलामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी ०१ जून २००४ ते ०१ जून २००८ असा होता. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली असून प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे त्यांचे दिनांक २२-०१-२०१० रोजीचे पत्र देखील त्यांनी आयोगास सादर केले आहे. या पोच पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती मिळाल्याची तारीख नमूद केलेली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींना अपिलार्थीस त्यांनी निश्चितपणे कधी माहिती दिली या मुद्दयावर आयोगास काहीही सांगता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण आठ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. या आठ मुद्यापैकी मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्दयावरील माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या सर्व मुद्दयांव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आणि जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी अशी मागितली आहे. ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' त्यांच्या ग्रामपंचायतीच्या कामाचे मूल्यांकन करण्यासाठी क्षेत्रीय अधिका-यांनी केलेल्या तपासणीच्या टिपण्या ' ही माहिती मात्र, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याची कबुली अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०१-२०१० रोजीच्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये दिली आहे. त्यामुळे आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये आता पुरेसे स्वारस्य उरले नसावे, असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या दिनांकास माहिती दिली हे जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीस आठवत नाही. या संदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत आणि अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे दिलेल्या त्यांच्या दिनांक २२-०१-२०१० रोजीच्या पत्रामध्ये माहिती प्राप्त झ ााल्याच्या दिनांकाचा उल्लेख केलेला नाही, हे पाहता, हे सर्व प्रकरण संशयास्पद असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. संजय प्रभाकर काळे, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, तुळजापूर यांनी त्यांच्या कार्यपध्दतीमधील नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना श्री. संजय प्रभाकर काळे, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, तुळजापूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना, श्री. संजय प्रभाकर काळे, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, तुळजापूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुकेशन पोपटराव ढेपे, रा. आनंदनगर, हडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७६

निर्णय दिनांक २८-०१-२०१०

१ श्री. रामकृष्ण हरिदास लिमकर, : अपिलार्थी
मु. रुई पो. खासगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, प्रथम अपिलामध्ये निर्णय झाल्यानंतरही न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एप्रिल २००६ ते ३० सप्टेबर २००८ या

कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. गोपालकृष्ण हरिदास लिमकर हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिका-याने अपिलीय अधिका-याने सूचित करुनही न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिका-याने एका महिन्याने प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच

मुद्दयाव्दारे संमिश्र स्वरुपाची माहिती मागितली आहे. यातील जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अथवा त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. परंतु अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे एप्रिल २००६ ते ३० सप्टेंबर २००८ या कालावधीमध्ये आलेला योजनेचा तपशील - लाभार्थ्यांची नावे व पत्ते, जन माहिती अधिकारी यांनी काम करतांना मशिनरीचा वापर केला असल्यास मशिनरीची यादी व आर. सी. बुकाची झेरॉक्स, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या कार्यशाळेस उपस्थित असलेल्या शेतक-यांची यादी व या कार्यशाळेत झालेला खर्च, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे सुरज या कंपनीचा ट्रायकोडर्मा (मरबूड) बॅच नंबर ११७ यामध्ये असणारे घटक या मुद्दयावरील माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ती माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस पुरविलेली नाही. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. तसेच अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कोणत्याही शुल्काची आकारणी करता येणार नाही.

या प्रकरणी आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती व ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी तालुका कृषि अधिकारी यांना दिनांक २१-०३-२००९ रोजी, म्हणजे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर, या माहितीकरिता स्मरणपत्र दिले आहे. यावरुन अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वेळोवेळी स्वतः प्रयत्न करुनही माहिती पुरविली नाही हा त्यांचा युक्तिवाद, सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली देय माहिती त्यांना न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व तसेच आपल्या या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त (कृषि), पुणे यांना तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना, तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्या कार्यालयातील संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामकृष्ण हरिदास लिमकर, मु. रुई पो. खासगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४७७/२००९ व ४७८/२००९**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७७ व ४७८

निर्णय दिनांक २८-०१-२०१०

१ अपील क्रमांक ४७७/२००९ : अपिलार्थी

श्री. गौरीकुमार तुळजाराम रोहिणेकर,

तुळजाई एस. टी. डी. श्रीकृष्णनगर,

लातूर

२ अपील क्रमांक ४७८/२००९

श्रीमती चंद्रकला रंगनाथ कासारखेडकर,

व्दारा- श्रीधर अपसिंगे सर (पूर्वेस डालडा फॅक्टरी),

लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर

**निर्णय**

**अपील क्रमांक ४७७/२००९**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या नावाने असलेल्या भूखंडाच्या (सिटी सर्वे नंबर १०४५७ सीट एच-६) मालकी हक्कामध्ये कोणत्या कागदपत्राच्या आधारे बदल करण्यात आला त्या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक ३१-०३-१९९३ ते दिनांक २०-१०-२००८ या कालावधीशी संबंधित आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक ती फी भरुन हस्तगत करावी असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२००९ रोजी पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांचा निर्णय कळविला. या निर्णयामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती ती संचिका जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दाखविली व त्यातील उपलब्ध नकला हस्तगत करण्याचे सूचित केले. तथापि यावेळी अपिलार्थीने त्यांना ही कागदपत्रे आवश्यक नाही असे सांगितले. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती आवश्यक नसल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. त्यांनी हा निर्णय पारीत करण्यापूर्वी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मालकी हक्काची नोंद ज्या कागदपत्राच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी घेतली आहे

त्या कागदपत्रावर त्यांचे नांव नसल्यामुळे त्यांना या माहितीची आवश्यकता नाही. त्यांना जन माहिती अधिका-याने देऊ केलेल्या माहितीची आवश्यकता नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या संदर्भित भूखंडाच्या मालकी हक्काची नोंद ज्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या कार्यालयाने पूर्वी घेतली आहे ती कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस देऊ केली असता, अपिलार्थीने ही कागदपत्रे स्वीकृत करण्याचे नाकारले. अपिलार्थीच्या मालकी हक्काची नोंद संबंधित सोसायटीने त्रयस्थ पक्षास दिलेल्या भूखंड वाटपाच्या आदेशावर केली आहे. तथापि या भूखंडाच्या वाटपाची प्रत घेण्यास अपिलार्थीने नकार दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मालकीचा लातूर येथील सिटी सर्वे नंबर १०४५७ मधील भूखंड क्रमांक २ वर असलेली मालकी हक्काची नोंद ज्या कागदपत्राच्या आधारे बदलण्यात आली आहे ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केली आहेत. तसेच त्यांच्याकडील या प्रकरणाशी संबंधित उपलब्ध असलेली सर्व संचिका त्यांनी अपिलार्थीस दाखविली आहे. तथापि अपिलार्थीचे यावर समाधान होत नाही. अपिलार्थीचा आता सुधारीत मालकी हक्काबद्दल आक्षेप असल्यामुळे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांनी अपिलार्थीच्या या आक्षेपावर विचार करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचितही केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संदर्भात त्यांच्या कार्यालयाच्या विहित कार्यपध्दतीनुसार अर्धन्यायिक सुनावणी देखील चालू आहे. या सुनावणीमध्ये जो निर्णय होईल तो निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्यास ते दिवाणी न्यायालयाकडे यासंदर्भात दाद मागू शकतात. हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>अपील क्रमांक ४७८/२००९</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या अपील अर्जामध्ये दिलेला विषय व अपील क्रमांक ४७७/२००९ मधील विषय एकसारखाच आहे. या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी या अपील क्रमांक ४७७/२००९ मधील अपिलार्थीच्या पत्नी आहेत. हे अपील व अपील क्रमांक ४७७/२००९ शी संबंधित असलेले अपील यामध्ये भूखंडाच्या क्रमांकाशिवाय कोणताही बदल नाही. उर्वरित सर्व बाबी आणि घटनाक्रम हा एकसारखाच असल्यामुळे अपील क्रमांक ४७७/२००९ च्या अनुषंगाने आयोगाने दिलेल्या आदेशाची पुनरोक्ती करण्यात येऊन विचाराधीन अपील अर्जावर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गौरीकुमार तुळजाराम रोहिणेकर, तुळजाई एस. टी. डी., श्रीकृष्णनगर, लातूर.

२ श्रीमती चंद्रकला रंगनाथ कासारखेडकर, व्दारा- श्रीधर अपसिंगे (पूर्वेस डालडा फॅक्टरी), लातूर.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७९
निर्णय दिनांकः २९-०१-२०१०

१. श्री. भाऊसाहेब भुजंगराव पुंड, :अपिलार्थी
रा. इसारवाडी, ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,इसारवाडी,
ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण,
जि.औरंगाबाद

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,इसारवाडी,
ता.पैठण, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.२६.०१.२०१० रोजीचे एक पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आज प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला दि. १७.०९.२००८ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

वरील पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे आणि अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जच निकाली काढण्याची आयोगास विनंती केली असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ४७९/०९, दि. ०७.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब भुजंगराव पुंड,रा. इसारवाडी, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, इसारवाडी, ता.पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८०
निर्णय दिनांक: २९-०१-२०१०

१. श्री. लिंबाजी केरनाथ पारसी, :अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य आरोग्य निरीक्षक,
नगरपरिषद, लातूर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर विभागीय चौकशी करण्यात यावी, अशी त्यांनी या अपील अर्जाच्या अखेरीस आयोगास विनंती करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'शहरातील कचरा उचलण्याबाबत', या विषयावर एकूण २७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ती प्रथमतः व्यक्तिशः पाहण्याची अपिलार्थीस विनंती केली व तसेच अपिलार्थी ही माहिती पाहण्यासाठी केव्हा येणार याचा दिनांक व वेळ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना कळवावा, असे जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद न देता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील तत्त्वतः मान्य केले. परंतु अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या संचिकेतील आवश्यक ती कागदपत्रे पाहून त्याप्रमाणे मागणी करण्याचे व जन माहिती अधिकारी यांनी ती कागदपत्रे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचा निर्णय दि. २०.१२.२००८ रोजी पारित केला असून, सुनावणीच्या वेळी, दि. २०.१२.२००८ रोजी अपिलार्थी उपस्थित होते. एवढे असूनही अपिलार्थीने सदरचा निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याचे विधान करुन विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, यापूर्वी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज श्री. महेश ढवळे या वॉरियर ग्रुप नामक संस्थेच्या लेटर हेडवर केला होता. त्यावेळी सदर माहिती देण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्यानंतर त्यांनी हे शुल्क पुरविले नाही. परंतु नंतर तीच माहिती श्री. लिंबाजी केरनाथ पारसी नावाच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तीने वॉरियर ग्रुप नामक संस्थेच्या लेटरहेडद्वारे मागितली आहे. विस्तृत प्रमाणात माहिती मागून, माहितीसाठी लागणाऱ्या शुल्काचा भरणा टाळण्यासाठी संबंधितांनी ही माहिती अपिलार्थीमार्फत मागितली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. तथापि अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली

असल्यामुळे त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती पाहण्याचे व त्यातील आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याचे त्यांना कळविले होते. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर टाळलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्यानंतर ती जर अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षित असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले आहे, या संदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडलेला नाही. याउलट जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०७.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती पाहून घेण्याची विनंती केली असता, त्याप्रमाणे अपिलार्थीने कोणतीही कार्यवाही केली नाही. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील व आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे माहितीसाठीच्या मूळ अर्जास व अपील अर्जासंदर्भात दिलेला प्रतिसाद पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत नाही.

अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३,२०,२१,२२ व २७ या मुद्यांच्या संदर्भातील संपूर्ण माहिती व मुद्दा क्र. १५ मधील, '----------सदर आकारणी प्रतिटनावर केली जाते का?' या भागशः मुद्यावर अपिलार्थीस माहिती देय होत नाही. कारण त्यांनी या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे.

अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अधिनियमातील तरतुदीमध्ये मूळात अभिप्रेत नाही. परंतु याच मुद्दा क्र.१५ मधील, 'प्रति ट्रीप वजन करण्याकरिता काटा मालकास आजपर्यंत देण्यात आलेली रक्कम' ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तसेच मुद्दा क्र.२० मधील, 'वेगवेगळया दर मंजूरी करण्यात आली आहे काय?' या मुद्दा क्र.२० च्या भागावरील माहिती देखील अपिलार्थीस वरील कारणास्तव देय होत नाही.परंतु या मुद्यावरील 'प्रतिटन दर', ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आज त्यांच्या युक्तिवादामध्ये, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना दहा दिवसांचा कालावधी पुरेल, असे आयोगास अवगत केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची विनंती, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लिंबाजी केरनाथ पारसी,कापड लाईन, हिरास कॉम्प्लेक्स,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य आरोग्य निरीक्षक,नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८१
निर्णय दिनांक: २९-०१-२०१०

१. श्री. सोपान विठ्ठलराव ढगे, :अपिलार्थी
रा.हेर, ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, उदगीर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, उदगीर,
जि.लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, उदगीर,
जि.लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ०४.०३.२००९ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०४.०३.२००९ रोजी संपूर्ण माहिती प्राप्त

झाल्याचे कबूल केले आहे व तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे दि. २४.०२.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही आणि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विचाराधीन द्वितीय अपिलाशी संबंधित मूळ अर्जच निकाली काढण्याची विनंती केली असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ४८१/०९, दि. २४.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोपान विठ्ठलराव ढगे,रा.हेर, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८२
निर्णय दिनांकः २९-०१-२०१०

१. श्री. हुसेन (दादा) अल्लाउद्दीन शेख, :अपिलार्थी
रा.मुरुड अकोला, ता.जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मुरुड
अकोला,जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस पूर्णपणे माहिती देण्याचे सूचित केले असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. यावरुन असे स्पष्ट होत आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे संगनमत व हातमिळवणी झाली असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व अपिलार्थीस योग्य व अद्ययावत माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-२००८ या कालावधीतील एकूण चार

मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत गालेगावरोड ते अनंत कुलकर्णी, अनंत कुलकर्णी ते अशोक बाळापूरे, बाबूराव पांढरे ते बाळकिशन घोडके हे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम कोणत्या योजनेखाली केले आहे त्या कामाच्या अंदाजपत्रकाची माहिती, या कामाविषयी ग्रामसभा घेतली आहे की नाही, जर घेतली असेल तर त्याच्या प्रोसिडींग बुकातील नोंदीची प्रत, सन २००६-०७ व २००७-०८ पर्यंत आर्थिक वर्षातील नळपट्टी व घरपट्टी जमा झालेली रक्कम, जमा-खर्चाच्या बॅंकेतील व्यवहाराविषयी पासबुकातील नोंदीची प्रत, मुंबई ग्रामपंचायत नियम १९६० कलम ३८ प्रमाणे अभिलेख्यांचे वर्गीकरण,परिक्षण व नाशन, अन्वये वर्ग-अ बाबत सन २००६-०७, २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेखांच्या नोंदीची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने ज्या कामांच्याविषयी माहिती मागितली आहे, त्या कामांची तपासणी करण्याचे विस्तार अधिकाऱ्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी या निर्णयामध्ये कोणतेही भाष्य केले नाही. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. २१.१०.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.१०.२००८ रोजी काही माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीने अभिलेख्यांच्या वर्गीकरणाविषयी मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ग्रामपंचायत, मुरुड अकोला ही ग्रामपंचायत लहान असल्यामुळे येथे अभिलेख्यांचे वर्गीकरण अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही, असे आयोगास अवगत केले. त्यामुळे आता अपिलार्थीस या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना तसे कळविणे भाग आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी का वाटत आहे, याचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तथापि त्यांनी या माहितीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.११.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांचे आक्षेप नोंदविले आहेत. या आक्षेपाचे निराकरण करणे, हे आयोगाच्या कार्यकक्षेमध्ये नाही. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, 'आवश्यक असलेली माहिती ' या सदराखाली दर्शविलेली माहिती ही त्यांच्या यासंदर्भातील मूळ अर्जातील माहितीपेक्षा वेगळी आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.१०.२००८ रोजी माहिती दिली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविताना सर्वसाधारण कार्यालयीन कार्यपध्दतीप्रमाणे, अपिलार्थीस उद्देशून पत्र व त्यासोबत माहितीची कागदपत्रे अशाप्रकारे Covering Letter, पाठविलेले नसल्याचे आढळून आले. तथापि अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.१०.२००८ रोजी माहिती पुरविली गेल्याचे त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.२१.१०.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याची धारणा दृढ होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती न देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुरुड

अकोला, श्री. आर.जी.झुंजे (सध्या गंगापूर, ता.लातूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुरुड अकोला श्री. आर.जी.झुंजे (सध्या गंगापूर, ता.लातूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हुसेन (दादा) अल्लाउद्दीन शेख,रा.मुरुड अकोला, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मुरुड अकोला,ता.जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०७
निर्णय दिनांकः २९-०१-२०१०

१. श्री. अनिल सूर्यभान धांडे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्या., फुलंब्री,
जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्तीची व कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी, असे नमूद केले आहे व कलम ७(६) प्रमाणे त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्या., फुलंब्री, जि. औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. १४.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर

अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्या., फुलंब्री यांना आदेशित केले. मध्यंतरीच्या काळात कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१३.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. १७.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती

अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२०७/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. १७.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल सूर्यभान धांडे, व्दारा-अॅड.अजित एम. देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड ४३१ १२२.

२. कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, फुलंब्री, ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद, जि. औरंगाबाद.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०८
निर्णय दिनांकः २९-०१-२०१०

१. श्री. शंकर विनायक धांडे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी
साखर कारखाना लि., अशोकनगर, ता.केज,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्तीची व कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी असे नमूद केले आहे व कलम ७(६) प्रमाणे त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर, ता.केज, जि. बीड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. .०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०५.०९.२००८ रोजी प्रथम

अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन, त्यांना विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. ०६.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२०८/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि. ०६.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर विनायक धांडे, व्दारा-अजित एम.देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड ४३१ १२२.

२. कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर, ता.केज, जि. बीड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद, जि. औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०९
निर्णय दिनांकः २९-०१-२०१०

१. श्री. शंकर इंगळे, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. व्यवस्थापकीय संचालक, : प्रतिवादी
भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि.,
देगांव, ता. अर्धापूर, जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहा.संचालक (साखर),
नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर कलम २०(१) व (२) नुसार कारवाई करण्याची व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१५.०४.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे व्यवस्थापकीय संचालक, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना मर्या., देगांव, ता.अर्धापूर, जि. नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने प्रादेशिक सहा. संचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती

अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२०.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.०६.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) अन्वये कार्यवाही करण्याचे कार्यकारी संचालक, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना मर्या., देगांव, ता.अर्धापूर, जि. नांदेड यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहायक संचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.०६.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती

अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२०९/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.०६.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड, ता.जि. नांदेड ४३१ ६०५.

२. व्यवस्थापकीय संचालक, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., देगांव, ता.अर्धापूर, जि. नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड ४३१६०५.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८३

निर्णय दिनांक  २९.०१.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवराम अंबाजी कोंडे,<br>मु. पो. ता. माहूर, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>माहूर, जि. नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाव्दारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडे, माहूर तालुक्यातील

महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा केलेल्या वृक्ष लागवडीबाबत एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक ०६-०२-२००९ रोजी माहिती दिली. तथापि या माहितीमध्ये ग्रामपंचायतीकडील माहितीचा समावेश नव्हता, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस परत दिनांक २७-०४-२००९ रोजी ग्रामपंचायतीकडील माहिती संबंधित ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पोस्टाने पाठवून दिली. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर अपिलार्थी संबंधित पोस्टमनला भेटले नसल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे पाकीट परत जन माहिती अधिकारी यांना परत केले. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. परंतु ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः हजर झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि ही माहिती त्यांना अपूर्ण व दिशाभूल

करणारी का वाटते हे स्पष्ट करण्यासाठी ते आयागासमोर आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती दिनांक ०६-०२-२००९ व नंतर दिनांक २७-०४-२००९ रोजी पोस्टाने पाठवून दिली असता, अपिलार्थी हे त्यांच्या मूळ अर्जात दिलेल्या पत्त्यावर संबंधित पोस्टमनला आढळून आले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस आजही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत पुर्वनियोजीत वेळी स्वतः हजर राहून ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवावी व अपिलार्थी हे ज्यावेळी त्यांच्याकडे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः हजर होतील, त्यावेळी त्यांनी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित करावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय असणार नाही.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवराम अंबाजी कोंडे, मु. पो. ता. माहूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८४

निर्णय दिनांक २९-०१-२०१०

१ श्री. गजानन बापुराव काळे, : अपिलार्थी
मु. मरडगा, पो. कोळी, ता. हदगांव, जि. नांदेड-४३१७४३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (लघुपाटबंधारे / पाणी
पुरवठा), उपविभाग, हदगांव, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद
लघुपाटबंधारे उपविभाग, हदगांव, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व माहिती अधिकार अधिनियमातील कोणतेही गांभीर्य पाणीपुरवठा समिती, मरडगा यांना नसल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, मौजे मरडगा, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड येथील पाणी पुरवठा व स्वच्छता समिती बद्दलची काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादामध्ये आयोगाने मरडगा येथील पाणी पुरवठा समितीच्या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश देणे अपिलार्थीस अपेक्षित असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे 'जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी यांनी जो चौकशी अहवाल तयार केला त्या अनुषंगाने पाणी पुरवठा समितीत समाविष्ट केलेल्या दोन व्यक्तींची नावे', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. तथापि अशाप्रकारच्या दोन व्यक्ती संबंधित पाणी पुरवठा समितीने त्यांच्या समितीत अद्यापपावेतो घेतलेल्या नाहीत. या मुद्यावर अपिलार्थीचे प्रामुख्याने आक्षेप असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता, ही माहिती

संबंधित पाणीपुरवठा समितीकडे उपलब्ध असावयास हवी होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या अर्जास अनुसरुन त्यावेळेच्या वस्तुस्थितीवर आधारित अपिलार्थीस दिनांक २७-११-२००८ रोजी या मुद्यावर माहिती दिलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य बरोबर पार पाडल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये संबंधित पाणी पुरवठा समितीवर आयोगाने कार्यवाही करावी, अशा अर्थाची आयोगास विनंती केली आहे. तथापि मूळात संबंधित पाणी पुरवठा समिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' नसल्यामुळे या समितीवर कार्यवाही करण्याचे कोणतेही अधिकार आयोगास नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील हा मुद्दा आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००८ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे व अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील उर्वरित मुद्यांवर कार्यवाही करण्याचे अधिकार आयोगास नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन बापुराव काळे,मु. मरडगा, पो. कोळी, ता. हदगांव, जि. नांदेड-४३१७४३

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८५

निर्णय दिनांक २९.०१.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेळके तुकाराम दत्तराव,<br>मु.पो.जांभळा, ता. हदगांव, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>वनक्षेत्रपाल, हदगांव, जि. नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक, (तेंदू), नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील केलेल्या कामाची व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३१५९/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने

दिनांक २५-१०-२००८ रोजी या शुल्काचा भरणा कोषागारात केला. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०३-१२-२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या माहितीकरिता प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन वरिष्ठ कार्यालयाकडून अनुदान उपलब्ध होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिनांक ०७-०२-२००९ रोजी पुरविली असून, प्राप्त माहितीने अपिलार्थी समाधानी असल्याबाबत अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी तशा प्रकारची लेखी कबूली दिली आहे. अपिलार्थीच्या या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना चलनाद्वारे हदगांव कोषागार कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक २५-१०-२००८ रोजी या शुल्काचा भरणा हदगांव येथील कोषागारात केला. अपिलार्थीस आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क कळविण्याचा जन माहिती अधिकारी यांच्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने प्रत्यक्षात या

रकमेचा भरणा कोषागारात केल्याचा दिनांक व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचा दिनांक यातील फरक लक्षात घेता, अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-१०-२००८ रोजी देय होत होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०७-०२-२००९ रोजी म्हणजे, अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिली आहे. त्यामुळे दिनांक २७-१०-२००८ या दिनांकानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मात्र अपिलार्थीस माहिती देताना त्यांच्याकडून रु. ३१५९/- इतक्या रकमेचा भरणा करुन त्यांना माहिती दिली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना येणाऱ्या खर्चाची तरतूद वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्याकडे केली नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. वरिष्ठ कार्यालयाकडून ही तरतूद प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा देखिल केला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती प्राप्त करुन घेणे हा अपिलार्थीचा हक्क आहे. त्यांचा हा हक्क जन माहिती अधिकारी यांच्या विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेने अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय नाकारला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विभागामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्याने अर्जदारास माहिती देण्यासाठी निश्चितपणे शुल्काचा भरणा अर्जदाराकडून कशा प्रकारे करुन घ्यावयाचा याच्या कोणत्याही सुचना त्यांना वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त नाहीत. हा दोष वन विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेचा आहे. सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यपध्दतीमध्ये असलेल्या या मुलभूत दोषासाठी अपिलार्थीस जबाबदार धरणे न्यायोचित होणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३१५९/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या

आत परत करावे.  या कालावधीमध्ये हे शुल्क अपिलार्थीस परत न केल्यास आणि अपिलार्थीकडून या शुल्कावर व्याजाची मागणी झाल्यास आयोग त्याचा विचार पुढे करील, असे जन माहिती अधिकारी यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३१५९/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेळके तुकाराम दत्तराव, मु.पो.जांभळा, ता. हदगांव, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (तेंदू), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८६

निर्णय दिनांक २९.०१.२०१०

१ श्री. बनसोडे धोंडू कोंडबा, : अपिलार्थी
रा. बाजार रोड, आंबेडकरनगर, हिमायतनगर,
ता. हिमायतनगर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
जिल्हा कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००९ या कालावधीमधील व्यापक स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या

प्रमाणात असल्याने ती पाहण्याचे त्यांना सूचित केले आणि एवढी मोठी माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याकरिता त्यांच्या कार्यालयाकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील खारीज केले. अपिलार्थीचे अपील खारीज करताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे अनुमान काढून, त्यांनी हे अपील खारीज करण्याचा निर्णय घेतल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिनांक ०९-०१-२००९ व १०-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. तसेच आजही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, अपिलार्थी ही माहिती त्यांच्याकडून कधीही विनामूल्य हस्तगत करुन घेऊ शकतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिनांक ०९-०१-२००९ व १०-०२-२००९ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे आयोगाने अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ९ द्वारे मागणी केलेल्या "एम. बी. बूकाच्या सत्यप्रती", मुद्दा क्रमांक १० द्वारे मागणी केलेल्या "मोजमापपुस्तीकेच्या

सत्यप्रती", मुद्दा क्रमांक ११ द्वारे मागणी केलेल्या "कामाच्या अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती", मुद्दा क्रमांक १२ मधील मागणी केलेल्या "कामाच्या वर्कऑर्डरच्या व तांत्रिक मान्यतेच्या सत्यप्रती" आणि "कामावरील कुशल व अर्धकुशल भागावर करण्यात आलेला खर्च" ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही, असे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही संपूर्ण उर्वरित माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली असे आयोगास तोंडी अवगत करुन, आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसापर्यंत त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करण्यासाठी तयार करुन ठेवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या कालावधीमध्ये ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पुर्वनियोजीत वेळी स्वतः उपस्थित राहून, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९७६५६९५६८८ असा नमूद केला आहे. अपिलार्थीस ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांनी दिनांक १३-०२-२००८ रोजी त्यांच्याकडील जावक क्रमांक १५३ द्वारे निर्गमित केले आहे. अपिलार्थीकडे भ्रमणध्वनी क्रमांक असल्यामुळे, अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, याबद्दल आयोग साशंक आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांनी, दिनांक १३-०२-२००८ रोजी श्री. धोंडू कोंडबा बनसोडे यांना त्यांच्या कार्यालयाच्या जावक क्रमांक १५३ द्वारे दिलेल्या प्रमाणपत्रासंदर्भात श्री. धोंडू कोंडबा बनसोडे यांनी त्यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्राची परत छाननी करुन, जर या

छाननीमध्ये श्री. धोंडू कोंडबा बनसोडे हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे त्यांना आढळले तर त्यांनी, त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक १३-०२-२००८ रोजी जावक क्रमांक १५३ द्वारे पारित केले गेलेले प्रमाणपत्र त्वरित रद्द करावे. या प्रकरणी उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांनी देखिल गट विकास अधिकाऱ्यांचा स्वतंत्रपणे पाठपुरावा करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.
३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बनसोडे धोंडू कोंडबा, रा. बाजार रोड, आंबेडकरनगर, हिमायतनगर, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जिल्हा कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ गट विकास अधिकारी, पंचायत समिती हिमायतनगर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८७

निर्णय दिनांक २९-०१-२०१०

१ श्री. सतीश मलीक साखरे, : अपिलार्थी
भिमाईनगर, वॉर्ड क्रमांक १६ नवी अबादी, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम अधिकारी, जालना

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम अधिकारी, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " शासकीय सेवेतून कमी केल्यासंबंधी कागदपत्राच्या सत्यप्रती " या विषया-

वर एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात काही माहिती अपिलार्थीस दिनांक २४-०४-२००९ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिनांक २९-११-२००८ व दिनांक २४-०४-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्द क्रमांक १, ६ व ७ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ६ व ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे न्यायालयाने कोणत्या नावाने शिक्षा केली ते न्यायालयाचे पत्र कोणत्या तारखेला दिले

इत्यादी माहिती मागितली आहे. या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस माहिती देतांना अपिलार्थीस या प्रकरणाचा खुलासा देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न्यायालयाच्या निर्णयाची प्रत जर दिली असती तर ते या प्रकरणी जास्त समर्पक ठरले असते. अपिलार्थीने याच मुद्दयामधील त्यांना कोणत्या नावाने कमी केले या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १ मध्ये समाविष्ट आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस परत देण्याचे कोणतेही प्रयोजन आता उरलेले नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली, त्यांना प्रत्यक्षात पुरविण्यात आलेली आणि देय असलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत, विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, वर निर्णयामध्ये सपष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतीश मलीक साखरे, भिमाईनगर, वॉर्ड क्रमांक १६ नवी अबादी, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८८

निर्णय दिनांक २९-०१-२०१०

१ श्री. भवरे धर्मा विठ्ठलराव, : अपिलार्थी
रा. घोटी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घोटी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे घोटी, तालुका किनवट या ग्रामपंचायतीच्या जानेवारी २००८ ते डिसेंबर

२००८ या कालावधीतील मासिक सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती, सूचना, नोटीस व सभासद उपस्थितीच्या प्रतीची सत्यप्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत श्री डी. के. शिंदे यांच्याकडे दिनांक -१२-२००८ रोजी पाठविली. तथापि यानंतरही अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००९ पर्यंत आवश्यक ती माहिती विनामूल्य देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी श्री डी. के. शिंदे यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

सध्याच्या जन माहिती अधिकारी कु. नाजेमा बेगम अली कुरेशी यांनी असा युक्तिवाद केला की, त्या या पदावर दिनांक २७-०२-२००९ पासून कार्यरत असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जी माहिती मागितली आहे, त्या माहितीशी संबंधित कोणतीही कागदपत्रे त्यांना त्यांच्या पूर्वीचे या पदावर कार्यरत असलेले ग्रामसेवक श्री. डी. के. शिंदे यांनी हस्तांतरीत केलेली नाहीत. त्यामुळे त्यांना आयोगाच्या सुनावणीची नोटीस प्राप्त होईपर्यंत अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीची कल्पना देखील नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सध्या त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्या ही माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. के. शिंदे यांनी असा युक्तिवाद केला की, ते अर्धांगवायू या मोठ्या दुखण्यातून आता वाचले असून ते ही माहिती अपिलार्थीस तात्काळ पुरवतील. त्याचबरोबर त्यांनी असाही युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्याकडील पदभार श्रीमती नाजेमा बेगम अली कुरेशी यांना हस्तांतरीत केला आहे. त्यांनी प्रोसिडींग बुक व्यतिरिक्त इतर सर्व कार्यभार हस्तांतरीत केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी कु. नाजेमा बेगम अली कुरेशी यांच्याकडे ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. के. शिंदे यांनी पदभार हस्तांतरीत करण्याच्या वेळी हस्तांतरीत केली नसल्यामुळे, त्या ही माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत. श्री. डी. के. शिंदे, ग्रामसेवक यांची दिनांक २७-०२-२००९ रोजी बदली झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००९ रोजी निर्णय देण्यापूर्वी श्री. डी. के. शिंदे हे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घोटी या पदावर कार्यरत होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०२-२००९ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. दिनांक २०-०२-२००९ रोजी देखील श्री. डी. के. शिंदे हेच ग्रामसेवक या पदावर जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याची प्रामुख्याने जबाबदारी श्री. डी. के. शिंदे, तत्कालीन ग्रामसेवक यांच्यावर येते. सध्या श्री. डी. के. शिंदे हे अंबाडी तांडा ग्रामपंचायत या किनवट तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळेला त्यांनी त्यांच्या बचावाच्याप्रीत्यर्थ असा युक्तिवाद केला की, ते अर्धांगवायू दुखण्यातून नुकतेच बरे झाले आहेत. तथापि त्यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत असून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील

अर्जावर निर्णय देतांना व या निर्णयाव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी संपुष्टात येईपर्यंत श्री. डी. के. शिंदे हे सुस्थितीत व जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग करुन अधिनियमाव्दारे अपेक्षित असलेले त्यांचे कर्तव्य, अपिलार्थीस माहिती न देऊन, योग्य प्रकारे पार पाडले नाही किंबहुना अपिलार्थीपासून त्यांनी ही माहिती हेतूतः दडवून ठेवली आहे असे म्हणणे या प्रकरणी जास्त सोईस्कर होईल, असे आयोगास वाटते. कारण आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील त्यांनी ही माहिती बरोबर आणलेली नाही. श्री. डी. के. शिंदे यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब श्री. डी. के. शिंदे, ग्रामसेवक, अंबाडीतांडा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांचेवर या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याचे हेतुपुरःस्सर टाळल्याबद्दल एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त १० हप्त्यामध्ये किनवट येथील उप शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

**लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी श्री. डी. के. शिंदे हे या शास्तीचा भरणा नियमितपणे उप कोषागार कार्यालय, किनवट येथे मार्च २०१० पासून करतील याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अशा प्रकारच्या अनेक प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीच्या ग्रामस्तरावर चाललेला त्यांचा कारभार मूळात पारदर्शक आणि समाधानकारक नाही. ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यांच्या कार्यालयाची विस्तार अधिकारी अथवा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून नियमितपणे तपासणी होत नाही. एखादा ग्रामसेवक बदली झाल्यास त्याचा कार्यभार त्याच्यानंतर रुजू होणा-या ग्रामसेवकास हस्तांतरीत न करता

ग्रामपंचायतीचे सर्व अभिलेखे स्वतःच्या बरोबर घेऊन जातो व कालांतराने ते नष्ट करतो व हरवतो. अशा प्रकारे जी माहिती जनतेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे अपेक्षित आहे ती उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. औरंगाबाद महसूल क्षेत्रामध्ये एखादा दुसरा अपवाद वगळता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देय माहिती देखिल देण्यासाठी सर्व ग्रामपंचायतीकडून टाळले जात आहे. सदर प्रकरणी ग्रामसेवकाने अर्जदारास माहिती न देण्याचे कारण म्हणजे त्यांच्या पूर्वीच्या ग्रामसेवकाने कार्यभार दिला नाही असे आहे. यावरुन जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांच्या सर्व सहायक अधिका-यांचे ग्रामसेवक या संवर्गातील कर्मचा-यावर कोणतेही नियंत्रण असल्याचे आयोगास आढळून आले नाही. सबब सचिव (ग्रामविकास विभाग) यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची अधिक परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने आणि स्थानिक स्वराज्य संस्थाचा कारभार अधिकाधिक लोकाभिमुख आणि पारदर्शक होण्यासाठी वर उल्लेख केलेल्या प्रकारांना कसा आळा घालता येईल, याचा त्यांनी साकल्याने विचार करुन, यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना त्वरित योजाव्यात. वरील सूचना सचिव (ग्रामविकास विभाग) यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (चार) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी असल्याने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जर सध्याच्या जन माहिती अधिकारी कु. नाजेमा बेगम अली कुरेशी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता श्री. डी. के. शिंदे यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती या कालावधी-मध्ये प्राप्त झाली नाही तर त्यांनी पुढे तीस दिवसाच्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती किनवट यांच्यामार्फत श्री. डी. के. शिंदे यांच्यावर सरकारी कागदपत्रे गहाळ केल्या प्रकरणी फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना असे

सूचित करण्यात येत आहे की, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घोटी यांच्याकडून अशा स्वरुपाचा अहवाल त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी श्री. डी. के. शिंदे यांच्यावर त्वरित फौजदारी कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. डी. के. शिंदे,) यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उप शासकीय कोषागारात करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भवरे धर्मा विठ्ठलराव, ग्रामपंचायत सदस्य, रा. घोटी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घोटी, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. डी. के. शिंदे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अंबाडी तांडा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घोटी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ उप कोषागार अधिकारी, कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८९

निर्णय दिनांक २९-०१-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार सदाशिवराव सोमठाणकर,<br>" समृध्दी " ३१ चंद्रलोक, ज्योतीनगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित अभिलेख व प्रत्यक्ष स्थिती याबाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना पाठविलेला अहवाल या मुद्दयावरील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित शीट क्रमांक १८३ सिटी सर्वे क्रमांक १६२९५/३० फेर क्रमांक ५२६७ या संदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९२ इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०२-

०४-२००८ रोजी या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित मुद्दयांवरील संपूर्ण माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जात अपिलार्थीने संदर्भित केलेल्या दिनांक १३-०७-१९९५ च्या पत्राची प्रत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे व तदनंतर ती अपिलार्थीस पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि मुदत टळूनही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली दिनांक १३-०७-१९९५ च्या पत्राची प्रत पाठविण्याकरिता जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना दिनांक १८-०२-२००९ रोजी पत्र लिहिले होते. तथापि या पत्रास जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना दिनांक १३-०७-१९९५ रोजी पाठविलेल्या अहवालातील प्रतीसंदर्भात इतर कोणताही संदर्भ त्यामध्ये दिलेला नाही. या मुद्दयामध्ये अपिलार्थीने जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख

यांच्या कार्यालयाचा पत्र क्रमांक दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती संदर्भहीन व पर्यायाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस या अहवालाची प्रत प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न म्हणून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक १३-०७-१९९५ रोजीच्या जावक रजिस्टरची तपासणी करावी व त्या रजिस्टरवर जर अशा पत्राची नोंद असेल तर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून या अहवालाची प्रत मागवून घ्यावी व जर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तर जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन ही माहिती जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेऊ शकतील. जर अशा प्रकारची कोणतीही माहिती जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याही अभिलेख्यावर उपलब्ध नसेल तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार सदाशिवराव सोमठाणकर, " समृध्दी " ३१ चंद्रलोक, ज्योतीनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९०

निर्णय दिनांक २९-०१-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तेलेवार सदाशिव गुणाजी,<br>सतीश राखेवार यांच्या घराजवळ, मोहल्ला चौफाळा,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | जिल्हा कृषि अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कृषि विकास अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांच्या-कडून अद्यापही कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर

केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना, एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखन व मराठी लघुलेखनाच्या प्रशिक्षण व बक्षिस योजनेअंतर्गत, अनुज्ञेय तारखेपासून दोन वेतनवाढी प्रदान करण्यात याव्यात, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे " एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखन व मराठी लघुलेखनाची प्रशिक्षण व बक्षिस योजनेअंतर्गत दोन वेतनवाढी मिळण्याबाबत " या विषयावर एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक १२-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस विविध कारणास्तव माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास जिल्हा परिषद, नांदेड यांच्या सामान्य प्रशासन विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद देणे या प्रकरणी उचित राहिले असते. तथापि सामान्य प्रशासन विभागाने आपली जबाबदारी टाळून अपिलार्थीचे माहितीचे विचाराधीन प्रकरण कृषी विभाग जिल्हा परिषद यांच्याकडे पाठविल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे.

त्यामुळे आता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) मधील तरतुदीप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे केलेले प्रथम अपील हे जिल्हा परिषदेकडील कृषि विभागाने न हाताळता या प्रकरणाशी संबंधीत नियुक्ती केलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अथवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी हाती घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झ ाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तेलेवार सदाशिव गुणाजी, सतीश राखेवार यांच्या घराजवळ, मोहल्ला चौफाळा,

नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.४९३/०९, ४९४/०९,४९६/०९ व ४९७/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९३,४९४, ४९६ व ४९७
निर्णय दिनांकः ३०-०१-२०१०

१. श्री. जी. एस. रायबोळे, :अपिलार्थी
रा. किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. अपील क्र.४९३/०९:

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),<br>इस्लापूर, ता.किनवट,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (रोहयो),<br>नांदेड | :प्रतिवादी |

२. अपील क्र.४९४/०९:

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो),<br>इस्लापूर, ता.किनवट,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (रोहयो),<br>नांदेड |

३. अपील क्र.४९६/०९:

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),<br>बोधडी, ता.किनवट,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (रोहयो),<br>नांदेड |

४. अपील क्र.४९७/०९:

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),<br>भोकर,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (रोहयो),<br>नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०७.२००९ रोजी नोंदविलेली क्र.४९३/०९,४९४/०९, ४९६/०९ व ४९७/०९ ही चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२.०३.२००९ या एकाच दिवशी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), इस्लापूर,वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो),इस्लापूर, वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी व वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५ ते २००९ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या सर्व कामांच्या सामाजिक लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती,वन परिक्षेत्र अधिकारी यांनी झाडे तोडण्यासाठी परवानगी दिलेल्या शेतकऱ्यांची नावे, शेताचा सर्व्हेनंबर, निघालेल्या लाकडाचे घनमीटरमध्ये परिमाण, शेतकऱ्यांचे गाव, तसेच मराठवाडा पॅकेज आणि मानव विकास मिशन या योजनेमधून केलेल्या कामांची नावे - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व टपालाद्वारे अशा दोनही माध्यमाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित चार जन माहिती अधिकाऱ्यांपैकी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) इस्लापूर यांनी दि. ३१.०३.२००९, वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), इस्लापूर यांनी दि. ३०.०३.२००९ व वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांनी दि. १३.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली. वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),नांदेड यांच्याकडे दि. २०.०४.२००९ रोजी चार स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. या चारही अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०६.२००९ रोजी स्वतंत्र सुनावणी घेऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक. ३०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, सर्व प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना या चारही जन माहिती अधिकाऱ्यांपैकी कोणाकडूनही अद्यापपावेतो कसलीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपिले सादर केली आहेत व तसेच त्यांनी या चारही प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपील क्र.४९३/०९ व क्र.४९४/०९ च्या संदर्भात,जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) इस्लापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो),इस्लापूर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि. ३१.०३.२००९ व ३०.०३.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि यासंदर्भात आयोगाने त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा पुरावा सादर करण्याचे सूचित केले असता, त्यांना अशाप्रकारचा कोणताही पुरावा आयोगास सादर करता आला नाही.

अपील क्र.४९६/०९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), बोधडी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिला नाही, असे आयोगास अवगत केले.

अपील क्र.४९७/०९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. १३.०४.२००९ रोजी पाठविल्याचे आयोगास अवगत केले व यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर हीच माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ११.०६.२००९ रोजी परत पाठविली, असेही पुढे आयोगास अवगत केले आणि यासंदर्भात योग्य तो पुरावा आयोगास सादर केला. यावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जास वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांनी दोन दिवस इतक्या विलंबाने आवश्यक तो प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, विचाराधीन चारही अपील प्रकरणांशी संबंधित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्यापैकी अपील क्र.४९३/०९ व ४९४/०९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),इस्लापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), इस्लापूर यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि.३१.०३.२००९ व ३०.०३.२००९ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि यासंदर्भात त्यांना आयोगासमोर कोणताही सबळ पुरावा सादर करता आला नाही. तसेच ही बाब त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०८.०६.२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. यावरुन वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),इस्लापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो),इस्लापूर यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही, या निष्कर्षाप्रत आयोग आलेला आहे. अपील क्र. ४९६/०९ च्या संदर्भात,जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांच्या कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

अपील क्र. ४९७/०९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, भोकर यांनी अपिलार्थीस दि. १३.०४ व ११.०६.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. त्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांच्याबाबतीत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिली, असा आयोग निष्कर्ष काढत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा बराचसा भाग अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी भोकर वगळता, उर्वरित तीनही वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरवावी लागेल. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या, वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा) इस्लापूर यांनी आयोगास दाखविलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये त्रूटी असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब उपरोक्त

तीनही अपील क्र.४९३/०९, ४९४/०९ व ४९६/०९ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा), इस्लापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) इस्लापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपील क्र. ४९७/०९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र (भोकर) यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे सिध्द केले असल्याने, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांच्या कार्यालयात सात दिवसांच्या आत पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून त्यांच्या कार्यालयातून ही माहिती सशुल्क हस्तगत करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १२.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जास अपील क्र. ४९३/०९ व ४९४/०९ च्या संदर्भात,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एस.एन.दायमी (सध्या मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांच्या कार्यालयात कार्यरत) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), इस्लापूर श्री. प्रकाश कुलकर्णी (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपील क्र. ४९६/०९ च्या संदर्भात,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी श्री. बोड्डावार हे नियतवयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश आयोगातर्फे देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.४९३/०९, ४९४/०९ व ४९६/०९ मान्य करण्यात येत आहेत आणि अपील क्रमांक ४९७/०९ फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. ४९३/०९, ४९४/०९ व ४९६/०९ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ४९७/०९ फेटाळण्यात येत आहे.

३. अपील क्र. ४९३/०९, ४९४/०९ व ४९६/०९ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),इस्लापूर, (रोहयो)इस्लापूर व बोधडी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),इस्लापूर श्री. एस.एन.दायमी (सध्या मुख्य वनसंरक्षक कार्यालय,औरंगाबाद येथे कार्यरत) व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो),इस्लापूर श्री. प्रकाश कुलकर्णी (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर, जि.नांदेड या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी. एस.रायबोळे, मुख्य संपादक, सा.धुमाकूळ, किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा), इस्लापूर, ता. किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रो.ह.यो.), इस्लापूर, ता. किनवट,

जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा), बोधडी, ता. किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा), भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१०
निर्णय दिनांक: ३०-०१-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी दिलेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना

मर्या., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर प्राप्त माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ३०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२१०/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२११
निर्णय दिनांक: ३०-०१-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२६.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितानी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी

सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झ ााल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ३०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२११/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: ३०-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१२
निर्णय दिनांकः ३०-०१-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०६.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जातील मुद्दा क्र.१ व ८ शी संबंधित माहिती संबंधितांनी न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी

सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि विलंबाने माहिती प्राप्त झ
ाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ३०.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२१२/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ३०-०१-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९५

निर्णय दिनांक ३०-०१-२०१०

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्ताहिक "धुमाकूळ", तालुका किनवट,

जिल्हा नांदेड - ४३१८०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी बु., ता. किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००९ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वनपरिक्षेत्र बोधडी यांच्या कार्यालयामध्ये कार्यरत असलेले वनपाल, वनरक्षक यांची नावे, गावे, वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक यांच्या जातीची व शैक्षणिक पात्रतेची माहिती, ते कोणत्या जातीच्या आरक्षणात नौकरीला लागले, त्यांच्या जातीची व शैक्षणिक प्रमाणपत्राची

छायांकित प्रत, त्यांनी बोधडी वनपरिक्षेत्रात केलेल्या विकास कामांची नावे, स्थळ, अंदाजपत्रकाच्या किमतीची आणि या कालावधीमध्ये बोधडी वनपरिक्षेत्रात सांगी झाडे तोडण्यासाठी दिलेल्या आदेशाची छायांकित प्रत आणि वृक्ष तोडणीनंतर निघालेल्या वृक्षाची परिमाणाची घन मिटरमध्ये संख्या - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०६-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती मागविली त्यावेळी श्री. बोड्डावार नावाचे वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस आता ७ दिवसाच्या आत पुरवू शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. या माहितीपैकी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या शैक्षणिक प्रमाणपत्राची प्रत व त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे स्पष्ट करण्यात आले की, त्रयस्थ पक्षाच्या शैक्षणिक पात्रतेची दखल ते ज्यावेळी सेवेत रुजू होतात त्यावेळी त्यांच्या विभागामार्फत घेतली जाते आणि त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तीकेत त्यांच्या शैक्षणिक पात्रतेची नोंद घेऊन शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र अपिलार्थीस परत करण्यात येते. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती जर त्रयस्थ पक्षाने त्यांना उपलब्ध करुन दिली तरच ती त्यांना अपिलार्थीस देता येईल. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत असून, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या व जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भात संबंधितांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाच्या प्रती आवश्यक वाटल्यास त्यांनी अपिलार्थीस यासंदर्भात पुरवाव्यात व तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बोड्डावार, वनपरिक्षेत्र अधिकारी (सध्या मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांच्या कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर कार्यरत) यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन या प्रकरणी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. बी.एस. बोड्डावार (सध्या मुख्य वनरक्षक औरंगाबाद यांच्या कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर कार्यरत) यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक "धुमाकूळ", तालुका किनवट, जिल्हा नांदेड - ४३१८०४

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी बु., ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४९८/२००९, ४९९/२००९ व ५००/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९८,४९९ व ५००

निर्णय दिनांक ३०.०१.२०१०

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक "धुमाकूळ", तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ४९८/२००९
जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड

२ अपील क्रमांक ४९९/२००९
जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड, जि. नांदेड

३ अपील क्रमांक ५००/२००९
जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर, जि. नांदेड

४ अपील क्रमांक ४९८/२००९ ते ५००/२००९ : प्रतिवादी
जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (तेंदू), जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००९ रोजी नोंदविलेली, ४९८/२००९, ४९९/२००९ व ५००/२००९ या क्रमांकाची तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड, (प्रादेशिक), मुखेड व (रोहयो), देगलूर यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५ ते २००९ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या सर्व कामांच्या सामाजिक लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी झाडे तोडण्यासाठी परवानगी दिलेल्या शेतकऱ्यांची नावे, शेताचा सर्व्हेनंबर, निघालेल्या लाकडाचे घनमीटरमध्ये परिमाण, शेतकऱ्यांचे गाव, तसेच मराठवाडा पॅकेज आणि मानव विकास मिशन या योजनेमधून केलेल्या कामांची नावे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व नोंदणीकृत टपालाने अशा दोनही माध्यमाद्वारे मागितली होती. तथापि या तीनही प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००९ रोजी निर्णय देऊन वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड व मुखेड यांना अपिलार्थीस १० दिवसाच्या आत व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर यांना अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या तीनही प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. आपल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आयोगास पुढे अशीही विनंती केली आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही आयोगाने आदेशित करावी.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस नेमकी कोणती व कशी माहिती हवी आहे, याचा खुलासा त्यांनी अपिलार्थीस विचारला व तदनंतर दिनांक २०-०६-२००९ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली व उर्वरित माहितीची व्याप्ती जास्त असल्यामुळे, ती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड, जि. नांदेड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमधील सामाजिक अंकेक्षण या विषयावरील माहिती ही जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०४-२००९ रोजी सामाजिक अंकेक्षणाव्यतिरिक्त उर्वरित माहिती दिली व तदनंतर दिनांक २१-१२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक ०२-०१-२०१० रोजी सामाजिक अंकेक्षणाच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर, जि. नांदेड यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांच्या कार्यालयातर्फे कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोगासमोर कबूल केले व पुढे आयोगास असे अवगत केले की, तत्कालीन वनपरिक्षेत्र

अधिकारी श्री. एस. के.गायकवाड हे आता दिनांक ३०-११-२००९ रोजी शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक २५-०३-२००९ रोजी दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपात माहिती मागविली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना प्रश्न पडावा, अशा स्वरुपाची ही माहिती नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः व टपालाद्वारे अशा दोन्ही माध्यमाद्वारे माहिती मागविली असल्यामुळे, अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या माध्यमाद्वारे माहिती हवी आहे, हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विचारणे संयुक्तिक आहे. याच जन माहिती अधिकाऱ्याने, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर, केवळ अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती जास्त असल्यामुळे, त्यांना अर्धवट माहिती पुरविली व उर्वरित माहिती कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले, ही त्यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार देय असल्यामुळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मुखेड यांच्या बाबतीत त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी, मुखेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे तयार असलेली अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व

दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य पुरवावी. वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती देखिल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, ती दिनांक २१-१२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे आणि तत्पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडील माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती दिनांक १५-०४-२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. या संदर्भातला आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर टाळाटाळ केली, असे सिध्द होत नाही. तसेच तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर श्री. एस. के. गायकवाड हे आता दिनांक ३०-११-२००९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड व (रोहयो), देगलूर यांच्यावर शास्तीचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे व दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे काही प्रमाणात सिध्द होत असल्यामुळे, श्री. एस. बी. चव्हाण वनपरिक्षेत्र अधिकारी, नांदेड यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यावर सतर्कतेने व अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपिले क्रमांक ४९८/२००९ व ४९९/२००९ ही अंशत: मान्य व अपील क्रमांक ५००/२००९ हे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ४९८/२००९ व ४९९/२००९ ही अंशतः मान्य व अपील क्रमांक ५००/२००९ हे मान्य करण्यात येत आहे.

२. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड व वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड श्री. एस.बी. चव्हाण यांना आयोगाकडून सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक "धुमाकूळ", तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), जि. नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०१

निर्णय दिनांक ३०-०१-२०१०

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम)
उपविभाग, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
(बांधकाम) उत्तर विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३०-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती पूर्णतः प्राप्त झाली असल्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५०१/२००९, दिनांक २९-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बांधकाम) उत्तर विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०२

निर्णय दिनांक ३०-०१-२०१०

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा दुय्यम निबंधक, किनवट, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सह जिल्हा निबंधक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३०-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती पूर्णतः प्राप्त झाली असल्यामुळे ते विचाराधीन

अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ५०२/२००९, दिनांक १५-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०३

निर्णय दिनांक ३०-०१-२०१०

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३०-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती पूर्णतः प्राप्त झाली असल्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ५०३/२००९, दिनांक २९-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०४

निर्णय दिनांक ३०-०१-२०१०

१ श्री. पी. एन. बहात्रे, : अपिलार्थी

घर नं. १८०, सहयोगनगर, वर्कशॉप जवळ, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्ज अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याने केला असल्याचे या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष सुभद्राबाई माधव हिंगोले, रा. एकदरा, तालुका जिल्हा नांदेड या शासकीय रुग्णालयात दिनांक १७-०४-२००६ ते २५-०४-२००६ किंवा १७-०५-२००६ ते २५-०५-

२००६ या कालावधीमध्ये आपल्या शासकीय रुग्णालयामध्ये भरती होत्या काय व जर भरती असतील तर त्यांचे डिसचार्ज कार्ड व भरती नोंदवहीचा क्रमांक व तसेच रोगाचा प्रकार, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. वैद्यकीय महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी या पदावर वैद्यकीय महाविद्यालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार त्यांच्या दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत या प्रकरणाशी संबंधित माहिती ज्यांच्याकडे आहे, ते सहायक माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे पाठविली. तथापि त्यांनी विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर न केल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांच्याकडे दिनांक ०१-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्या-प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००९ रोजी त्रयस्थ पक्षाच्या रोगाच्या नावाशिवाय व दिनांक १०-०८-२००९ रोजी रोगाच्या नावासह त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी

आयोगास असे सांगितले की, त्यांना ही माहिती श्री. बी. पी. कदम, निवासी वैद्यकीय अधिकारी (सध्या जिल्हा शल्य चिकित्सक या पदावर कार्यरत) यांच्याकडून प्राप्त न झाल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक आहे. त्यामुळे ही माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. तथापि या प्रकरणी नेमले गेलेले जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात ताब्यात नव्हती. वैद्यकीय अधिकारी यांच्या पूर्णतः ताब्यात होती व मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त होण्यासाठी त्यांच्यावर अवलंबून राहावे लागले. या प्रकरणी संबंधित निवासी वैद्यकीय अधिकारी श्री. कदम, सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झ ाल्या-मुळे अंतीमतः जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी तत्कालीन निवासी वैद्यकीय अधिकारी श्री. बी. पी. कदम हे पूर्णतः जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जाची आवश्यक त्या तत्परतेने आणि गांभीर्याने दखल न घेतल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांवर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे आणि अपिलार्थीची पोचसही जन माहिती

अधिकारी यांनी आयोगास सादर केली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री. कदम, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०१-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पी. एन. बहात्रे, घर नं. १८०, सहयोगनगर, वर्कशॉप जवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. कदम तत्कालीन निवासी वैद्यकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड)

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती